REGISTERED NO. 5 1875

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० ३ माहे अक्टोबर सन १८७५ इ० अंक ४०

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| शुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE.

### नोटिस.

OPENIN OF THE MUSJID STATION BETWEEN BOREE BUNDER AND BYCULA

**बोरींबंदर व भायखळा या दोन स्टेशनचे दरम्यान मसीद नावाचें नवीन स्टेशन बांधलें आहे त्याची सुरुवात.**

तारीख २० सप्तंबर रोज सोमवारीं वत्यानंतर पुढें फक्त उतारू नेण्या आणण्याकरितां बोरीबंदर व भायखळा या दोन स्टेशनांचे दरम्यान मसीद नावाचें नवीन स्टेशन सुरू करण्यांत येईल.

उतारू, लगेज, पार्सल्स व कुत्रे सदरील तारखेपासून या रेलवेवरील मसीद व दुसरे स्टेशनांचे दरम्यान पाठविण्यांत येतील.

मद्रास व कलकत्त्याकडून येणाऱ्या व त्या दिशेस जाणाऱ्या मालट्रेनी मसीद बंदरावर थांबणार नाहींत परंतु त्याखेरीज या कंपनीचे तारीख १ मार्च रोजीं प्रसिद्ध झालेल्या टाईम बिलांत जाणाऱ्या येणाऱ्या ट्रेनी लिहिल्या आहेत त्या सर्व मसीद स्टेशनावर निरनिराळ्या क्लासाचीं टिकिटें घेतलेल्या उतारूंस उतरण्याकरितां उभ्या रहातील.

शनवारीं तिसऱ्या प्रहरीं निघणारी गाडी मुंबईहून ( बोरीबंदरावरून )बराबर तीन वाजतां कल्याणास जाण्याकरितां निघते तीही मसीद स्टेशनावर उभी राहील.

मुंबईहून ( बोरीबंदरावरून )जाणाऱ्या गाड्या ज्या वेळेस निघतील असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे त्यापेक्षां तीन मिनिटें उशिरानें त्या मसीद स्टेशनावरून निघतील व मुंबईस येणाऱ्या गाड्या ज्यावेळीं भायखळ्यावरून निघतील असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे त्यापेक्षां सात मिनिटें उशिरानें त्या मसीद स्टेशनावरून निघतील.

मसीद स्टेशनावरून बोरीबंदर व कल्याण या स्टेशनास व त्याच्या दरम्यानचे स्टेशनास जाण्याकरितां ज्यांस एक महिन्याचे किंवा तीन महिन्यांचे मुदतीचीं टिकिटें पाहिजे असतील त्यांस तीं खालीं सही करणाराकडे अर्ज केला असतां मिळतील.

जबलपूर, रायचोर व खंडवा यांच्या पलीकडील दुसऱ्या रेलवेच्या स्टेशनावर या रेलवेवरून उतारू नेण्यांत येतात त्या सर्व स्टेशनास मसीद स्टेशनावरून तारीख १ अक्टोबर रोजीं व त्यानंतर पुढें उतारू लगेज, पार्सल्स व कुत्रे पाठविण्यांत येतील.

घोडे व गाड्या मसीद स्टेशनावरून दुसऱ्या स्टेशनास पाठविल्या जाणार नाहींत व दुसऱ्या स्टेशनांवरून त्या स्टेशनास येणार नाहींत.

तारीख २० सप्तंबर रोजीं मसीद स्टेशनावर टेलिग्राफ हपीसही सुरू होईल व तेथून दुसऱ्या स्टेशनास पैसा घेऊन बातम्या पाठविल्या जातील व या स्टेशनास पाठविण्याकरितां दुसरे स्टेशनावर बातम्या घेण्यांत येतील.

**हेनरी कांडर,**

जनरल ट्र्याफिक म्यानेजर.

मुंबई ता १७ माहे सप्तंबर
सन १८७५ इसवी.

---

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE

### नोटिस.

CARTING OF GOODS AT AMRAOTI DISCONTINUED

**उमरावती स्टेशनावरून गाड्यांतून माल पोचविण्याचें बंद केल्याबद्दल.**

या नोटिसीअन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं, इतके दिवसपर्यंत ही कंपनी उमरावती स्टेशनावरून माल गोळा करून तो गाड्यांतून विऱ्हाडीं पोंचविण्याचें काम करीत असे, तें काम ती चालू महिना संपल्यानंतर करणार नाहीं.

माल पोंचविण्याबद्दल जो जास्त पैसा ( ह्मणजे माल गोळा करून आणण्याचें अथवा पोचविण्याचें काम केलें असतां त्याबद्दल जितका पैसा जास्त पडतो तितका) घेण्यांत येतो तो पुढें घेतला जाणार नाहीं. कंपनी माल पोंचविण्याचें काम करीत नाहीं त्यावेळेस जितका पैसा घेण्यांत येतो तितकाच घेतला जाईल.

**हेनरी कांडर**

जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबइ तारीख २१
सपटंबर १८७५ इ.

---

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE

### नोटिस.

VISIT OF HIS ROYAL HIGHNESS THE PRINCE OF WALES

**हिज रायल हायनेस धि प्रिन्स आफ् वेल्स यांचें आगमन.**

या नोटिसीअन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं, तारीख १९ अक्टोबरपासून तारीख ८ नोवेंबर सन १८७५ इसवीपर्यंत व हे दोन्ही दिवस धरून सर्व क्लासांचे उतारू लोकांस, व घोड्यास आणि गाड्यास मुंबई बाहेरील या रेलवेपैकीं सर्व स्टेशनांवरून बोरीबंदर व भायखळ्यापर्यंत जाण्या येण्यास जो एकंदर पैसा पडतो त्यांतील एक चतुर्थांश कमी करून बाकी पैशाला सदरहु स्टेशनांवरून बोरीबंदर व भायखळ्याचीं रिटर्न टिकिटें देण्यांत येतील, व तीं तारीख ३० नोंवेंबरपर्यंत व त्या दिवशींही उपयोगी पडतील. बोरीबंदर व भायखळा या दोन स्टेशनांचे दरम्यान रिटर्न टिकिटें फक्त उतारू लोकांसच मिळतील.

**हेनरी कांडर**

जनरल ट्राफिक म्यानेजर.

मुंबई ता० २४ माहे सप्तंबर
सन १८७५ इसवी.

---

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनूसुला रेलवे.

NOTICE

### नोटिस.

RATES FOR GRAIN AND SEED

**धान्य व बीजें यांचे दर**

या लेखाच्या द्वारानें सर्व लोकांस जाहिर केलें जातें ऐसाजे, या रस्त्यावर, जबलपुरापलीकडील रेलवेच्या स्टेशनांवरून, होळकर स्टेटरेलवेच्या स्टेशनांवरून, आणि तसेंच जबलपुर व खंडवा यांच्या दरम्यानच्या स्टेशनांवरून, आणि नागपुर व बडनेरा यांच्या दरम्यानच्या स्टेशनांपर्यंत हीं सर्व स्टेशनें धरून धान्य नेण्या आणण्याचे दर कमी करण्यांत आले आहेत.

आणखी, जिंजोली, जवस, मोह अथवा मोहोडा, मोहरी, खसखस, घोडराई, आणि तीळ हीं बीजें लोकल रेलवेमध्यें आणि तिच्याद्वारा इतर रेलवेमध्यें या रस्त्यावरील सर्व स्टेशनांवर आणि तसेंच ही कंपनी ज्या रेलवेवर काम चालविते अशा निजाम स्टेट रेलवे व दुसऱ्या स्टेट रेलवे यांच्या दरम्यानच्या स्टेशनांवर व त्याप्रमाणेंच त्या रेलवेच्या सर्व स्टेशनांच्या आणि जबलपुरच्या पलीकडील दुसऱ्या रेलवेच्या स्टेशनांच्या आणि खंडवा या स्टेशना पलीकडच्या आणि रायचूर पलीकडच्या रेलवे स्टेशनांच्या दरम्यानच्या स्टेशनांवर नेण्या आणण्याचे दर, चालू महिना संपल्यानंतर आणि पुढें दुसरी जाहीरखबर देई तोंपर्यंत धान्याच्या दराप्रमाणेंच घेतले जातील.

मुंबईहून सर्व स्टेशनांवर आणि दुसऱ्या सर्व स्टेशनांच्या दरम्यान लोकल रेलवेच्या आणि तिच्या द्वारा दुसऱ्या सर्व रेलवेच्या स्टेशनांवर धान्य आणि दुसऱ्या प्रकारचीं बीजें नेण्याआणण्याचे दर हल्लीं आहेत त्याप्रमाणेंच रहातील.

विशेष तपशीलवार माहिती सदरीं लिहिलेल्या दर कोणत्याही स्टेशनांवर अथवा खालीं सही करणार यांजकडे मागितली असतां मिळूं शकेल.

**हेनरी कांडर**

जनरल ट्राफिक म्यानेजर.

मुंबई ता०२५ माहे सप्तंबर
सन १८७५ इसवी.

---

## नोटिस.

राजश्री मानसिंग वल्लद पुरणाजी पाटील मौजे चिंचोली कारफर्मा तालुके खामगाव यांस नोटिस देणार निंबाजी केशव कुळकर्णी मौजे चिंचोली कारफर्मी याजकडून देण्यांत येते कीं, मौजे चिंचोली कारफर्मा तालुके खामगाव येथील टिके पांढरीवाले सरवे नंबर ५७ पैकीं एकर ३०३ गुठे आकार रुपयाचे आमचें मालकीचें असून सदरील जमिनींत तुमचे कडबा व कुटार ठेवण्याचें वाडगें आहे तें काढून टाकावें ह्मणजे त्याठिकाणीं आह्मी पेरा करू, असे पुष्कळ वेळा तुह्मास ह्मटलें असतां काढू काढू ह्मणता परंतु काढलें नाहीं वरून नोटिस देतों कीं सदरील वाडगें तुमचें काढून आमची मालकीची जागा आह्मास आजपासून एक महिन्यांत खाली करून द्यावी जर तसें न कराल तर तुमचेवर सिरस्त्याप्रमाणें दिवाणी कोर्टांत दावा केला जाईल. या नोटिसीचा खर्च व कोर्टाचा खर्च तुह्मापासून भरून घेतला जाईल. कळावें व तारीख २७ माहे सप्तंबर सन १८७५ इसवी.

(सही) निंबाजी केशव कुळकर्णी
मौजे चिंचोली कारफर्मा
दस्तुर खुद्द.

### नोटिस.

कुंजीलाल छोगमल साहू दुकान अडगाव यांस नोटिस देणार शंकर अपामंयत वारस बायको सरस्वती बाई वहिवाटदार सदाशिव वल्लद झिंगराजी दुकान अढगाव यांज कडून देण्यांत येतें कीं तुमचे आमचे देव घेवींचे खातें हल्लीं पावेतो चालू असून त्याचा हिशेब करून देणें निघेल तें द्यावें किंवा आह्मा कडे तुमचे घेणें निघेल तें घ्यावें ह्मणून तुह्मास अनेक वेळ समक्ष सांगितलें असतां तुह्मी तसें करीत नाहीं यास्तव ही नोटिस दिली आहे तर आज पासून १५ दिवसांत तुह्मी खाते बाकीचा हिशेब करून घेणें निघेल तर घ्यावे किंवा देणें निघेल तर द्यावें सदरील मुदतींत असें न कराल तर तुह्मांवर रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल तारीख २९ माहे सप्तेंबर सन १८७५ इसवी.

वकील पत्रावरून
( सही ) आबाजी खंडेराव
वकील.

## वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन शुध्ध ४ शके १७९७

## रेलवेचीं रिटर्न टिकिटें.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं प्रिन्स आफ वेल्स मुंबईस येणार त्या समारंभास बहुत लोकांस जाण्यास सवड होण्याकरितां तिसरे क्लासाचीं रिटर्न टिकिटें थोडे दिवस काढावीं अशी रेलवे कंपनीस गेले आठवड्यांत आह्मी सूचना केली होती, पण तिनें त्या पूर्वींच विच्यार करून आह्मी इच्छिल्याहूनही अधिक सुगम तजवीज सर्व लोकांकरितां योजिली. ह्मणजे केवळ तिसऱ्याच नव्हे तर चौथ्याही क्लासाचीं रिटर्न टिकिटें मुंबईस जाण्यास मिळतील व तीं तारीख १५ अक्टोबरपासून तारीख ३० नोवेंबर पर्यंत ह्मणजे ४७ दिवस पावेतो केव्हाही चालतील अशी जाहिरात दिली आहे ती पाहिले पृष्ठावर वाचकांचे दृष्टीस पडेल. जी आय पी रेलवे कंपनीच्या या लोकहितार्थ उपायाकरितां आह्मी तिची तारीफ करितों.

## नवीन डायरेक्टर.

या आठवड्यांत एक मोठी महत्वाची बातमी ऐकण्यांत आलेली आहे ती आह्मी आज प्रसिध्ध करतों. ती ही कीं रावसाहेब नारायण भाई दांडेकर यांस उत्तम लोकवासी मेहेरबान डाक्टर सिंक्लेर सा० यांचे विद्या खात्याचे डायरेक्टरचे जागेवर हिंदुस्थान सरकारानें नेमलें. ही बातमी ऐकून एके प्रकारानें सर्व नेटिव लोकांस व सर्व नेटिवांचे हित चिंतणार लोकांस आनंद होईल यांत संशय नाहीं. लार्ड नार्थब्रूक साहेबांनीं एवढ्या मोठ्या जागेवर नेटिवाची योजना केली व ज्या खात्यांत मोठाले युरोपियन अधिकारी व सिविलियन देखील आहेत त्या खात्याचे मुख्य अधिकारी पुण्याकडील एक विद्वान गृहस्थास नेमलें तेव्हां लार्ड साहेबांनीं नेटिवांस मोठा मान दिला व नेटिवांचे कल्याणा विषयीं खरोखर कळकळ त्यांचे मनांत आहे असें पूर्णपणें दिसून आलें तेव्हां या संबधानें पाहिलें असतां ही मोठी आनंदाची गोष्ट आहे.

परंतु आमचें मत असें आहे कीं आणखी कांहीं वर्षें पर्यंत वऱ्हाडांत शाळा खात्यावर युरोपियन अधिकारी असावे हें बरें आहे व यापासून नेटिवांचें कल्याण अधिक आहे. पंधरा वीस वर्षांनीं कदाचित नेटिव डायरेक्टर नेमण्याजोगी वऱ्हाडची स्थिति होईल व व्हावी अशी सर्वांची इच्छा आहे परंतु आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं आज तशी स्थिति नाहीं. वऱ्हाडांत विद्येचा उत्कर्ष होणें तो अमलाचे जोरानें व्हावा अशी सांप्रतची स्थिति आहे. हल्लीं शाळाखात्यावर युरोपियन अधिकारी आहेत तरी सरकारांचे मनांत लोकांनीं विद्या शिकावी असें आहे व आपण शिकलों तर सरकारची व आपले अमलदाराची खुशी होणार आहे असें वऱ्हाडचे रयतेच्या मनांत पक्कें वागावें ह्मणून इकडील फौजदारी मुलकी खात्याचे अधिकारी डेपुटिकमिशनर यांनीं शाळेचें काम पहावें व शाळेच्या परीक्षा घ्याव्या व सर्व पत्रव्यवहार त्यांचे मार्फत चालावा व नेटिव इन्स्पेक्टर त्यांचे हाता खालीं रहावे अशी व्यवस्था पूर्वींचे सुज्ञ रेसिडेंट सर रिचर्ड टेंपल साहेब यांनीं केली व त्याचा परिणाम किती उत्तम झाला आहे हें इकडील सर्व लोकांस माहित आहे. या खात्याचे अधिकारी युरोपियन असतील तर इकडील अडाणी लोक त्या खात्याचे लोकांस विशेष मान देतील व तें खातें मोठ्या योग्यतेचें असें समजतील. आणि युरोपियन गृहस्थाच्या नुसत्या शद्बानें जें काम होण्याचें तें नेटिवानें कितीही प्रयत्न केला तरी होणार नाहीं. मास्तर लोक व शाळा खात्याचे लोक अर्थांतच जो कोणी अधिकारी असेल त्यास मान देतील परंतु अडाणी लोकांचे दृष्टीनें शाळाखात्याची अब्रू रहाण्यास युरोपियन अधिकारी तूर्त अवश्यक आहे असें आह्मांस वाटतें. डायरेक्टराचे जागेवर नेटिव नेमण्या पेक्षां नवीन दोन सिविलियन असिस्टंट कमिशनर नेमले त्या जागीं विद्वान नेटिवाची योजना झाली असती तर एकंदरीनें देशास व लोकांस अधिक फायदा झाला असता.

आतां नेटिवाची नेमणूक करावयाचीच तर नारायण भाई यांची योजना झाली ही बरोबर आहे किंवा नाहीं याविषयीं पुष्कळ लोकांचीं नानातऱ्हेचीं मतें आमचे कानावर येतात परंतु या गोष्टीचा आतां विच्यार करण्यात कांहीं अर्थ नाहीं. नेमणूक होऊन गेली व आतां यांपासून नेटिवांची अब्रू विशेष होवो अशी आमची मनापासून इच्छा आहे. रावसाहेब नारायण भाई पोक्त व संभावित गृहस्थ आहित यांत काहीं संशय नाहीं.

आह्मास असें समजलें आहे कीं आमचे हुशार एजुकेशनल इन्स्पेक्टर मि. एलियट साहेब परत मुंबईकडे जाणार. हें अगदी स्वाभाविक आहे. परंतु असें होईल तर वऱ्हाडचें मोठें दुर्दैवच असें आह्मी समजतों. मि० एलियट साहेबांचे धाकानें मास्तर लोक अलिकडे आपल्या कामांत किती तत्पर आहित व साहिबबहादुरास किती भितात याचा अनुभव आमच्या कितिएक वाचणारांस असेलच. विद्याखात्यासारख्या विस्तीर्ण खात्यांत चतुर व समजंस अधिकारी असणें व त्याचा सर्वांस दरारा असणें हें हितावह आहे असें सर्व लोक कबूल करतील. त्यांचा इतका धाक असूनही मनुष्याची योग्यता समजणें व योग्य मास्तरास बढती देणें यात एलियट साहेब फार आनंद मानतात हें अलिकडे लोकांस दिसून आलेंच आहे.

## डा. सिंक्लेर साहेबाचे स्मारक कृत्य व प्रमोदसिंधु.

प्रमोदसिंधुकर्ते यांनीं गेले अंकांत डाक्टर सिंक्लेर साहेब यांचे स्मारक कृत्या बद्दल झालेले विच्यारावर बरेंच कांहीं पांडित्य करून शिव्यागाळी केल्या आहेत. याविषयीं आह्मांस कांहीं लिहिण्याचें कारण नव्हतें, परंतु आमचे बंधूचे जे कांहीं गैर समजुतीचे लेख आहेत त्यांमुळें लोकांचे मनांत वाईट ग्रह येतील या करितां आह्मी आजचे अंकांत खरा मजकूर काय आहे तो लिहितो.

आमचे बंधू स्मारक कृत्य करणें व उपकार फेडण्याचा प्रयत्न करणें या दोन गोष्टी एकच आहित असें समजतात. सिंक्लेर साहेबांचे चार मुलांचा चरितार्थ त्यांचे मागें चालविणें हें श्रेयस्कर खरें व साहेब बहादुर त्यांचे विद्याभ्यासाकरितां ४।५शें रुपये दरमहा खर्च करीत होते ते त्यांच्या मागें वऱ्हाडांतून गेले असते किंवा जातील तरीही बरें; परंतु सर्व श्रेयस्कर व पुण्य कारक कृत्यें नेहेमी आपल्या हातून होतात असें नाहीं व कांहीं आपल्या शक्तीच्या बाहेरही असतात. विलायतेंत प्रत्येक मुलाचे विद्येस किती खर्च लागतो हें कदाचित प्रमोदसिंधु कर्ते यांस ऐकून माहित असेल तेव्हां हजार दीड हजार रुपये सिंक्लेर साहेबांचे मुलांकडे एकवार पाठवून त्यांच्या स्थितींत विशेष बदल होणार नाहीं हे खचित आहे व मंडळीनें जो विच्यार केलेला आहे तो सिद्धीस नेण्यांत साहेबांचें नाव वऱ्हाडच्या युनिव्हर्सिटीच्या संबधानें निरंतर रहाणार आहे. आपलें नाव रहावें व कीर्ति व्हावी याबद्दल सिंक्लेर साहेबांस केवढी उत्कंठा होती व वऱ्हाडचे लोकांस युनिव्हर्सिटींतून विद्या प्राप्त व्हावी याविषयीं झटण्याची त्यांस केवढी हौस होती ती त्या साहेबांची आमचे बंधू पेक्षां ज्यांची विशेष ओळख होती व ज्यांसी त्यांचें संभाषण नेहेमी होण्याचे प्रसंग येत होते त्यांस अनुभवावरून चांगली माहित आहे याज करितां त्यांचें नाव राहण्याकरितां कांहीं तरी तजवीज करणें अवश्यक होतें व शाळाखात्याच्या लोकांचा सिंक्लेर साहेबांचे उपकार फेडण्याचे प्रयत्न करण्याचा मुळींच इरादा नव्हता. कारण हा हेतु अगदीं त्यांचे शक्तीचे बाहेर आहे असें त्यांस वाटेल. स्मारककृत्य ह्मणजे असें कृत्य कीं जेणेंकडून साहेब बहादुराचें स्मरण आपल्या लोकांत चिरकाल राहील तें करावें असा मंडळीचा उद्देश होता व तो आपले समजुतीप्रमाणें व शक्तीप्रमाणें सिद्धीस नेण्याचा प्रयत्न ते करीत आहित. विलायतेस पैसे गेल्यानें साहेबाचें नाव इकडे राहील असें आह्मांस वाटत नाहीं.

प्रमोदसिंधुकर्ते ह्मणतात कीं, शाळाखात्यांतील लोकांनीं अ.[illegible] बाह्यप्रीति व पोकळ मोठेपणा दाखविला. बाह्यप्रीति ह्मणजे काय व ती कशासाठीं दाखवितात हें आमचे बंधूस माहित आहे ? खरोखरी अंतःकरणापासून प्रीति नसतां ती उगीच वरकांती दाखविली तर ती बाह्यप्रीति होईल. ही दाखविण्याचा हेतु कांहीं फायदा व्हावा असा असतो. सिंक्लेअर साहेब तर मरण पावले तेव्हां त्यांच्यावर आपली प्रीति दाखवून काय फायदा शाळाखात्यांतील लोकांस होणार आहे ? शाळाखात्याचे युरोपियन अधिकारी किंवा दुसरे मुलकी खात्यांतील अधिकारी कोणी सिंक्लेअर साहेबांचे आप्त सोयरे किंवा एवढे मोठे मित्र आहेत काय कीं, त्यांचा अशा बाह्य प्रीतीपासून शाळाखात्यांतील नेटिव लोकांविषयीं चांगला ग्रह होईल ? जो मनुष्य मेला व ज्याचें कोणी संबंधी किंवा मित्र नाहीं त्यांचें नाव देशांत रहाण्याकरितां पांच चारशें लोकांचें एकमत होऊन कोणी न विच्यारितां व कांहीं प्राप्तीचा संभव नसतां मुद्दाम सर्वांनीं पदरचे पैसे खर्चावे हें बाह्यप्रीतीचें लक्षण आहे असें आह्मास वाटत नाहीं. बाह्यप्रीति दाखविणारे जे गृहस्थ असतात ते मेलेले किंवा बलहीन जे लोक असतात व ज्यांपासून आपणाला कांहीं भीति नसते अशा लोकांवर शिव्यांचा भडिमार करितात व जे अधिकारीं असून ज्यांचा काळ चालता आहे व ज्यांपासून आपणास फायदा होण्याचा संभव आहे अशांची अप्रयोजक व अन्यायाच्या कृत्याकरितां देखील फार स्तुति करितात. हिंदु लोकांनीं कांहीं सत्कृत्यास आरंभ केला तर त्यांचें तें करणें शरमेचें आहे व प्रबुद्धपणास बट्टा लावणारें आहे वगैरे ह्मणणें व एखाद्या साहेबानें एखाद्या अनाथ हिंदूस अन्यायानें धुळीस मिळविण्याचा प्रयत्न केला तरी त्याची स्तुति करणें यांत कदाचित कांहीं बाह्य असेल तर कोण जाणें! शिवाय शाळाखात्यांतील लोकांचा जर बाह्यप्रीति दाखविणें हाच हेतु होता तर विलायतेस तेच पैसे पाठविल्यानें तो सिद्धीस गेला नसता काय ?

प्रमोदसिंधुकर्ते ह्मणतात कीं वऱ्हाड प्रांत अगदी विद्याशून्य अशा स्थितींत असतांही मोठ्या काळजीनें व अंतःकरणपूर्वक परिश्रमानें इकडील लोकांस साहेबांनीं अल्प काळांत विद्यादान दिलें- हें उपकार फेडण्याचा विच्यार करण्यासारखें आहे. तर याची फेड करण्याचा प्रयत्न करणें हें

कोणाचे काम आहे? वऱ्हाडवासी गृहस्थांनी कीं सिंक्लर साहेबांस मदत करणाऱ्या शाळाखात्यांतील लोकांचें ? कोणी एका परोपकारी पुरुषानें एखादा देशांतील लोकांचे सोई करितां गावोगाव धर्मशाळा बांधल्या तर त्याचे उपकार कोणावर झाले? त्याचीं मुलें बाळें उघडीं पडलीं तर त्यांचे संगोपन करण्याचें काम त्या देशांतील लोकांचे किंवा त्यानें लावलेल्या सुतार व गंवड्यांचे ? तसेंच एखाद्या परोपकारी वैद्यानें फुकट औषधें देण्याचा क्रम ठेविला आणि पुष्कळ लोकांचे प्राण वाचविले तर त्याचे उपकार लोकांनीं स्मरावे किंवा त्याच्या घरच्या औषध कुटणाऱ्या मनुष्यानीं? कांहीं वर्षां पूर्वी मुंबईंत एका वर्तमान पत्राचे एडिटरानें सरकाराशीं भांडून आपलें नुकसान देखील करून घेऊन नेटिव लोकांचा फायदा करून दिला वतो किती एक वर्षेपर्यंत नेटिवाच्या तर्फेचा असे या मुळें त्याचे पुष्कळ युरोपियन वर्गणीदार कमी झाले तेव्हां नेटिव लोकांनीं लाख रुपये जमवून त्या एडिटरास विलायतेस जाते वेळीं दिले. त्या वेळेस आमचे उमरावतीकर बंधू मुंबईस असते तर त्या कारखान्यांतील कंपाझिटर, रिपोर्टर व सबएडिटर यांस त्यांनीं वर्गणी जमवून एडिटर साहेबाचा उपकार फेडण्याचा प्रयत्न करण्याविषयीं बाह्य उत्कंठेनें उपदेश करून दोन च्यार शिव्या हसडल्या असत्या!

यावरून शाळाखात्यांतील लोकांवर सिंक्लर सहेबांचे उपकार मुळींच नाहींत असें आह्मी ह्मणत नाहीं. वरील उदाहरणांत धर्मशाळा बांधणाराचे, वैद्याचे व एडिटराचे उपकार त्यांच्या चाकरांवर एका प्रकारानें आहेत हें खरें आहे व त्या चाकरांस अधिक रोजमुरा दिला व प्रीतीनें वागविलें तर तेच उपकार (या जगांतील पुष्कळ धनी क्रूर व अन्यायी असल्यामुळें) अधिकसे वाटतात हेंही खरें आहे; तथापि या सर्व गृहस्थांस परोपकारी ह्मणून जी संज्ञा प्राप्त झाली ती कांहीं आपले चाकरास व परोपकार करण्याचे कामांत मदत करणाऱ्यास प्रीतीनें वागविलें यामुळें झाली नाहीं, लोकांवर व ईश्वराच्या प्रजेवर उपकार केल्यामुळें झाली. तसेंच डाक्टर सिंक्लर साहेबांची मुख्य जी कीर्ति झाली आहे ती वऱ्हाडांत विद्येचा प्रसार केला व एथील लोकांस ज्ञानामृत पाजलें यामुळें झाली आहे. याकरितां उपकार फेडण्याचा प्रयत्न एतद्देशीय लोकांनीं करावा हें योग्य आहे.

आमचे उमरावतीकर बंधु कित्येक गोष्टीमध्यें स्तुत्य उद्योग करतोसें दाखवितात. वक्तृत्वोत्तेजक सभेचे हेच पुढारी आहेत. हे डाक्टर सिंक्लर साहेबांचे मुलांविषयीं फार कळकळ दाखवितात तर वऱ्हाडचे लोकांनीं या कामीं कांहीं वर्गणी द्यावी याविषयीं यानीं कांहीं प्रयत्न केला आहे काय? अकोल्यांत सभा झाली तेव्हां शाळाखात्यांतील लोकांशिवाय गृहस्थ असे पाच चार देखील नव्हते- ज्या लोकांनीं कोणी न सांगता व बाहेरच्या कोणाची मदत न मागतां पदरचे पैसे खर्च केले त्यांस शिव्या देऊन आपण स्वस्थ बसणें हे "वाह्य" कळकळीचें लक्षण नव्हे काय?

शाळाखात्यांत लोक सुमारे सहाशे त्यांत मोठे पगाराचे थोडे तेव्हां त्यांचे हातून मोठीशी रकम सिंक्लर साहेबांचे मुलाकडे जाईल असें आह्मास वाटत नाहीं. या कामास वऱ्हाडचे लोकांचीं मदत पाहिजे व ते लोक कोणी तरी मोठ्या मुलकी अधिकाऱ्यानें मनावर घेतल्याखेरिज कांहीं मदत देणार नाहींत; आणि याकामांत कोणी अधिकारी मन घालील अशी आह्मास बिलकुल आशा दिसत नाहीं. आमचे बंधू कांही खटपट करून वऱ्हाडचे लोकांची वर्गणी जमवितील तर आह्मी त्यांस खातरीनें सांगतों कीं शाळाखात्यांतील पुढारी लोक आपल्या बुध्दीप्रमाणें स्मारक करण्याचें काम करूनही उपकार फेडण्याचे कामांत आणखी मदत करतील.

## वऱ्हाड.

निजाम सरकार नोवेंबरच्या दुसरे तारखेस निघून एक दिवस पुण्यास राहून पांचवे तारखेस मुंबईस जाणार असें समजतें. त्यांनां रहाण्याकरितां १८००० रुपये भाड्यानें एक बंगला घेतला आहे. व तो पुरणार नाहीं ह्मणून सात हजार, तीन हजार, व साडेतीन हजार रुपये भाड्याचे आणखी तीन बंगले घेतले आहेत असें कळतें.

मलकापुरचे कायम तहशिलदार मि० त्रिंबकराव यशवंत रजेवरून आपले कामावर रुजू झाले व मि. बाकर अली पुन्हा उमरावतीस आनररी माजिस्ट्रेट झाले.

रा. रा. वामनराव प्रभाकर परांजपे मलकापुरचे स्कुल मास्तर यांची नोकरी १९ वर्षांहून अधिक झाली सबब पेनशन घेण्याचे इरादानें वेगवेगळ्या ठिकाणच्या आपल्या वेगवेगळ्या नोकऱ्यांचा तक्ता त्यांनीं डायरेक्टरकडे पाठविला होता तो त्यांनीं योग्य अधिकाऱ्याकडे पाठवून रुजू करून आणिला. आतां त्यांनां पेनशन मिळण्यास कांहीं हरकत राहिली नाहीं. तरी आह्मांस वाटतें कीं काम करण्या लायक त्यांची शरीरप्रकृती अजून चांगली आहे याजकरितां त्यांनीं किंवा अधिकाऱ्यांनीं त्वरा न केल्यास त्यांजकडून बरेच दिवस शाळेचें काम सुरळीत चालेल. वामनराव पुष्कळ दिवसांचे शिकलेले, हुशार, व चपळ आणि स्नेहाचे ठिकाणीं मोठे तत्पर असे आहेत, त्यांस पुढें त्यांच्या उत्तर वयांत पेनशनाची सोय होऊन निर्वाहाची धास्ती राहिली नाहीं हें पाहून आह्मांस फार संतोष वाटतो.

रा. रा. नारायण बाबाजी जोशी इलिचपुरचे लोकलफंड इंजिनियर यांस बुलढाण्यास नेमल्याप्रमाणें या आठवड्यांत ते तिकडे जाणार होते. बुलढाण्याचे नवीन लोकलफंड इंजिनियर जे पारशी गृहस्थ आहेत त्यांस कोठें नेमिलें तें कळलें नाहीं.

अकोल्यास रविवारचा आठवडे बाजार आहे तो बदलून सोमवारचा होणार अशी दोन तीन आठवडे लोकांत बातमी पसरली आहे पण ती अगदीं खोटी आहे असें आह्मी सर्वांस कळवितों. डिपुटि कमिशनर साहेबांचा किंवा म्युनिसिप्यालिटीचा बाजारचा दिवस बदलण्याविषयीं मुळींच कांहीं बेत नाहीं.

हवाखान्यावरील हिंदुस्थानी मास्तरची जागा मि० इमामबेग यांचे जाण्यानें रिकामी झाली होती तिजवर मि० ममताज अली नावाचे एक गृहस्थ अलीकडे थोडे- दिवस उर्दू अकबाराचे एडिटर होते त्यास नेमिलें असें समजतें.

असें ऐकतों कीं क्या० बुलक साहेब अकोल्याचे डिपुटी कमिशनर एक वर्षाची रजा घेऊन विलायतेस जाणार.

मेजर अलार्डाइस साहेब इकडील कायमचे जुडिशियल कमिशनर यांची रजा डिसेंबरचे ४थे तारखेस पुरी होते व त्यापूर्वींच ते खास परत येणार असें समजतें.

सिकंदराबादचे क्यांटनमेंट माजिस्ट्रेटची जागा मद्रास सेकंड लाईट क्यावलरींतील मेजर ए एच ई क्यांबेल क्याड्री रेसिडेंट साहेबाच्या एस्कार्टेचे ( पाहरा )कंम्यांडर यास दिली.

उमरावतीहून म्याट्रिक्युलेशनच्या परिक्षेस ८ उमेदवार जाणार असें पूर्वी लिहिलें होतें. हल्लीं असें समजतें कीं खाजगी शिक्षणापैकीं नववा एक उमेदवार उमरावतीहून जाणार आहे.

इलिचपुर जिल्ह्यांत येका बाईनें आपल्या उपजलेल्या मुलाचा खून केला त्या मुकदम्याच्या सेशन चौकशी करितां जुडिशियल कमिशनर साहेबांची स्वारी तिकडे गेली आहे. उदईक मुकदमा चालणार. जारकर्मानें ती गरोदर असल्याचा तिजवर शक होता परंतु तिच्या नवऱ्याचें ह्मणणे आहे कीं गर्भ माझे पोटचा होता असें असतां बायको बाळंत झाली किंवा नाहीं, मूल झालें किंवा नाहीं, व झालें असल्यास त्याचें काय झालें याविषयीं नवऱ्यास कांहीं ठाऊक नाहीं. बायको ह्मणते कीं त्यावेळीं तो शेतावर गेला होता व परत घरीं आल्यावर मला आठवण राहिली नाहीं. हा बाळंतपणाचा विलक्षण मासला होय यांत संशय नाहीं.

मोर्शीचे तहशिलदार रा. रा. गोविंदराज अप्पा ४ दिवसांची रजा घेऊन गेले रविवारीं येथें आले होते ते गुरुवारीं परत गेले.

येथें नारायण विष्णु सहस्त्रबुध्दे यानावाचा येक मुलगा ख्रिस्ती होण्याच्या तयारींत आहे. सुमार तीन महिने झाले तो येथील मिशनस्कुलांत १२ रुपये पगारावर असिस्टंट मास्तर आहे. व सुमार १९ दिवस झाले त्यानें आपले बिऱ्हाड रेवरेंड सिदोबा यांचे घरीं ठेविलें आहे. त्याचा भाऊ व दुसरे गृहस्थ त्यानें ख्रिस्ती होऊ नये ह्मणून त्यास उपदेश करण्याकरितां बहुतवेळां त्याकडे गेले होते परंतु तो अतां पराङ्मुख होत नाहीं. इंदापुरास रे. नारायण शेषाद्री यांच्या मिशन स्कुलांत त्यानें कांहीं वर्षे अभ्यास केलेला आहे व आतांही त्याचे धर्मांतर संस्काराकरितां रे० नारायण सा० येथा आठवड्यांत येथें येणार आहेत. या मुलाचे धर्मांतर खात्रीचें नसून कांहीं मोहपाशाचे आहे असें ह्मणतात.

जाई कसबीण इला रामचंद्र पांडुरंग हेड कानस्टेबल याला मारल्या बदल २ वर्षें सक्त मजुरी कैद व १०० रुपये दंड अशी शिक्षा क्या० निकोलिट साहेब यांजकडे झाली.

उर्दू अकबारावरून पुढील बातम्या समजतात.

रा. मोहनीराज गोविंद जळगावचे माजी नायब तहशिलदार यांस वकिली करण्याची परवानगी मिळाली.

मि० इलियट साहेब आफिशिएटिंग डायरेक्टर दोन महिन्यांची रजा घेऊन मुंबईकडे जाणार.

नाजर प्रकरणाचा निकाल आणखी एक महिना होत नाहीं.

## वर्तमानसार

डा० डइलसन साहेब अत्यावस्थ आजारी आहेत असें पुन्हा वर्तमान आलें आहे.

अमदाबादेस साबरमती नदीला अतिशय पूर येऊन २०००० मनुष्यांचीं घरें जमीनदोस्त झालीं. व नुकसान सुमारें १९ लक्ष रुपयांचें झालें- वर्गणीच्या यादी अनाथास मदत करण्याकरितां मुंबई, पुणें, वगैरे ठिकाणीं होत आहेत. बडोद्याचे गायकवाड यांनीं ३००० रुपये दिले. मुंबईस ३१००० रुपये जमले. आणखी चोहोकडे जमा होत आहे.

पुण्यास गाढवास मिरवावयाचे प्रकरणांतील गर्दी करणारे दोन इसम गणु शिपाई व गणु बुकबाइंडर यांस माजिस्ट्रेटानीं नऊ नऊ महिन्यांची कैद व पांच पांचशें रुपये दंड ठरविला होता त्यावर अपील झालें त्यांत सहा महिन्यांची कैद व ५०० रुपये दंड माफ होऊन फक्त तीन तीन महिन्यांची कैद कायम राहिली असें कळतें.

मुकुंदराय मणिराय सुरतेचे सबार्डिनेट जड्ज बडोद्यास गेले होते ते तिकडे राजिनामा देऊन पुन्हा सुरतेंत आपले पाहिले कामावर आले.

पंजाबांत गुदस्त सालीं ३९६३३६८ रत्तल कापुस पिकला. वर्षानुवर्ष तिकडे कापसाची लागवड अधिक होत आहे. कापसाकडे गेले सालीं ३९१९६ एकर जमीन मागच्यापेक्षां अधिक लागवडीं होती. तिकडील पिकांचे मान एकरास ७० रत्तल कापुस होतो असें आहे.

वेलुर येथें महामारीचा उपद्रव सुरू आहे. एका आठवड्यांत २७३ मनुष्ये मरण पावलीं असें कळतें.

पांडुरंग केशव पुण्याचे पोलिस सुपरइंटेंडेंट आफिसांतील क्लार्क यांस पुण्यास चीफ कान्स्टेबल नेमिलें.

अजमिरास गेल्या आठवड्याच्या आरंभास पांच दिवस अहोरात्र पाऊस पडला.

सिंधचे कमिशनर नोवेंबर महिन्यांत प्रिन्स आफ वेल्स यांचे भेटीकरितां मुंबईस येणार.

कलकत्त्यास प्रिन्सफंड ७०४६३ रुपये जमला, व नित्य त्याला वाढ आहे.

मि० मणीभाई जसभाई यांस बडोद्याकडे नेटिव असिस्टंट रेसिडेंट नेमून काठेवाडाकडे गोंडल संस्थानावर त्यांस मुकर केलें. पगार दरमहा ५०० रुपये.

मि० शेख अमीरूदीन या नावाचे एक मुसलमान गृहस्थ बारिस्टरची परीक्षा देण्याकरितां विलायतेस या आठवड्यांत जाणार.

उटाकामंड येथें चहाचे लागवडीकरितां एक मोठा व सुंदर बाग केला आहे. व त्यांत कांहीं मुलांस बगीच्या संबंधी शिक्षणही देत असतात.

मद्रास शहरांतील महामारीचा उपद्रव कमी होत चालला आहे.

म्हैसूर प्रांताची टोपोग्राफिकल सरव्हे करावी असा ठराव झाला.

सर जंग बहादुराचे बंधू जनरल रणदीपसिंग हे प्रिन्स आफ वेल्स बरोबर हिंडणार आहेत.

नवीन सिविल सर्व्हिस पास झालेले मि० ब्रिजेंद्रनाथ यांस पाटणा जिल्ह्यांत शहाबाद येथें असिस्टंट माजिस्त्रेट नेमिलें.

नागपुर इलाख्यांत गुदस्त सालीं जंगल खात्याचें उत्पन्न ६६१७७९ रुपये झालें. हें तिगस्त सालापेक्षां सुमार एक लक्ष रुपयांनीं अधिक आहे.

बडोद्याचे गायकवाड सरकार मुंबईस २००० लोकानिशीं येणार.

मि. गोपिनाथ सदाशिवजी मुंबई हाय कोर्टांतील वकील यांस बडोद्याकडे अमरोलीस जडज नेमिलें.

रा. सा. गजानन विठ्ठल अमदाबादचे पोलिस इन्स्पेक्टर यांस सर रिचर्ड मीड यांनीं ७५० रुपयांची जहागीर देण्याविषयीं शिफारस केली होती व ती सर टी माधवराव यांनीं नकारली, कारण बडोदा संस्थानची कामगिरी गजानन यांनीं कांहीं केली नाहीं असें टाइम्स आफ इंडिया पत्रांत वर्तमान प्रसिद्ध झालें होतें त्या संबंधानें बडोद्याचे असिस्टंट रेसिडेंट क्या. जाकसन यांनीं एक पत्र टाइम्समध्यें छापविलें आहे त्यांत ते असें ह्मणतात कीं ही गोष्ट समूळ खोटी आहे. मीड साहेबांनीं जहागिरीची शिफारस केली नाहीं व सर टीनीं त्यांत बिबा घातला नाहीं. आह्मी ही ह्मणतो कीं असें असल्यास फार चांगलें. गजानन यास जाहगीर मिळण्यासारखें सर्व लोकांस मान्य असें कांहींच काम त्यांजकडून झालें नाहीं सबब त्यांस कोणत्याही सरकाराकडून जाहगिर मिळूं नये.

गजानन यांचे नाव इंग्रजी पत्रांतून गजानंद असें येत असतें तें कां तें समजत नाहीं. त्या ठिकाणीं गजानन असावें.

सालेम येथें दररोज ३०।४० मनुष्यें मरतात. सर्व शाळा बंद ठेविल्या आहेत. व दररोज २०० बाण सोडावे असा ठराव केला आहे. म्हैसुरास उपद्रव कमी होत चालला आहे व कर्नुलास सुरुवात होऊं लागली आहे.

मुंबईच्या म्युनिसिप्यालिटीचे चेरमन मि० डोसाभाई फ्रामजी यांस नेमिलें.

हिंदुस्थान सरकारानें इजिप्त देशच्या खिडवीला ७ हत्ती नजर पाठविण्याचा विचार केला आहे. त्यासाठीं आगबोटीचें भाडें ३५००० रुपये ठरविलें आहे. त्या शिवाय दरहत्तीबरोबर १५ रुपये पगाराचा एकेक माहुत व १० रुपये पगाराचा एकेक गडी दोन वर्षेपर्यंत त्या हत्तीबरोबर सरकार आपले खर्चानें इजिप्त देशांत ठेवणार.

टांकचा नवाब मरण पावला असें वर्तमान होतें तें खोटें आहे असें कळतें.

बडोद्याचे दामोदर पंत नेने मुंबईस गेले आहेत. व तिकडेच रहाणार असें कळतें.

---

पुढें लिहिलेले नियम कुटुंबामध्यें उत्तम प्रकारची शांतता रहावी याकरितां इंडियन मिरर पत्रांत दिले आहेत हे आह्मी आमच्या वाचकांकरितां प्रकट करितों.

१. आपली इच्छा प्रतिदिवशीं भंग होण्याचा संभव आहे हें ध्यानांत ठेवून आपल्या मर्जीप्रमाणें झालें नाहीं तर आपणास वाईट वाटूं नये ह्मणून सावध असावें.

२. कोणताही मनुष्य सर्वगुणसंपन्न नाहीं हें जाणून त्याच्या हातून कोणतीही गोष्ट सर्वथैव निर्दोष घडेल अशी कधींच आशा बाळगूं नये.

३. कुटुंबांतील प्रत्येक मनुष्याचा स्वभाव व गुण यांची पूर्णतेनें माहिती करून घ्यावी.

४. आपल्या स्वाधीन केलेल्यांचा सांभाळ करणें जसें आपणास जरूर आहे, तसेंच कुटुंबांतील प्रत्येक मनुष्याविषयीं समजावें.

५. कुटुंबांतील कोणत्याही मनुष्यास कांहीं आनंददायक गोष्ट झाली असतां त्याविषयीं आनंद मानावा.

६. एकाद्यास क्रोधानें उत्तर देण्याचा प्रसंग आला असतां तो सुज्ञपणानें टाळावा.

७. अजारीपणा वगैरेच्या प्रसंगीं आपल्या मनास त्रास झाला असतां विवेकानें त्याचें दमन करावें.

८ दुसऱ्याची जर तशी स्थिति झाली तर आपण त्याशीं मृदुभाषण करून त्याच्या दुःखाचें शांतवन करावें.

९. कुटुंबांतील मनुष्यांस खुष करण्याचा हरएक प्रसंग आला असतां तो दवडूं नये.

१०. आपली कशीही स्थिति असली किंवा आपणावर अनेक जरी प्रसंग गुजरले तरी न त्रासतां, हें सर्व आपल्या हिताकरतां ईश्वरानें केलें आहे असें समजून उदास होऊं नये.

११. आपल्या चाकरांशीं मृदु भाषण करावें व प्रसंगानुसार अल्पस्वल्प कारणासाठींही त्यांची स्तुति करावी.

१२. सुखोपभोगाच्या अल्प जरी गोष्टी असल्या तरी आपण त्यांचा उपभोग कुटुंबांतील सर्व मनुष्यांच्या मागून घ्यावा.

१३. नेहमीं मृदु व गोड भाषण करण्याविषयीं प्रयत्न करावा कीं जेणेकरून आपणावर कोणाचाही क्रोध होणार नाहीं.

१४. कोणी निर्दय भाषणानें किंवा कृत्यानें आपलें मन दुखाविलें तर आपण आपल्या मनास " ( याचप्रमाणें मी दुसऱ्याचें मन अनेक वेळां दुखविलें असतां त्यावद्दल मला तितकेवेळ क्षमा झाली नाहीं काय ? ) " असें विचारावें.

१५. संभाषणांत आपली स्तुति न करितां केवळ दुसऱ्याचीच करीत असावी.

१६. मुलांशीं फार सौम्यता धरून त्यांस सन्मानानें वागवावें. सु. प.

---

उत्तरध्रुवाचा शोध—युरोपखंडांतील दोन तीन राष्ट्रांनीं उत्तरध्रुवाचा ह्मणजे पृथ्वीच्या उत्तर शेवटाचा शोध लावण्याकरितां वेळोवेळीं लोक तारवें देऊन पाठविले होते परंतु शोध लागला नाहीं. इंग्रज लोकांनींही उत्तर ध्रुवाच्या शोधार्थ लोक पाठविले होते परंतु प्रयत्नाचें फल प्राप्त झालें नाहीं. गेल्या मे महिन्यांत विलायत सरकारानें पृथ्वीच्या उत्तर शेवटचा ठिकाण लावण्याकरितां कांहीं लोक पाठविले आहेत. उत्तर अमेरिका व ग्रीनलंड नावांचें बेट यांमध्यें जो उपसागर आहे त्यांतून जाऊन पुढें ध्रुवाकडेस ते लोक जाणार. मध्यंतरीं हिंवाळा येईल तेव्हां एकशेवीस दिवसांची रात्र होईल. या काळोखांत हे लोक कोठें तरी समुद्रांत अथवा जमीन लागल्यास तेथें मुक्काम करणार आहेत. एकशेवीस दिवसांचा काळोख घालविण्याच्या सोई केल्या आहेत त्या अशा. खगशास्त्रवेत्ते मोठमोठ्या नलिकायंत्रांच्या सहाय्यानें निरनिराळीं नक्षत्रें व ग्रह यांच्या कक्षा व परस्पर अंतरें वगैरे पाहणार. तारवांतील खलाशांस नौकागमन शास्त्र वगैरे शास्त्रीय विषय शिकविणार, याशिवाय करमणुकीकरितां गायन, वाद्यें, गारोड्याचे खेळ वगैरे सर्वप्रकारच्या सोई तारवांत करून ठेविल्या आहेत. सुमारें पंचायशीअक्षांश पावेतों तारवास मार्ग मिळेल असा सुमार बांधला आहे, व तेथून पुढें ध्रुवापावेतों सुमारें छप्पन दिवसांचा रस्ता रहातो. हा मार्ग क्रमण करण्याकरितां एकाप्रकारच्या होड्यांसारख्या विनचाकी गाड्या तयार केल्या आहेत. या गाड्यास तद्देशीय हरणें जुंपणार. तारूं जाण्याचा मार्ग खुंटल्यानंतर तेथून एकंदर सहा गाड्या अन्नादि पुष्कळ सामग्री घेऊन निघतील पाच दिवसपर्यंत बर्फातून मार्ग क्रमिल्यानंतर सहा गाड्यापैकीं एका गाडींतील अन्नसामग्री दुसऱ्या पांच गाड्यांत सांठवतील व थोडी सामग्री पुढें जाणाऱ्या गाड्या परततील तेव्हां त्यांस उपयोग पडावा ह्मणून त्या ठिकाणीं सांठवतील व सहावी गाडी तारवाचे ठिकाणीं परत येईल. पुढें गेलेल्या पांच गाड्या पुढें पांच दिवस जाऊन पांचवी गाडी आपली सर्व सामग्री पुढें जाणाऱ्या चार गाड्यांत सांठवून ती मागें परतेल. पुढें दहा दिवस प्रवास केल्यानंतर चवथी गाडी परतेल. याप्रमाणें बाकीच्या गाड्या पुढें जातील. जी गाडी ध्रुवापावेतों जावयाची तिला मात्र पृथ्वीच्या टोंकास पोंचेतोंपर्यंत ह्मणजे सुमारें वीस दिवसपर्यंत एकटीला प्रवास करावा लागेल. छप्पन्नावेदिवशीं ही गाडी ध्रुवास पोंचावी असें अनुमान केलें आहे. ज्या हिमतीच्या पुरुषांनीं ध्रुवाचा शोध लावण्याचें काम पतकरलें आहे त्यांस यश आल्यास शास्त्रीय विषयांची पुष्कळ नवी माहिती होईल यात संशय नाहीं.

---

## नोटिस.

---

जानजी वलद बेडू अहीर कुणबी रहाणार मौजे चीसखेड प्रमणे बटोद तालुके बरणगाव जिल्हा खानदेश यांस नोटिस देणार तुळशी मर्द जानजी अहीर कुणबीण हल्लीं वस्ती पिंपळगाव काळें तालुके जळगाव जिल्हा अकोला इजकडून देण्यात येतें कीं मी तुमची लग्नाची बायको असून आज सुमारे १५।१६ वर्षें पर्यंत तुह्मी मजला वागविलें तुमचे घरीं मला एक मुलगा व मुलगी झाली त्या नंतर दोन वर्षांनीं तुह्मास रक्तपित्तीचा रोग झाला. तुमच्यांत माझें पोषण करण्याविषयीं सामर्थ्य राहिलें नाहीं ह्मणून तुह्मी मनला माझे आईबापाचे घरीं पोंचविलें. माझे भावानें आपले घरीं न ठेवितां तसेंच तुमचे घरीं आणून घातलें २४ दिवस ठेऊन पुन्हा तुह्मी लागलीच पोंहोंचविलें. माझे भावानें नाइलाजानें मला मुलाबाळासहित आपले घरीं ठेविलें. त्यानंतर दोन च्यार महिन्यांनीं झालेला मुलगा मयत झाला त्याजला ६ वर्षें झालीं मध्यंतरीं माझा भाऊ तुमचे येथें येऊन मला घेऊन जाण्याविषयीं बोलला त्यास तुह्मी उत्तर दिलें कीं मला रक्तपित्तीचा रोग झाल्यापासून फार दुःख आहे यामुळें इचा सांभाळ मजकडून होत नाहीं करितां नको. तरी मी आजसहा वर्षें तुह्मी मला नेण्यास याल ह्मणून वाट पाहिली पण आजपर्यंत नेलें नाहीं ह्मणून आतां या नोटिसीनें कळवितें कीं मी आपले भावाचे घरीं सहा वर्षें आहे त्याचे दरमहा रुपये ६ प्रमाणें आकार ४३२ रुपये खर्चावद्दल व तुमचे मुलीचे लग्न माझे भावानीं केलें त्याजबद्दल रुपये २०० येकून रुपये ६३२ देऊन मला आपले घरीं घेऊन जावें मी येण्यास कबूल आहे. ही नोटिस पोंचल्यापासून आठ दिवसांचे आंत माझे भावास रुपये देऊन मजला घेऊन जावें असें न कराल तर मजवर तुमचा बिलकूल हक्क रहाणार नाहीं व मी दुसरा नवरा करीन हें खूप समजावें शिवाय खर्चावद्दल कायद्याप्रमाणें तजवीज करीन कळवि तारीख २४ माहे सप्तंबर सन १८७५ इसवी.

( सही )तुळशी मर्द जानजी अहिर इचे हातची निशाणी बांगडी.

पण

---

हे पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प.

REGISTERED NO. 5 1875

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० १० माहे अक्टोबर सन १८७५ इ० अंक ४१

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०।०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE.

## नोटिस.

OPENING OF THE MUSJID STATION BETWEEN BOREE BUNDER AND BYCULA

**बोरीबंदर व भायखळा या दोन स्टेशनचे दरम्यान मसीद नावाचें नवीन स्टेशन बांधलें आहे त्याची सुरुवात.**

तारीख २० सप्तंबर रोज सोमवारीं वगैरे नंतर पुढें फक्त उतारू नेण्या आणण्याकरितां बोरीबंदर व भायखळा या दोन स्टेशनांचे दरम्यान मसीद नावाचें नवीन स्टेशन सुरू करण्यांत येईल.

उतारू, लगेज, पार्सल्स व कुत्रे सदरील तारखेपासून या रेलवेवरील मसीद व दुसरे स्टेशनांचे दरम्यान पाठविण्यांत येतील.

मद्रास व कलकत्याकडून येणाऱ्या व त्या दिशेस जाणाऱ्या मालट्रेनी मसीद बंदरावर थांबणार नाहींत परंतु त्यांखेरीज या कंपनीचे तारीख १ मार्च रोजीं प्रसिद्ध झालेल्या टाईम बिलांत जाणाऱ्या येणाऱ्या ट्रेनी लिहिल्या आहेत त्या सर्व मसीद स्टेशनावर निरनिराळ्या क्लासचीं टिकिटें घेतलेल्या उतारूंस उतरण्याकरितां उभ्या रहातील.

शनवारीं तिसऱ्या प्रहरीं निघणारी गाडी मुंबईहून ( बोरीबंदरावरून )बरोबर तीन वाजतां कल्याणास जाण्याकरितां निघते तीही मसीद स्टेशनावर उभी राहील.

मुंबईहून ( बोरीबंदरावरून )जाणाऱ्या गाड्या ज्या वेळेस निघतील असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे त्यापेक्षां तीन मिनिटें उशिरानें त्या मसीद स्टेशनावरून निघतील व मुंबईस येणाऱ्या गाड्या ज्यावेळीं भायखळ्यावरून निघतील असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे त्यापेक्षां सात मिनिटें उशिरानें त्या मसीद स्टेशनावरून निघतील.

मसीद स्टेशनावरून बोरीबंदर व कल्याण या स्टेशनास व त्यांच्या दरम्यानचे स्टेशनास जाण्याकरितां ज्यांस एक महिन्याचे किंवा तीन महिन्याचे मुदतीचीं टिकिटें पाहिजे असतील त्यांस तीं खालीं सही करणाराकडे अर्ज केला असतां मिळतील.

जबलपूर, रायचोर व खंडवा यांच्या पलिकडील दुसऱ्या रेलवेच्या स्टेशनावर या रेलवेवरून उतारू नेण्यांत येतात त्या सर्व स्टेशनास मसीद स्टेशनावरून तारीख १ अक्टोबर रोजीं व त्यानंतर पुढें उतारू लगेज, पार्सल्स व कुत्रे पाठविण्यांत येतील.

घोडे व गाड्या मसीद स्टेशनावरून दुसऱ्या स्टेशनास पाठविल्या जाणार नाहींत व दुसऱ्या स्टेशनांवरून त्या स्टेशनास येणार नाहींत.

तारीख २० सप्तंबर रोजीं मसीद स्टेशनावर टेलिग्राफ हपीसही सुरू होईल व तेथून दुसऱ्या स्टेशनास पैसा घेऊन बातम्या पाठविल्या जातील व या स्टेशनास पाठविण्याकरितां दुसरे स्टेशनावर बातम्या घेण्यांत येतील.

**हेनरी कांडर,**

जनरल ट्र्याफिक म्यानेजर.

मुंबई ता १७ माहे सप्तंबर सन १८७५ इसवी.

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE

## नोटिस.

CARTING OF GOODS AT AMRAOTI DISCONTINUED

**उमरावती स्टेशनावरून गाड्यांतून माल पोंचविण्याचें बंद केल्याबद्दल.**

या नोटिसीअन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं, इतके दिवसपर्यंत ही कंपनी उमरावती स्टेशनावरून माल गोळा करून तो गाड्यांतून बिन्हाडीं पोंचविण्याचें काम करीत असे, तें काम तो चालू महिना संपल्यानंतर करणार नाहीं.

माल पोंचविण्याबद्दल जो जास्त पैसा ( म्हणजे माल गोळा करून आणण्याचे अथवा पोंचविण्याचें काम केलें असतां त्याबद्दल जितका पैसा जास्त पडतो तितका) घेण्यांत येतो तो पुढें घेतला जाणार नाहीं. कंपनी माल पोंचविण्याचें काम करीत नाहीं त्यावेळेस जितका पैसा घेण्यांत येतो तितकाच घेतला जाईल.

**हेनरी कांडर**

जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई तारीख २१ सपटेंबर १८७५ इ.

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE

## नोटिस.

VISIT OF HIS ROYAL HIGHNESS THE PRINCE OF WALES

**हिज रायल हायनेस धि प्रिन्स आफ् वेल्स यांचें आगमन.**

revision of fares for passengers and special return tickets.

**स्पेशियल रिटर्न टिकिटें आणि उतारू यांच्या दरांत फेरबदल**

या जाहिरखबरीनें सर्व लोकांस असें कळविण्यांत येतें कीं तारीख १९ अक्टोबरपासून पुढें दुसरी जाहिरखबर प्रसिद्ध होईपर्यंत दर मैलास ३ पै या दराचीं लोकल तिसऱ्या क्लासचीं टिकिटें देण्याचीं बंद केलीं आहेत.

नुसत्या जाण्याच्या किंवा येण्याच्या एकेरी प्रवासाकरितां टिकिटांचे दर पहिले क्लासास दर मैलास १८ पै, दुसरा क्लास ९ पै, तिसरा क्लास ४ पै व चौथा क्लास २॥ पै, इतक्या प्रतिचीं मात्र टिकिटें सर्व स्टेशनांवरून मिळतील आणि तीं सर्व साधारण गाड्या ज्यांतून उतारू जातात त्यांतून जाण्यास उपयोगी पडतील, फक्त चौथ्या क्लासचे उतारू मुंबई आणि जबलपुर यां दरम्यान तसेंच मुंबई आणि सोलापूर यां दरम्यान जाणाऱ्या मेल ट्रेनी म्हणजे टपाल घेऊन जाणाऱ्या आगगाड्या यांत बसविले जाणार नाहींत.

या नोटिसीअन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं तारीख १९ अक्टोबरपासून तारीख ८ नोवेंबर सन १८७५ इसवीपर्यंत व हे दोन्ही दिवस धरून पहिला, दुसरा, तिसरा व चवथा या सर्व क्लासांचे उतारू लोकांस, व घोड्यास आणि गाड्यास मुंबई बाहेरील या रेलवेपैकीं सर्व स्टेशनांवरून बोरीबंदर व भायखळ्यापर्यंत जाण्या येण्यास जो एकंदर पैसा पडतो त्यांतील एक चतुर्थांश कमी करून बाकी पैशाला सदहू स्टेशनांवरून बोरीबंदरचीं व भायखळ्याचीं रिटर्न टिकिटें देण्यांत येतील, व तीं तारीख ३० नोवेंबरपर्यंत व त्या दिवशींही उपयोगी पडतील. बोरीबंदर व भायखळा या दोन स्टेशनांचे दरम्यान मसीद नावाचें नवीन स्टेशन झालें आहे तेथूनही बोरीबंदराला अगर बोरीबंदराहून तेथें जाण्याला रिटर्न टिकिटें फक्त उतारू लोकांस दिली जातील.

तारीख १९ अक्टोबर पासून पुढें दुसरी जाहिरखबर होई पर्यंत मुंबईहून कल्याणास व कल्याणाहून मुंबईस आणि या दोहोंच्या दरम्यानचे सर्व स्टेशनांस तिसऱ्या व चवथ्या क्लासचे उतारूस नुसतें जाण्यास किंवा येण्यास जें हशील लागतें त्याचें दीडपट हशील घेऊन जाण्या येण्याचीं रिटर्न टिकिटें देण्यांत येतील. व तीं जाण्या करितां घेतली असतील त्या दिवशीं, किंवा दुसरे दिवशीं, अथवा शनिवारीं घेतलीं असल्यास रविवारीं किंवा सोमवारीं परत येण्यास उपयोगीं पडतील पहिले व दुसरे क्लासचे उतारू करितां व घोडे आणि गाड्या यांज करितां रिटर्न टिकिटें या स्टेशनांवर व इतर स्टेशनांवर देण्याचा जो संप्रदाय आहे त्याप्रमाणें तीं देण्यांत येतील. त्यांत कांहीं फेर बदल नाहीं.

**हेनरी कांडर**

जनरल ट्राफिक म्यानेजर.

मुंबई ता० २४ माहे सप्तंबर सन १८७५ इसवी.

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेलवे.

NOTICE

## नोटिस.

RATES FOR GRAIN AND SEED

**धान्य व बीजें यांचे दर**

या लेखाच्या द्वारानें सर्व लोकांस जाहिर केलें जातें ऐसाजे, या रस्त्यावर, जबलपुरापलीकडील रेलवेच्या स्टेशनांवरून, होळकर स्टेटरेलवेच्या स्टेशनांवरून, आणि तसेंच जबलपुर व खंडवा यांच्या दरम्यानच्या स्टेशनांवरून, आणि नागपुर व बदनेरा यांच्या दरम्यानच्या स्टेशनांपर्यंत हीं सर्व स्टेशनें धरून धान्य नेण्या आणण्याचे दर कमी करण्यांत आले आहेत.

आणखी, जिंजोली, जवस, मोह अथवा मोहोडा, मोहरी, खसखस, घोडराई, आणि तीळ हीं बीजें लोकल रेलवेमध्यें आणि तिच्याद्वारा इतर रेलवेमध्यें या रस्त्यावरील सर्व स्टेशनांवर आणि तसेंच ही कंपनी ज्या रेलवेवर काम चालविते अशा निजाम स्टेट रेलवे व दुसऱ्या स्टेट रेलवे यांच्या दरम्यानच्या स्टेशनांवर व त्याप्रमाणेंच त्या रेलवेच्या सर्व स्टेशनांच्या आणि जबलपुरच्या पलीकडील दुसऱ्या रेलवेच्या स्टेशनांच्या आणि खंडवा या स्टेशना पलीकडच्या आणि रायचूर पलीकडच्या रेलवे स्टेशनांच्या दरम्यानच्या स्टेशनांवर नेण्याआणण्याचे दर, चालू महिना संपल्यानंतर आणि पुढें दुस

री जाहीरखबर देई तोंपर्यंत धान्याच्या दराप्रमाणेंच घेतले जातील.

मुंबईहून सर्व स्टेशनांवर आणि दुसऱ्या सर्व स्टेशनांच्या दरम्यान लोकल रेलवेच्या आणि तिच्या द्वारा दुसऱ्या सर्व रेल वेच्या स्टेशनांवर धान्य आणि दुसऱ्या प्रकारचीं बीजें नेण्य आणण्याचे दर हल्लीं आहेत त्याप्रमाणेंच रहातील.

विशेष तपशीलवार माहिती सदरी लिहिलेल्या दर कोणत्याही स्टेशनांवर अथवा खालीं सही करणार यांजकडे मागितली असतां मिळूं शकेल.

हेनेरी कांडर
जनरल ट्राफिक म्यानेजर.
मुंबई ता० २९ माहे सप्तंबर
सन १८७५ इसवी.

नोटिस.

सरदारमल्ल नारायणदास दुकान असल गाव तालुके जळगाव यास खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्माकडे आमचे जे कांहीं घेणें निघत आहेत तें ही नोटिस पोंचल्यापासून ८ दिवसांत पाठवून द्यावें. न दिल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धा सर्व पैसा घेतला जाईल. कळावें तारीख ८ माहे आक्टोबर सन १८७५ इसवी.

( सही ) जमनादास वनिचंद दस्तुर गणेश विठ्ठल गुमास्ते दुकान पिंपळगाव काळे.

नोटिस.

हरी वलद विठोबा लांडे वस्ती कंचनपुर तालुके खामगाव यास. कळावें कीं आमची मुलगी गुणी ही तुमची बायको असून ती जाणती झाल्यास सुमारें ५ वर्षे झालीं परंतु तिजला नेऊन नांदवीत नाहा कितीकवेळा पंचाईती झाल्या पण कांहीं उपयोग झाला नाहीं त्यास आजपासून १५ दिवसाचे आंत आपली बायको घेऊन जाणे अगर फारकती देणें याप्रमाणे न केल्यास तिजवर तुमचा कोणतेही प्रकारें लग्नाचा हक्क राहीला नाहीं आह्मी कायदेशीर तिजला पाटाचा नवरा करून देऊं यातून जें वबूल असेल ते नोटिसीने कळवावें तारीख ७ माहे आक्टोबर सन १८७५ इसवी.

( सही ) शामजी वलद भवानी झाले मौजे नागापूर तालुके खामगाव याचे हातची रेघ असे.

# वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन शुध्द ११ शके १७९७

## निजाम सरकार व प्रिन्स.

निजाम सरकार प्रिन्स आफ वेल्स याची भेट घेण्यास नाकबूल आहेत अशा मतलबाचा जो मागें पुकारा झाला होता त्याचें मूळ प्रथम विलायतेंत 'वर्ल्ड' नावाचें वर्तमानपत्र आहे त्यांत आलें. व त्या मजकुरा बरोबर आणखी असाही पुकारा झाला होता कीं प्रिन्स आफ वेल्स यांनी हैदराबादेस निजामाचे भेटीस जाऊं नये; कारण तेथें धर्मवेडे मुसलमान लोक आहेत त्यां पासून समय विशेषीं कांहीं अपाय होण्याचा धाक आहे. या दोहों गोष्टीला हैदराबादचे माजि रेसिडेंट सर जार्ज्य यूल साहेब यांनीं एक जबाब लिहून तो लंडन येथील टाइम्स पत्रांत प्रसिद्ध केला तो आमच्या वाचणारांस कळणें अवश्यक वाटेल ह्मणून आह्मी त्याचें भाषांतर येथें घेतों.

मि० टाइम्स कर्ते यांस—

महाराज, सर्व लोकांचे हिताकरितां हें पत्र आपण प्रसिद्ध करण्याची कृपा करावी अशी विनंती आहे.

तारीख १ सप्तंबरच्या वर्ल्ड पत्रांत मजकूर आला आहे कीं पूर्वेकडील तारायंत्रानें नुकतीच एक आश्चर्यकारक बातमी आली आणि ती इंडिया आफिसांत तेथच्या गोळ्याप्रमाणें येऊन धडकली ती ही का हैदराबादचे निजाम प्रिन्स आफ वेल्स यांचे भेटीस येण्यास निःसशय नाहीं ह्मणतात व याचें कारण गवरनर जनरल यांजकडून अजून समजलें नाहा इत्यादि.

सर सालरजंग यांनीं या गोष्टीची सर्व हकीकत तारायंत्रांतून मला कळविली आहे आणि ही बातमी समूळ खोटी आहे या विषयीं मी सर्व लोकांस माहीत करावें अशी त्यांची इच्छा आहे त्यावरून आनंदानें मी या दोन ओळी लोकांपुढें ठेवितों.

निजाम आणि त्यांचे दिवाण हे प्रिन्स आफ वेल्स यांस भेटण्यास अतिशय उत्सुक आहेत व त्यांच्या शक्तींत आहे तितका त्यांचा ते आदर करूं इच्छितहेत; आणि मला ठाऊक झालें आहे कीं भेटीच्या समारंभाकरितां लागणारे हजारो रुपयांचे तऱ्हेतऱ्हेचें सामान आणण्याची व इतर तयारी करण्याची त्यांनीं पूर्वींच योजना केली आहे; ह्मणून आतां प्रिंस आफ वेल्स हैदराबादेस जाणार नाहींत तर त्यांनीं त्यांची फार मोठी निराशा केल्यासारखें निःसंशय होणार आहे. वेरूळच्या लेण्याच्या ठिकाणीं निजामानीं येऊन प्रिन्स यांस भेटावें असा विच्यार निघाला होता त्यास वेरूळ हैदराबादेपासून साडे तीनशें मैल दूर आहे व तितक्या लांबीचा प्रवास अल्प वयी व अतिशय नाजुक अशा मुलास ह्मणजे निजामास त्रास कारक व धोक्याचा आहे असें डाक्टर लोक व शिक्षक मेजर क्लार्क हे सांगतात त्यामुळें निरुपाय आहे.

याप्रमाणें दिवाणानीं मला खरी हकीकत कळविण्यास लिहिलें आहे ती कळवून मी या संबधानें आपले स्वतांचे दोन शब्द प्रसंगास अवश्यक ह्मणून कळवितों.

सर सालरजंग यांस मी ओळखतों व त्यांचा माझा चांगला घरोबा आहे. त्यांनीं प्रिन्स आफ वेल्स यांची व निजामाची हैदराबादेस भेट इच्छिली यांत निजामास पूर्ण सन्मान व संतोष या शिवाय दुसरें कांहीं असेल असें कल्पिणें ह्मणजे त्या गृहस्थाची योग्यता व त्याची मागील उत्तम कामें हीं समजत असून तद्विपरीत त्यास मानण्या सारखें होय असें मला वाटतें. निजाम वयानें जरी लहान आहेत तरी त्यांच्या तितक्या बुद्धी पुरती त्यांच्या दिवाणा सारखाच त्यांस महाराणी साहेब व त्यांची संतती यांविषयीं पुज्यबुद्धि, अगत्य, व उल्हास जसा असावा तसा आहे या विषयीं मला काहीं मात्र संशय नाहीं. आणि त्या सुंदर मनोवृत्तीस प्रिन्स आफ वेल्स यांनीं त्यांच्या राजधानीस जाऊन भेट न देण्यानें खचवून टाकिल्या सारखें किंवा दुखविल्यासारखें होणार नाहीं काय? ड्यूक आफ एडिंबरो महाराणी साहेबांचे द्वितीय पुत्र मागें हिंदुस्थानांत गेले होते तेव्हां त्यांनीही त्यांस भेटीचा लाभ दिला नाहीं व तसेंच आतां होणार यामुळें ते निराश झाले असले तर त्यांत कांहीं आश्चर्य मानण्यासारखें आहे काय? हिंदुस्थानांतील सर्व राजे लोकांची याद काढून पहा! कोणता राजा त्याचा आपला संबंध झाल्यापासून आज १०० वर्षे निश्चलपणानें परम दोस्त असा राहला आहे? महाराणी साहेबांचे पुत्र हैदराबादेस जाण्याची टाळाटाळ करितात याचें असें एक कारण दाखविण्यांत आलें आहे कीं हैदराबादेंत मुसलमान लोकांची वस्ती फार आहे व तींत धर्मवेडे आणि दंगेखोर असे लोक फार आहेत, तर याविषयीं माझी अशी खात्री आहे कीं हैदराबादेस धर्मवेडे लोक आहेत त्यांपेक्षां हिंदुस्थानांत खुद्द इंग्लिश सरकारचे राज्यांत अधिक आहेत व ते हैदराबादच्यापेक्षां अधिक उपद्रवीक आहेत, हैदराबादच्या तशा लोकांत आवरून धरण्याची लगाम तरी तेथील राजाच्या हातीं बळकट आहे व ती आपले राज्यांत नाहीं, यास्तव अतिशय सन्माननीय राजपुत्र प्रिन्स आफ वेल्स हैदराबादेस आदरातिथ्याकरितां गेले असतां इतर ठिकाणापेक्षां तेथें त्यांस भय प्राप्त होण्याचा संभव फार कमी आहे. आतां निजामाला भेटीकरितां त्याच्या राज्याबाहेर बोलावणें हें सर सालरजंग यांस अधिक अडचणींत व काळजींत घालण्यासारखें आहे परंतु यांनीं या विषयीं कांहीं लिहिलें नाहीं ह्मणून त्याविषयीं वाटाघाट करण्याची मला गरज नाहीं. कळावें

आपला
जी यू यूल.
माजि रेसिडेंट, हैदराबाद.
तारीख ९ सप्तंबर.

या पत्रावरून यूल साहेब आमच्या हिंदुस्थानाचे व विशेषें निजामाच्या राज्याचे मोठे अभीष्ट चिंतक व खऱ्याचें अभिमानी आहेत असें दिसतें व त्यावरून आह्मांस फार संतोष वाटतो. दुर्बुद्धी व नेटिवांविषयीं तिरस्कार ज्यांच्या अंगीं जागृत आहेत असे युरोपियन उलाढाली गृहस्थ आमचे राजां विषयीं व लोकांविषयीं कुकल्पनांचे तरंग हमेशा बाहेर काढीत असतात पण आमच्या देशाच्या भाग्यानें आमची कळकळ बाळगणारे व सत्या करितां भांडणारे असे खरे सत्पुरुषही त्या राष्ट्रांत आहेत ह्मणून बरें, आहे; नाहीं तर सर्वच अवल दरजाचे असते तर आमची कांहीं धडगती न होतां मागेंच आमचा निकाल लागला असता!

## मुलकी उमेदवारांच्या परीक्षा.

गेले महिन्याचे एकोणिसावे तारखेचे आमचे पत्रांत मि० इलियट साहेब विद्याखात्याचे डायरेक्टर यांनीं सरकारी नोकरीस व सरकारी कचेऱ्यांत उमेदवारीस जाऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांच्या परीक्षेची नोटिस छापविली आहे ती सर्वांचे पहाण्यांत आली असेल. रेसिडेंट साहेबांचा तारीख २४ आगष्टचा नंबर ७४ चा जाहिरनामा तारीख ६ सप्तंबरचे रेसिडेन्सी आर्डरींत छापला आहे त्यावरून ती नोटिस तयार केली आहे. व तिजमध्यें जाहिरनाम्यापेक्षां कांहीं अधिक खुलासा केला आहे. रेसिडेंट साहेबांचे जाहिरनाम्यांत असें आहे कीं लिहिणें, वाचणें, व गुणाकार भागाकार चांगला आला ह्मणजे परिक्षेस पुरे आहे, परंतु डायरेक्टर साहेब लिहितात कीं दुसरे नंबरचें सर्टिफिकेट मिळविण्याकरितां ६ व्या यत्तेंतील इंग्लिश विषय शिवाय करून बाकी सर्व विषय परिक्षेस येणाऱ्या उमेदवारास आले पाहिजेत. व पहिले नं. चे सर्टिफिकिटास नववे यत्तेंतील सर्व विषय आले पाहिजेत. खरेंच हे विषय फार आहेत असें नाहीं. आणि दिवसनुदिवस विद्या वाढत आहे व १०।१५ रुपयावरही म्याट्रिक्युलेशन पास झालेले लोक मिळूं शकतात असा हल्लींचा काळ आहे तर गुणाकार भागाकाराची नुसती परीक्षा देणारे लोक आतां काय कामाचे? थोडेच वर्षांत असा काल येण्याचा संभव आहे कीं शेतकरी, माळी, बागवान वगैरे लोकही लिहिणारे वाचणारे व गुणाकार भागाकारे मिळतील. ह्मणून परिक्षेचे विषय डायरेक्टर साहेबांना सहावे व नववे यत्तेचे ठरविले हें फार चांगलें केलें. मुंबई इलाख्यांत मागें मुलकी उमेदवार लोकांच्या परीक्षा होत असत त्याच प्रतीची ही परीक्षा आहे. तिकडे कमिटी नेमीत असत व पुढें ती बंद करून विद्याखात्याकडे परीक्षा सोंपविली तसाच हा प्रकार झाला आहे. व डायरेक्टर साहेबांनीं हायस्कुलाच्या प्रवेश परिक्षेला व तिसरे वर्गाचे परिक्षेला ही परीक्षा जोडून दिली आहे हें एकांत एक बरें केलें. येणेंकरून परिक्षक नेमण्याचे दुबार श्रम वाचले.

ही परिक्षा वऱ्हाडी लोकांकरितां. व वऱ्हाडांतले नसून ५ वर्षे तरी वऱ्हाडांत राहाणाऱ्या लोकांकारितां आहे. यावरून असें दिसतें कीं बाहेर प्रांतांतले नवे नवे लोक नोकऱ्या निमित्त इकडे येतील तर त्यांस नोकऱ्या द्यावयाच्या नाहींत. हाही हेतु स्तुत्य आहे. घरच्यानीं उपाशी मरावें व खुंटीवर च्या कावळ्यानीं येऊन मौजा माराव्या हा विधि नव्हे. आणि तसें आलीकडे पुष्कळ हाउ लागलें हे तें सबब हा नवीन नियम झाला येणें करून वऱ्हाडी लोकांस फार चांगली सोय झाली.

ही परिक्षा दिल्यानें व हिजमध्यें पास झाल्यानें उमेदवारास नोकरी मिळण्याचा हक्कच आला असें समजूं नये ह्मणून रेसिडेंट साहेब खुलासा करून लिहितात. याचा अर्थ इतकाच कीं नोकरीस ज्याना ठेवावयाचें त्यांजवळ या परिक्षेचा दाखला असला पाहिजे इतकें मात्र अवश्य आहे, पण ज्याजवळ दाखला असेल त्याला नोकरी दिलीच पाहिजे असा सरकार आपणावर बोजा घेत नाहीं. हें सरकारच्या रितीप्रमाणें ठीकच आहे व याविषयीं विशेष वाटाघाट करण्याचें कारण दिसत नाहीं. इतकें मात्र खरें कीं परिक्षा ही दिली व ती अतिउत्तम उतरली तरी पुढें वशिला, भाड भीड, आणि आर्जव हें पाहिजेच आहे.

या परिक्षेच्या संबंधानें सरकारानें दुसरी एक सवड अशी केली आहे कीं ज्या लोकांच्या परिक्षा पास होतील त्यांचीं नावें रेसिडेन्सी आर्डरमध्यें व शाळाखात्याच्या रीकर्ड बुकामध्यें छापून प्रसिध्ध केलीं जातील. यावरून कोणास नोकरी मिळत असल्यास परिक्षा पास झाल्याचा राजरोस दाखला दाखविण्यास कांहीं हरकत पडणार नाहीं.

## फौजदारी मुकद्दमा.

(इं पि. क. २०४)

सुरतेचे फुलपावर माजिस्त्रेट मि० एम. सी. एंटी यांनीं एक परमानंददास गोवर्धनदास नांवाच्या मनुष्यावर पिनल कोड कलम २०४ प्रमाणें पुराव्यास उपयोगी पडूं नये ह्मणून एक दस्तैवज फाडून टाकिला असा च्यार्ज ठेवून २०० रुपये दंड केला त्यावर कैदानें मि० बर्डउड साहेब सेशन जडज यांजकडे अपिल केलें त्यांत सेशन जडज यांनीं ठराव केला तो असा:—

आमचा अभिप्राय आहे कीं आरोपितावर लागू केलेला गुन्हा शाबिद नाहीं; कारण जो दस्तैवज आरोपितानें फाडून टाकिला ह्मणतात तो हजर करण्याविषयीं कायदेशीर रीतीनें त्याला भाग पाडलें होतें असें या मुकद्दम्यांत कोठें दाखविलें नाहीं. दस्तैवज हजर करण्यास कायद्यानें बांधलें गेलें असल्या शिवाय कोणाही मनुष्याला एकादे न्यायाचे कोटांत दस्तैवज हजर करण्यास कायदेशीर भाग पाडणें होत नाहीं ह्मणजे कायद्या प्रमाणें कांहीं करणें कोणावर लादल्या शिवाय कायदेशीर अवश्यकर्तव्यता त्यास प्रप्त होत नाहीं. या मुकद्दम्यांतील हकीकतीवरून असें दिसतें कीं फाडलेला दस्तैवज बरोबर घेऊन येण्याविषयीं कैदीला समन्स झालें नव्हतें, अथवा तो दस्तैवज हजर करण्याविषयीं एकादे प्रकारची कायदेशीर नोटिसही त्यास मिळाली नव्हती, अथवा माजिस्त्रेटानीं झाड्याचें वारंट पोलिस इन्स्पेक्टरास दिलें होतें त्यांतही त्याविषयीं तसा कांहीं उल्लख नव्हता. पिनल कोडचें कलम २०४ यांत 'भाग पडणें हा जो शब्द आहे त्याचा अर्थ 'हुकूम होणें, इतकांच केवळ नव्हे. न्यायाचें कोर्ट पहिल्यानें हुकूम करतें व मग तो हुकूम मान्य करण्यास भाग पाडूं शकतें. एकादे कामाविषयीं कांहीं हुकूम केल्या शिवाय तें करण्याचें कोणास कायदेशीर भाग पडत नाहीं. एव्हीडन्स (साक्षीच्या) कायद्याचे कलम २६९ यांत दस्तैवज हजर करण्याचा हुकूम करणें आणि तो हजर करण्यास भाग पाडणें या दोहोंतील तफावतीचा खुलासा केलेला आहे. तें कायद्याचें मर्म न पहातां या माजिस्त्रेटाचें मत घेऊन आपण चाललों तर जे लोक आपलीं खासगी पत्रें फाडून टाकतात त्या सर्वांना आपण अपराधी ठरवून भयंकर कचाट्यांत आणू शकू. सबब त्याचें तें मत खरें आहे असें आह्मांस वाटत नाहीं. या मुकद्दम्यांत ज्या दस्तैवज बद्दल च्यार्ज आहे तो आणण्याची अवश्यकर्तव्यता कायद्याप्रमाणें त्यावर कोणतेही रीतीनें भागपाडली नाहीं ह्मणून त्याचें तें कृत्य पि० क० २०४ प्रमाणें अपराध आहे असें ठरत नाहीं ह्मणून मुकदम्यांतील आरोपिताच्या इतर बर्तनाविषयीं पुरावा झाला आहे तो खरा जरी असला तथापि आह्मी तिकडे न पाहतां सदरील मुद्यावर या अपिलाचा निकाल करितों. या मुद्याचा विच्यार माजिस्त्रेटाकडे झालेला नाहीं. पिनलकोड कलम २ १ प्रमाणें हा मुकदमा होऊ शकतो असें त्यांत लिहिलें आहे पण गुन्हा घडल्याचें कोणी साक्षीदार असें सांगत नाहीं कीं त्यापासून फाडलेल्या दस्तऐवजांतील कांहीं हकीकत तो दस्तऐवज लिहिणारा विरुध्ध पुरावा होईल. इत्यादि कारणांवरून आह्मी अपिलेंटावर झालेल्या अपराधाची शाबिदी व शिक्षा रद्द करितों आणि ठराव करितो कीं दंड भरला गेला असल्यास तो परत व्हावा.

## वऱ्हाड.

हैदराबादेस प्रिन्स आफ वेल्स परत जातांनां जाऊन निजाम सरकारास भेट देणार असें सिकंदराबादच्या बातमीदारानें लिहिलें आहे.

निजाम सरकार एक रत्नखचित कंबरपट्टा तयार करित आहेत त्याची किंमत अजमासें ५ लक्ष रुपये होईल.

हैदराबाद रेल्वे गुदस्त सालीं या महिन्याचे ८वे तारखेस सुरू झाली ती दिवस स्मारक ह्मणून वाढ दिवसासारखी त्याची निजाम सरकारानीं तयारी केली आहे. चदरघाट येथें सुमार २०० युरोपियन लोकांस टेलिजंग मेजवानी होणार आहे.

देऊळगाव राजा एथील श्री बालाजीचा उत्साह सुरू झाला. अष्टमीस मंडप उभा करितात, दसऱ्यास पालखी मिरवते व वद्य चतुर्थीला लळीत होतें. नंतर महिना दोन महिने बाजार असतो. बंदोबस्ताचे कामाकरितां फुलपावर माजिस्त्रेट रा. रा. श्रीकृष्ण नरहर बुलढाण्याहून तिकडे गेले आहेत.

कर्नेल नेंभार्ड साहेब कमिशनर उमरावतीहून चिखलदऱ्यास गेले आहेत. महिना अखेर परत येतील.

जुडिशियल कमिशनर मेजर बेल साहेब इलिचपुरास गेले होते ते गुरुवारीं परत आले.

सेशनाकरितां दर्यापुर तालुक्यांतील बालहयेचे दोन मुद्दे होते त्यांतील औरता रुक्मी मर्द धोंडी टिलोरीकर व गुजी मर्द लक्ष्मण हिरापूरकर यांजवर आरोप शाबिद होउन दोघीसही जन्म पर्यंत काळे पाण्यावर पाठविण्याची शिक्षा झाली.

रा. सा. नाराणभाई दांडेकर यांस वऱ्हाडांत डायरेक्टर नेमिल्या विषयीं सिमल्याहून टा० इं. च्या बातमी दाराचा ५ वे तारखेचा टेलिग्राम आलेला प्रसिद्ध झाला आहे; तेव्हां त्यांची नेमणूक खास झाली व ती येत्या आठवड्यांतील सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध होईल आणि तेही येत्या आठवड्यांत येथें येतील असा सुमार दिसतो.

मि० इलियट साहेब आफिशियेटिंग डायरेक्टर यांनीं २ महिन्यांची रजा तारीख १५ नोवेंबरपासून मागितली आहे पण नवीन डायरेक्टर लवकर आल्यास इलियट साहेब लवकरही जातील. त्यांच्या चालल्या व्यवस्थेवरून परत येण्याचा त्यांचा रंग दिसत नाहीं हें पाहून आह्मांस फार वाईट वाटतें. साहेब बहादुराच्या सुव्यवस्थेचा व चुरचुरीतपणाचा लाभ वऱ्हाडास आणखी कांहीं काळ होता तर फार चांगलें झालें असतें.

मि० एरकीन साहेब अकोला हायस्कुलाचे हेड मास्तर इन्स्पेक्टर व्हावे असा प्रयत्न आहे पुढें. काय होतें पहावें.

रा. रा. माधवराव हरी सहस्त्रबुद्धे उमरावतीचे क्लार्क आफ धि कोर्ट तीन महिन्यांचे हक्काचे रजेवर हैदराबादेकडे गेले होते ते गुरुवारीं येथें आपले घरीं आले. अठरावे तारखेस आपले कामावर जाऊन रुजू होतील.

रा. रा. पुरुषोत्तमराव नारायण अडगांवचे एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांवर कांहीं रयतेनें आरगावर व आपले मालावर सक्ती वगैरे केल्याविषयीं अर्ज केले आहेत व त्यांच्या चौकशी करितां मि. निकालेट साहेब तिकडे गेले आहेत.

अमदाबादच्या दुःख पीडीतांस सहाय करण्याविषयीं येथें सभा भरली होती तिची हकीकत पुढील अंकांत लिहू.

क्या० हडलष्टन साहेब बुलढाण्याचे डिपुटी कमिशनर काल येथें आले आहेत.

## वर्तमानसार

रंगूनपासून तांघूपर्यंत रेलवे होणार.

मुंबईहून विलायतेस जाणारी आठवड्याची डाक शुक्रवारीं जात असे ती गेल्या आठवड्यापासून सोमवारीं जाऊ लागली.

बंगळोर येथें च्यार आरबी सुंदर घोडे प्रिन्स आफ वेल्तकरितां खरेदी केले आहेत ते आगगाडी मार्गानें पुण्यास आणणार. विलायतेहून प्रिन्स आफ वेल्स यांस बसावयाकरितां गाड्या आगबोटींतून रवाना झाल्या त्याही मुंबईस येऊन पोचल्या.

ब्रह्मदेशांतील एक विद्यार्थी अमेरिकेतील वाशिंगटन एथील युनिव्हर्सिटींत ग्रज्युएट झाला आहे. हें ब्रह्मदेशच्या लोकांचें पहिलेंच उदाहरण आहे.

हिंदुस्थानांतून विलायतेंत जानेवारीपासून आगष्ट पावेतो ८ महिन्यांत चहा १३८८८५०० पौंड गेला. मागिल सालीं इतक्याच दिवसांत ८९६७३००० पौंड गेला होता.

मद्रासचे लोक प्रिन्स आफ वेल्स यांस मान पत्र देणार त्याला सुंदर सुवर्णाचा व हस्तीदंताचा करंडा करणार त्यासाठीं ५००० रुपये खर्चाचा त्यांनीं अंदाजा केला आहे.

जयपुरास व ग्वालेरीस प्रिन्स आफ वेल्स दोन दोन दिवस जाणार आहेत. तसेंच मार्च महिन्यांत इंदुरास जाणार. होळकर त्या निमित्त ९ लक्ष रुपये खर्च करणार.

मि० होर्मसजी दादाभाई वकील यांस मुंबईस स्मालकाज कोर्टाच्या ४थे जडजाची जागा पतकरता काय असें विच्यारिलें आहे. तसें झाल्यास मि० वार्डन साहेब सेकंड जडज, व मि० गणपतराव भास्कर थर्ड जडज होतील.

पारशी जातीचा मि० कावसजी रतनजी याची येक अविवाहित तरूण मुलगी मुंबईस सरकारी नोकरीच्या परिक्षेकरीतां उमेदवार होती व तिची परिक्षा उत्कृष्ट उतरली. हल्लां तिला खेतवाडी येथील पारशी मुलींच्या शाळेवर मास्तर नेमिलें आहे.

लार्ड नार्थब्रूक सिमल्याहून या महिन्याचे १४ वे तारखेस निघणार.

डिसेंबर महिन्यांत मद्रास येथें प्रिन्स यांस भेटण्या करितां त्रावणकोरचे व कोचीनचे राजे जाणार आहेत.

गवरनर जनरल साहेब मुंबईस नोवेंबरची तारीख २ तागाईत १० पर्यंत रहातील असें सरकारी कागद पत्रानें प्रसिद्ध झालें आहे.

प्रेसिडेन्सी ब्यांक मध्यें सरकारचा भाग आहे तो सरकार काढून घेणार.

गेल्या महिन्याचे २८ वे तारखेस सिमल्यास कला कौशल्याचें प्रदर्शन सुरू झालें.

जेथें जेथें लश्करी छावण्या आहेत तेथें तेथें गोड्या पाण्याचे नळ बांधून नेण्याची तजवीज करावी असा सरकारचा विच्यार आहे.

## जमीनीवरील साऱ्यांत रिडक्शन.

जमीनीवर पहिल्यानें ठरविलेल्या साऱ्याची मुदत संपतांच पैमाईषकडील काम

दारांनीं रयतेच्या हिताकडे नजर बिलकुल न देतां व सरकारचें उत्पन्न वाढविण्याकडेसच केवळ लक्ष पुरवून नवीन दर ठरोतीच्या वेळेस मनास वाटेल तसा वाढविला वगैरे हकिकत सर्वांस माहित आहेच. ह्या अन्यायाकडेस आमच्या सार्वजनिक सभेनें सरकारचें लक्ष पोंहोचवून गेल्या सालीं सारा कमी करण्याच्या बाबदींत एक ठराव केला होता, परंतु तो अमलांत आजपर्यंत आला नव्हता. आतां तो आजपर्यंत अमलांत न येण्यास कोणती कारणें झालीं हें आज सांगण्याची जरूर नाहीं. अस्तु. गेल्या वर्षाच्या ठरावाबरहुकूम सरकारानें नुक्तेच तीन ठराव प्रसिद्ध केले आहेत व त्यांजबदल कांहीं लिहिण्याच्या पूर्वी ते काय आहेत हें नीट समजण्याकरितां त्यां पैकीं पहिल्या ठरावाचें आज आह्मी भाषांतर देतों व ह्याजवरून सारा वाढविण्याच्या समयीं पैमाषीकडील अधिकाऱ्यांचीं कशीं काय मतें होतीं हें पुढील भाषांतरावरून स्पष्टपणें दिसून येईल ह्यांत संशय नाहीं.

सरकारचा ठराव नंबर ५०९१८ नोवेंबर तारीख ३० सन १८७२ चा ह्याप्रमाणें पुणें जिल्ह्यांतील भिमथडी तालुक्यांत तपासणी करून बसविलेले सारे कमी करण्याबद्दल सर्वे व सेटलमेंट कमिशनर उत्तरभाग यांजकडून पत्र आलें आहे व हें पत्र सकारचा ठराव नंबर ५०७३९ ता॰ २९ अक्टोबर सन १८७४ यांत सांगितलेल्या गोष्टींस अनुलक्षून आहे.

२. सर्वे कमिशनर यांणीं नमूद केलेल्या गोष्टींचा विच्यार करण्यापूर्वी सन १८७२ सालीं तपासणी करून धारा बसविण्याचे कामांत सरकारानें कोणत्या गोष्टी लक्षांत आणिल्या व त्याप्रमाणें ह्या तालुक्यांतील जमिनीच्या धाऱ्याची व्यवस्था केली हें सांगितलें असतां बरें होईल.

३. सन १८३९ व सन १८४० सालांत मुळचा धारा सुरू झाला त्या वेळेस ह्या तालुक्याची स्थिती फार दुःख करण्याजोगी आहे असें कळलें होतें. लेफ्टनेंट न्यास त्या वेळचे सेटलमेंट आफिसर यांणीं सन १८३८ सालीं असें लिहिलें आहे कीं मी येथें रहात असतां दारिद्र व नाश या दोन गोष्टींच्या संबधानें माझा काय अभिप्राय झाला आहे हें मला सांगतां येत नाहीं. या शतकाच्या प्रारंभी होळकराच्या सैन्यानें केलेली लुटालूट, ती स्वारी झाल्या नंतर पडलेला भयंकर दुष्काळ व त्याचप्रमाणें पुढील वीस वर्षांत दोन अथवा तीन वेळ आलेले प्रसंग, सन १८२० सालीं चालू असलेला जबरदस्त महामारीचा वाखा, इंग्रज सरकारचें राज्य झाल्यापासून बाजारांत जिनसांचा एकदम दर उतरणें व ह्यामुळें मराठे लोकांनीं बसवलेल्या जुन्या धाऱ्यापासून होणारा जुलूम व अशा कित्येक आणखी कारणांपासून हा दुःखकारक परिणाम उत्पन्न झाला असा त्या वेळच्या सेटलमेंट आफिसराचा अभिप्राय होता. या तालुक्यांतील पिकाऊ जमिनीपैकीं अर्ध्यापेक्षां ज्यास्ती जमीन पडित होती, व त्यांतील पुष्कळ जमिनीवर काढून टाकण्यास फार कठीण असें दाट जंगल उगवलें होतें. प्रत्येक एकरावर सरासरीनें साडेतेरा आणे सरकारचा धारा पडत असे व या शिवाय नाना तऱ्हेचे हक्क व पुष्कळ जुलुमाचे कर होते. व ह्यापासून कित्येक लोक इतके गरीब झाले की हिशोबांत लागणाऱ्या वसुलाच्या रकमेंतील अर्ध हिशानेंसुद्धां वसूल उत्पन्न होत नसे. सेटलमेंट सुरू करण्याच्या पूर्वीच्या दहा वर्षांत प्रतिवर्षी सरासरीनें २६६६१ रुपये वसूल यई व दर वर्षास १३५६७ रुपये सूट द्यावी लागे. याशिवाय सुमारें एक लक्ष रुपये बाकी राहिली होती व ही बाकी सेटलमेंट सुरू करण्याचे वेळेस सरते शेवटी जमेस धरावी लागली ज्ञा. प्र.

( पुढें चालू )

## दस्तुऱ्यांचा अथवा माणूस पट्टीचा कायदा पास झाला.

गेल्या गुरुवारीं पुण्यात कायदेकौन्सिल भरून दस्तुऱ्यांचा अगर माणूसपट्टीचा कायदा पास झाला. या पूर्वीच्या सभेत या कायद्याच्या मसुद्याचें प्रथमचें वाचन झालें होतें व त्याचा विचार करून रिपोर्ट करण्याकरितां निवडक कमिटी न नेमतां दुसऱ्या वाचनाचे वेळेस कमी जास्त बोलण्याचा विचार केला जाईल असें ठरलें होतें. त्याप्रमाणें साधारण विचार करून सरकारानें करावयाचें होतें तें केलें. या प्रसंगीं फक्त एक थोडासा फेरफार झाला. माणसावर एका पैशाची पट्टी घेणें ती पुलांवर व डोंगरांतून केलेल्या रस्त्यांवर मात्र घ्यावी सर्वत्र घेऊं नये असें झालें. सरकारी नौकरी करणारे सभासद यांनीं हा कायदा करणारास मोठें कारण रस्त्याच्या दुरुस्तीकरितां कसा तरी पैसा उत्पन्न झाला पाहिजे आणि त्यास दस्तुऱ्यापेक्षां दुसरा चांगला मार्ग दिसत नाहीं असें स्पष्ट सांगितलें. आतां हा कायदा सन १८७३ च्या उत्तम कायद्यांच्या मालिकेंतीलच आहे, तेव्हां म्युनिसिपालिट्या, मीठ वगैरेच्या कायद्यांपासून लोकांस पूर्ण दुःख व त्रास होण्यास कांहीं कमीपणा येत असेल तर तो दुःखचा घडा पूर्ण करण्याकरितां योजना केलेला हा कायदा आपलें काम उत्तम प्रकारें बजावील यांत संशय नाहीं. आमचें सरकार रयतेच्या मनाविषयीं विशेष पर्वा करीत नाहीं आणि सर्व मोगलाईसारखा दांडगाव्याचा प्रकार दिवसानुदिवस अधिक होत चालाला आहे, हें पाहून आह्मांस फार वाईट वाटतें. आतां लोकांनीं दाद मागणें ती परमेश्वराकडेच मागितली पाहिजे. कारण येथील सरकार व त्यांचे कामगार हे स्वतां अंध होऊन विलायतसरकार व सर्व ईंग्लिश लोक यांच्या डोळ्यांत, प्रिन्स आफ वेल्स यांस येथें आणवून, येथील लहान मोठ्या सर्व लोकांकडून वरकांतीं राजनिष्ठा दाखवून, माती टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत; तेव्हां आमच्या लोकांविषयीं दया उत्पन्न करवून दुःखापासून तो मुक्त करवील तरच आशा.

इं. प्र.

## मूर्तिपूजा व जातिभेद.

ही गोष्ट निर्विवाद आहे कीं, वेद हे आपल्या धर्मसंबंधी ज्ञानाचें भांडार असून यांचेपेक्षां जुनाट किंवा अधिक सन्मान्य असे कोणतेच ग्रंथ नाहींत. तसेंच हेंही सर्वांस मान्य करावें लागेल कीं, मूर्तिपूजा व जातिभेद यांचे प्रकार जे आपल्यांत सध्या चालू आहेत त्यांत व वेदांत सांगितलेल्या प्रकारांत फारच अंतर आहे. तर मग हल्लींच्या आपल्या विचाराचा अभिमान बाळगण्याचें एक कारण नाहींसें झालें. कांकीं हे विचार आपले पूर्वीपासूनचे नव्हत; तर आपणास ते कल्याणकारक आहेत ह्मणूनच कायतो त्यांचा अभिमान धरावयाचा.

मूर्तिपूजेचे कैवारी वाद करीत असतां असें वारंवार ह्मणतात कीं, अज्ञान जनास निराकार परमेश्वराचें ध्यान काय होतें. त्यांचें मन परमेश्वराकडेस लागण्याला मूर्त पदार्थांचिच साधन पाहिजे. ही कोटी प्रथमदृष्ट्या सुयुक्तिक दिसते; परंतु वास्तविक ह्मटलें तर मनुष्याचें मन जितकें जडाकडेस वळवावें तितकें तें अधिक जड होतें. मूर्तिपूजेचा प्रकार आह्मांमध्यें आज शेंकडो वर्षें चालू आहे. तेव्हां ती जर परमेश्वरभक्तीचे खरें साधन असती तर आज आपल्या लोकांचे विचार व आचार केवळ आध्यात्मिक होऊन राहिले असते. परंतु वास्तविक असे झालें आहे कीं आह्मी उच्च दशा न पावतां आमचे आचार नीचत्व पावले आहेत, आणि देशभर खरा परमेश्वर एकीकडेस राहून झाडेंझुडें, दगडधोंडे, पशुपक्षी, भूतपिशाच, जिवंत किंवा मयत मनुष्य हेच देव होऊन राहिले आहेत; आणि ज्ञानी व विचारशील अशा पूर्वजाचे वंशज जे आह्मी ते त्याच पूर्वजानीं तुच्छ निलेल्या कोळी, रामोशी वगैरे लोकांसारिखे अज्ञान होऊन राहिलों आहों. तेव्हां हा मूर्तिपूजेचा आह्मावर केवढा उपकार?

बरें, आतां जातिभेदाकडे पहा. याचा जो सध्याचा प्रकार आहे तेणेंकरून असें झालें आहे कीं, एका धर्मास मान देणारी अशी जरी कोट्यावधि आपली प्रजा आहे तरी आह्मी सर्व लोक मिळून एक आहों असें होत नाहीं. एक महाराष्ट्रच घ्या. यांत किती जाति व किती त्यांची परस्पर वैरें व भेद. पानपतचे लढाईचे प्रसंगीं होळकरानें सल्ला दिला कीं, अफगाणी लोकांशीं समोर लढण्याचें आपलें समर्थ्य नाहीं सबब त्यांसी दूरदूर राहून त्यांची दाणा वैरण तोडावी ह्मणजे ते त्रासून परत जातील. परंतु ही धनगराची मसलत ह्मणून नापसंत झाली आणि लढाईचा जो परिणाम झाला त्याचा विचार केला असतां अद्यापही हळहळ वाटतें. सन १८१७ त खडकीची लढाई झाली आणि पेशव्याचें राज्य बुडालें त्यावेळेस मुंबई एथील पळशे ब्राह्मणानीं पेढें वाटले असें ह्मणतात आणि असें होणें असंभव्य दिसत नाहीं. हीं उदाहरणें ठळक ह्मणून एथें सांगितलीं आहेत. परंतु लक्षपूर्वक अवलोकन केल्यास दिसून येईल कीं, आह्मी हिंदु लोक नावाचें एक परंतु वास्तविक आमचा प्रकार केवळ फाटाफुटीचा आहे. तेणेंकरून प्रजेचें ऐक्य व सार्वजनिक कल्याणाची काळजी हे विचार आह्मांत प्रबळ होणें कठीण पडतें. तेव्हां अर्थात सर्वांस परतंत्रस्थितींत रहावें लागतें. हा आमच्या देशावर जातिभेदाचा उपकार नव्हे काय?

आतां आमच्या हल्लींच्या निकृष्ट स्थितीस वर सांगितलेल्या शिवाय दुसरी कारणें नाहींत असें ह्मणणें नाहीं; परंतु जीं वर सांगितलीं तीं बरींच सबळ आहेत असें सर्व कबूल करितील.

सु. प.

## नोटिस.

सोनाजी वलद कृष्णाजी पाटिल मौजे सिंगोली तालुके बाळापूर यांस सिताराम दाताराम मारवाडी दुकान हांतरूण तालुके बाळापूर याजडून देण्यांत येते कीं तुह्माकडे आमचे ४ [illegible] व्याजसह ६६० व जवारी खंडी [illegible] असें येणें त्याबाबद सन १२८४चे अश्विन वद्य १ रोजीं च्यार लोकासमक्ष अपसात ठरावें झाला कीं ४०० रुपयाबाबद सालबंदीचा दस्तऐवज व्हावा व रुपये १०० नगदी द्यावे व रुपये १०० पोटी तुह्मी आपली गाडी बैल व मनुष्यासह सात महिने आमचे येथे नौकरी करावी व १०० रुपये दरमाहा दर शेकडा २ रुपये प्रमाणें व्याजानिसी येकवर्षांत द्यावे व सदरील ४०० रुपया पोटी तुह्मी आपली च्यार सेते व गाडी बैल असे गाहण लिहून देउन दस्तऐवज रजिष्टर करून द्यावा व गाहण आमचे ताब्यात द्यावा. याप्रमाणें १५ दिवसांत करावे न केल्यास ठरलेला करार रद होऊन पूर्वींचे रोखे वगैरेचे घेणें बहाल राहील असा ठराव झाला असोन त्याप्रमाणें तुह्मी केले नाहीं सबब तुह्मास ही नोटिस दिली जाते कीं वरील ठराव रद्द झाला आहे करितां तुह्मी ४ रोख्याबाबद व्याजासह रुपये व जवारीचे किमती बदल रुपये असे १५ दिवसांत आणून द्यावे न दिल्यास ह्या नोटिसीचे खर्चासह तुह्मावर दावा केला जाईल कळावे तारीख ३ माहे अक्टोबर सन १८७५ इसवी.

( सही )सिताराम दाताराम मारवाडी दुकान हातरूण याची सही स्वदस्तुरची असे.

नोटिस.

बुध्या वल्लद सोन्या तेली हली वस्ती रेल तालुके अकोट याजला खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी आह्मास २४० रुपयांचे दोन रोखे करून देउन त्यात सालबंदीचा करार करून दिला, परंतु आतां त्याची मुदत भरण्यांत आली आणि तुह्मी आह्मास इतके दिवस चाळविलें. परंतु आतां ही नोटिस पावल्यावर १५ दिवसाचे आंत द्यावे अथवा कांहीं तोडजोड करावी नाहीं तर दिनाणी कोर्टांत फिर्याद करून नोटिसीच्या खर्चासुध्धा रुपये घेण्यांत येतील कळावे तारीख ५ माहे अक्टोबर सन १८७५ इसवी.

( सही )निरंजनसिंग वलद गुलाबसिंग दस्तुर खुद्द.

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

REGISTERED NO. 5 1875

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० १७ माहे अक्टोबर सन १८७५ इ० अंक ४२

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | |
|---|---|
| | रु. |
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेल्वे.

NOTICE

## नोटिस.

VISIT OF HIS ROYAL HIGHNESS THE PRINCE OF WALES

## हिज रायल हायनेस धि प्रिन्स आफ् वेल्स यांचें आगमन.

Revision of fares for passengers and special return tickets.

स्पेशियल रिटर्न टिकिटें आणि उतारू यांच्या दरांत फेरबदल

या जाहिरखबरीनें सर्व लोकांस असें कळविण्यांत येतें कीं तारीख १५ अक्टोबरपासून पुढें दुसरी जाहिरखबर प्रसिद्ध होईपर्यंत दर मैलास ३ पै या दराचीं लोकल तिसऱ्या क्लासाचीं टिकिटें देण्याचीं बंद केलीं आहेत.

नुसत्या जाण्याच्या किंवा येण्याच्या एकेरी प्रवासाकरितां टिकिटांचे दर पहिले क्लासास दर मैलास १८ पै, दुसरा क्लास ९ पै, तिसरा क्लास ४ पै व चौथा क्लास २॥ पै, इतक्या प्रतीचीं मात्र टिकिटें सर्वे स्टेशनांवरून मिळतील आणि तीं सर्व साधारण गाड्या ज्यांतून उतारू जातात त्यांतून जाण्यास उपयोगी पडतील. फक्त चौथ्या क्लासचे उतारू मुंबई आणि जबलपुर यां दरम्यान तसेंच मुंबई आणि सोलापूर यां दरम्यान जाणाऱ्या मेल ट्रेनी ह्मणजे टपाल घेऊन जाणाऱ्या आगगाड्या यांत बसविले जाणार नाहींत.

या नोटिसीअन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं तारीख १५ अक्टोबरपासून तारीख ८ नोवेंबर सन १८७५ इसवीपर्यंत व हे दोन्ही दिवस धरून पहिला, दुसरा, तिसरा व चवथा या सर्व क्लासांचे उतारू लोकांस, व घोड्यास आणि गाड्यास मुंबई बाहेरील या रेलवेपैकीं सर्व स्टेशनांवरून बोरीबंदर व भायखळ्यापर्यंत जाण्या येण्यास जो एकंदर पैसा पडतो त्यांतील एक चतुर्थांश कमी करून बाकी पैशाला सदहू स्टेशनांवरून बोरीबंदरचीं व भायखळ्याचीं रिटर्न टिकिटें देण्यांत येतील, व तीं तारीख ३० नोवेंबरपर्यंत व त्या दिवशींही उपयोगी पडतील. बोरीबंदर व भायखळा या दोन स्टेशनांचे दरम्यान मशिद नावाचें नवीन स्टेशन झालें आहे तेथूनही बोरीबंदराला अगर बोरीबंदराहून तेथें जाण्याला रिटर्न टिकिटें फक्त उतारू लोकास दिलीं जातील.

तारीख १५ अक्टोबर पासून पुढें दुसरी जाहिरखबर होईपर्यंत मुंबईहून कल्यागास व कल्याणाहून मुंबईस आणि या दोहोंच्या दरम्यानचे सर्व स्टेशनांस तिसऱ्या व चवथ्या क्लासचे उतारूस नुसतें जाण्यास किंवा येण्यास जें हशील लागतें त्याचें दीडपट हशील घेऊन जाण्या येण्याचीं रिटर्न टिकिटें देण्यांत येतील. व तीं जाण्याकरितां घेतलीं असतील त्या दिवशीं, किंवा दुसरे दिवशीं, अथवा शनिवारीं घेतलीं असल्यास रविवारीं किंवा सोमवारीं परत येण्यास उपयोगीं पडतील. पहिले व दुसरे क्लासचे उतारूकरितां व घोडे आणि गाड्या यांजकरितां रिटर्न टिकिटें या स्टेशनांवर व इतर स्टेशनांवर देण्याचा जो सांप्रदाय आहे त्याप्रमाणें तीं देण्यांत येतील. त्यांत कांहीं फेरबदल नाहीं.

**हेनरी कांडर**

जनरल ट्राफिक म्यानेजर.

मुंबई ता० २४ माहे सप्तंबर सन १८७५ इसवी.

---

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेलवे

NOTICE

## नोटिस.

RATES FOR GRAIN AND SEED.

## धान्य व बीजें यांचे दर

या लेखाच्या द्वारानें सर्व लोकांस जाहिर केलें जातें ऐसाजे. या रस्त्यावर, जबलपुरापलीकडील रेलवेच्या स्टेशनांवरून, होळकर स्टेटरेलवेच्या स्टेशनांवरून, आणि तसेंच जबलपुर व खंडवा यांच्या दरम्यानच्या स्टेशनांवरून. आणि नागपुर व बदनेरा यांच्या दरम्यानच्या स्टेशनांपर्यंत हीं सर्व स्टेशनें धरून धान्य नेण्या आणण्याचे दर कमी करण्यांत आले आहेत.

आणखी, जिंजोली, जवस, मोह अथवा मोहोडा. मोहरी, खसखस, घोडराई, आणि तीळ हीं बीजें लोकल रेलवेमध्यें आणि तिच्याद्वारा इतर रेलवेमध्यें या रस्त्यावरील सर्व स्टेशनांवर आणि तसेंच ही कंपनी ज्या रेलवेवर काम चालविते अशा निजाम स्टेट रेलवे व दुसऱ्या स्टेट रेलवे यांच्या दरम्यानच्या स्टेशनांवर व त्याप्रमाणेंच त्या रेलवेच्या सर्व स्टेशनांच्या आणि जबलपुरच्या पलीकडील दुसऱ्या रेलवेच्या स्टेशनांच्या आणि खंडवा या स्टेशना पलीकडच्या आणि रायचूर पलीकडच्या रेलवे स्टेशनांच्या दरम्यानच्या स्टेशनांवर नेण्याआणण्याचे दर, चालू महिना संपल्यानंतर पुढें आणि दुसरी जाहीरखबर देई तोंपर्यंत धान्याच्या दराप्रमाणेंच घेतले जातील.

मुंबईहून सर्व स्टेशनांवर आणि दुसऱ्या सर्व स्टेशनांच्या दरम्यान लोकल रेलवेच्या आणि तिच्या द्वारा दुसऱ्या सर्व रेलवेच्या स्टेशनांवर धान्य आणि दुसऱ्या प्रकारचीं बीजें नेण्याआणण्याचे दर हल्लीं आहेत त्याप्रमाणेंच रहातील.

विशेष तपशीलवार माहिती सदरीं लिहिलेल्या दर कोणत्याही स्टेशनांवर अथवा खालीं सही करणार यांजकडे मागितली असतां मिळूं शकेल.

**हेनरी कांडर**

जनरल ट्राफिक म्यानेजर.

मुंबई ता०२५ माहे सप्तंबर सन १८७५ इसवी.

---

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY

## ग्रेट इंडियन पेनिनसुला रेल्वे.

NOTICE

## नोटिस.

CARTING OF GOODS AT AMRAOTI DISCONTINUED

## उमरावती स्टेशनावरून गाड्यांतून माल पोचविण्याचें बंद केल्याबद्दल.

या नोटिसीअन्वयें जाहीर करण्यांत येतें कीं, इतके दिवसपर्यंत ही कंपनी उमरावती स्टेशनावरून माल गोळा करून तो गाड्यांतून विऱ्हाडीं पोंचविण्याचें काम करीत असे, तें काम ती चालू महिना संपल्यानंतर करणार नाहीं.

माल पोंचविण्याबद्दल जो जास्त पैसा (ह्मणजे माल गोळा करून आणण्याचें अथवा पोंचविण्याचें काम केलें असतां त्याबद्दल जितका पैसा जास्त पडतो तितका) घेण्यांत येतो तो पुढें घेतला जाणार नाहीं. कंपनी माल पोंचविण्याचें काम करीत नाहीं त्यावेळेस जितका पैसा घेण्यांत येतो तितकाच घेतला जाईल.

**हेनरी कांडर**

जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई तारीख २१ सपटंबर १८७५ इ.

---

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. महाराज आपला माझा परिचय आहे. ह्मणून आपणांकडेस च्यार ओळी पाठविल्या आहेत. त्या छापण्याची तजवीज व्हावी.

महाराज मी जातीचा गोळक आहे. परंतु आमचे वडील आपले जातीस गोळक ब्राह्मण ह्मणवितात. व जर आमचा ब्राह्मणा पैकीं एक भेद आहे तर आमचे येथें ब्राह्मण वेदोक्त कर्में कां करीत नाहींत? तर एडिटरराव खालीं लिहिलेल्या प्रश्नांचीं कोणी इत्थंभूत व शास्त्र आधारासहीत माहिती देईल तर मी त्याचे मोठे आभार मानीन. व आमचे जातीचाही आह्मांस शोध लागेल. हल्लीं आह्मी धड हिंदु न मुसलमान ह्या सारखे आहोत. याजकरितां सर्व माहिती मिळेल अशी आशा आहे.

प्रश्न १ला. गोळक ह्यांची उत्पत्ती कोणापासून आहे व त्यांस वेदाचा अधिकार आहे कीं काय?

प्रश्न २रा. कास्त यांची उत्पत्ती कोणापासून व वेदाचा अधिकार आहे कीं काय?

प्रश्न ३रा. परभु यांची उत्पत्ती कोणापासून आणि त्यांस वेदाचा अधिकार आहे कीं काय?

महाराज सदरहु प्रश्नाचीं शास्त्री आणि पंडित उत्तरें देतील तर मी त्यांचे मोठे उपकार मानीन कळावे लोभ असावा ही विनंती.

तारिख १३ माहे अक्टोबर सन १८७५
मुक्काम कारंजें.
वऱ्हाड.

आपला एक दास
जातीचा शोध करणारा.

---

## वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन वद्य ३ शके १७९७

## डाक्टर सिंक्लेर साहेबांचें स्मारक कृत्य व प्रमोदसिंधू कर्ते.

या विषयावर तिसरे तारखेच्या पत्रांत आह्मी जो मजकूर लिहिला त्यावरून अ-

र्यंतच प्रमोदसिंधूचें समाधान झालें नाहीं व होईल असें आमच्या स्वप्नींही नव्हतें; फक्त त्यांचा पहिला लेख वाचण्यापासून इतर गैरमाहित लोकांची गैरसमजूत झाली असेल ती दूर व्हावी इतकाच आमचा हेतु होता; पण त्यावर आमचे बंधूनीं आणखी ९ कालम उलट व्याख्यान १० वे तारखेच्या पत्रांत केलें ती त्यांच्या मुखत्यारीची गोष्ट आहे. आह्मांस आतां इतकेंच अवश्य वाटतें कीं आणखी एक वार च्यार शद्ब लिहून हा विषय पुरा करावा. आमचे वाचणारांस याविषयीं अर्थात कंटाळा आला असेल पण निरुपायास्तव एवढेंच लिहून यावर आमचे बंधूनीं कितीही लिहिलें तरी कांहीं लिहिणार नाहीं असें कबूल करितों.

प्रमोदसिंधूत कसेंही लिहिलें असलें तरी आह्मांस निःसंशय असें वाटतें कीं सिंक्लेर साहेबाच्या कुटुंबाच्या माणसांविषयीं खरी कळकळ वास्तवीक कोणास असावयाची ती शाळाखात्यांतिल कांहीं लोकांस आहे व त्यांनीं आपसांत याविषयीं पूर्ण विच्यार केला व वऱ्हाडांतील इतर लोकांपासून मुलकी अंमलदाराच्या मदतीवाचून किती सहाय्य मिळण्याचा संभव होता व अजून आहे हें शाळाखात्यांतील लोकांस पूर्णपणें माहित आहे.

सिंक्लेर साहेबांचा पगार दरमहा १५०० रुपये होता व ते जिवंत असतां त्यांच्या घरीं आलिकडे दरमहा निदान हजार रुपये तरी जात असत; तेव्हां त्यांचें कुटुंबांतील माणसें कोणत्याही अवस्थेंत असलीं तर त्यांस आतां सारे हजारभर रुपये दिल्यानें कांहीं विशेष मदत होईल असें नाहीं तरी तितकीच रकम कोणास कुबेराची संपत्ती वाटेल तर त्यास त्यांचा इलाज नाहीं. विलायतेस रहाणाऱ्या सिंक्लेर साहेबासारख्याच्या कुटुंबाकडे हजार दीड हजार रुपयांची रकम तुमचा चारितार्थ चालविण्याकरितां आह्मी देतों असें ह्मणून कोणी समंजस लोक आपला उपहास करून घेणार नाहींत असें आह्मांस वाटलें होतें व असे विच्यार कोणाचे मनांत येतीलसा संभव दिसला नव्हता; कदाचित् दुसऱ्यानीं कांहीं केलें तर त्याची टीका करावी हा ज्यांचा धर्म व कांहीं लोकांत ऐक्य असलें तर त्यांत फुटाफूट व्हावी असा ज्यांचा रोख तशांचे मनांत सदर्हू प्रकारचे विच्यार आले असतां आश्चर्य मानण्यासारखें नव्हे परंतु आमच्या उमरावतीकरा सारख्या सुज्ञ व विच्यारशील बंधूनीं तशा प्रकाराची तढ घेणें व तिचा ग्रंथ चालविणें हें आश्चर्य मानण्या सारखें आहे !

हें कृत्य करण्यांत आपली स्वतांची कीर्ति व्हावी किंवा आपणास मोठेपणा मिळावा हा उद्देश शाळाखात्यांतिल लोकांचा होता किंवा काय? याविषयीं एकादे अल्लड मुलासही विच्यारलें तर तें देखील सांगू शकेल कीं तसा उद्देश बिलकूल नव्हता; असें असतां प्र. सिं. तील लिहिणारास तसें वाटावें हा चमत्कार होय ! Sinclair's Prise किंवा Sinclair's Scholarship युनिव्हर्सिटींतून पास झालेल्यामुलास दरसाल मिळाल्यानें व युनिव्हर्सिटी क्यालेंडरांत दरसाल तो छापून प्रसिद्ध होण्यानें सिंक्लेर साहेबांचें नाव चिरकाल राहावें हा हेतु सिध्धीस जाईल असें शाळाखात्याच्या लोकांस वाटलें व त्यांनीं बहुमतानें त्याविषयीं तजवीज चालविली. सिंक्लेर साहेबांची ज्यांस विशेष माहिती आहे व ज्यांनां त्यांसीं बोलण्याचे व कामाकाजाचे नेहमीं प्रसंग येत त्यांच्या सांगण्यावरून असें समजतें कीं ( आह्मी स्वतः आह्मांस त्यांसीं बोलण्याचे प्रसंगानें माहिती आहे असें पूर्वीं ह्मटलें नव्हतें. ) युनिव्हर्सिटींत अशाप्रकारेंच आपलें कांहीं नाव राहावें अशी साहेबास अतिशय उत्कंठा होती व असा प्रकार त्यांचे बोलण्यांत नेहमीं येत होता; ह्मणून ही उत्कंठा पूर्ण करण्याचा शाळाखात्यांतील लोकांनीं प्रयत्न केला आहे पण प्रमोदसिंधु सारख्यांनीं त्यास विघ्नें आणण्याचा प्रयत्न चालविला आहे तरी देखील ईश्वरकृपेनें त्या लोकांचा तो बेत सिध्धीस जाईल अशी आह्मांस अजून आशा आहे.

आमचे बंधूस सिंक्लेर साहेबाचे मुलांविषयीं कळकळ वाटून त्यांनीं यत्न केला परंतु मंडळी एकत्र जमण्यास आज पांच महिने पर्यंत एक सारखीं विघ्नें येत गेलीं !!! खरोखरीच ही अंतःकरणापासून कळकळ व भरीव मोठे पणा!

आतां हा विषय पुरा करण्यापूर्वीं आह्मास आमचे उमरावतीकर बंधूस इतकें सांगणें भाग आहे कीं उडदुअखबार कर्त्याचे विच्यार कोते व त्याचे लेख अविच्याराचे असें प्रमाण दाखविल्याशिवाय नुसतें ह्मणण्यानें आपले लेख अधिक प्रगल्भ व गहन विच्याराचे होतात असें नाहीं.

---

## नवीन डायरेक्टर व अरुणोदयकर्ते.

आमचे या महिन्याचे तारीख ३ चे अंकांत आह्मी रावसाहिब नारायणभाई यांचे नेमणुकीविषयीं जो आपला अभिप्राय दिला होता त्यावर अरुणोदयानें आपले नेहमीच्या पद्धतीप्रमाणें टीका केली आहे. व "पोरकट," "अप्रयोजक" इत्यादि शद्बांचा उपयोग केला आहे. अरुणोदयाचा लेख पाहून आह्मांस बिलकूल आश्चर्य वाटलें नाहीं. कारण कांहीं वर्तमानपत्रकर्त्यांस शिव्या देण्याची मोठी हौस असते. आह्मांस असें वाटतें कीं अशा शद्बांचा यांजपाशी कोश असतो व तेवत लागली ह्मणजे कोठें तरी आणि कोणावर तरी त्यांचा भडिमार ते अत्यानंदानें करितात. ही अरुणोदयाची मनापासूनची हौस पुरविण्यास आज आह्मी कारण झालों हें पाहून आह्मास खरोखरी संतोष होतो. आमचे ठाणेकर बंधुस विनयपूर्वक सांगणें आहे कीं त्यांनीं त्यांच्या कोशांतील शद्बांचा अर्थ कोणापासून समजून घेऊन मग त्याचा उपयोग करीत जावा.

आह्मी पूर्वींच लिहिलें आहे कीं लार्ड नार्थब्रूक साहेबांनीं ही जागा पत्कराल काय ह्मणून रावसाहिब नारायणभाई यांस विच्यारण्यांत ( अद्यापि नेमणूक झाल्याची पक्की बातमी कळली असें आह्मास ह्मणवत नाहीं ) नेटिवांस फार मोठा मान दिला व आमच्या कल्याणाविषयीं त्यांचे मनांत कळकळ किती आहे हें दिसून आलें याबद्दल सर्व नेटिवांस फार आनंद होऊन लार्ड साहेबांविषयीं पूज्यबुद्धि व त्यांचे उपकार सर्व नेटिवांस वाटल्यावाचून रहाणार नाहींत अर्थातच हीच काय पण याहूनही मोठी जागा नेटिवास मिळाली तरी आह्मास आणि सर्व नेटिवांस अत्यानंद होईल. आह्मी पूर्वीं अनेक वेळां लिहिलें आहे कीं असिस्टंट कमिशनरच्या जागा नेटिवांस द्याव्या; तसेंच डेपुटी कमिशनर ( ह्मणजे मुंबईकडील कलेक्टर ) च्या जागा देखील नेटिवांस मिळाल्या तर आह्मास फार संतोष होईल. परंतु अशी एखादी मोठी जागा आहे कीं ती नेटिवांस दिल्यानें हल्लींच्या वऱ्हाडच्या स्थितींत काम चांगलें होणार नाहीं व काम न झाल्यानें नेटिव मोठ्या जागेस मुळींच अयोग्य आहेत असें जी जागा दिल्यापासून पुढें कितीएक युरोपियन अधिकाऱ्यांस ह्मणण्यास सवड मिळेल असें आह्मांस जर मनापासून वाटत आहे तर ती जागा तूर्त नेटिवास देऊ नये असें ह्मणण्यांत आह्माकडे "पोरकटपणाचा" दोष कसा येतो ? एकाद्या मुलाच्या आईनें आपल्या लाडक्या मुलास कांहीं आवडता पदार्थ एक पुष्कळ खाण्यास दिला तर त्या मुलास अर्थातच आनंद होईल आणि तो मुलगा तो पदार्थ सगळा एकदम खाईल त्यावेळेस जर कोणी एकादा मनुष्य ह्मणेल कीं हा पदार्थ मुलास आवडतो खरा परंतु हा इतका एकदम खाल्यानें त्यास कांहीं रोग होईल व पुढें त्यापासून असें होईल कीं, या मुलाला कांहींच खाण्याची चव रहाणार नाहीं व हा पदार्थ मुळींच खाऊ नये असा प्रतिबंध करावा लागेल असें सांगणाऱ्या मनुष्यास "पोरकट" हा शद्ब लावता येईल काय ? सांगणाऱ्या मनुष्याची समजूत खोटी आहे व त्या पदार्थापासून तसा परिणाम होण्याचा संभव खरोखरी नसला तरी अशा प्रसंगीं "पोरकट" या शद्बाचा उपयोग कसा होईल हें आह्मास समजत नाहीं. 'आणखी कांहीं वर्षेपर्यंत वऱ्हाडांत शाळाखात्यावर युरोपियन अधिकारी असावे हें बरें आहे व त्यापासून नेटिवांचे कल्याण अधिक आहे' हें आमचें वाक्य "पोरकट" असें ठाणेकर बंधू लिहितात पण तें कसें 'पोरकट' हें त्यांनीं समजून सांगितलें असतें तर बरें होतें. वर आह्मी लिहिलेल्या उदाहरणांत अपकारक पदार्थ पुष्कळ एकदम खाणें हें चांगलें नाहीं असें ह्मणणाऱ्या मनुष्यास 'पोरकट' ह्मणण्यापेक्षां तो उपदेश ऐकूं नयेव सध्याचे सुखावर फक्त नजर देऊन परिणामाकडे बिलकूल पाहू नये असें सांगणारास आमचे बंधूच्या कोशांतील निवडक शद्ब लावणें हें अधिक सयुक्तिक होईल असें आह्मास वाटतें. तसेंच ज्या वऱ्हाडच्या स्थितीवरून आह्मी मागील मत दिलें आहे त्या स्थितीचा बिलकूल अनुभव नसतां आमचें जें ह्मणणें तें उगीच कारण दाखविल्याशिवाय नाहीं ह्मणणे आणि अर्थ माहित नसतां कोशांत शद्ब आहेत ह्मणूनच फक्त त्यांचा उपयोग करणें हें पोरकटपणाचें खरे लक्षण आहे किंवा आपलें मत जें खरोखरी आहे तें सांगणें हें आहे याचा आमचे सुज्ञ वाचक विच्यार करतील.

रावसाहेब नारायणभाईची नेमणूक झालीच तर त्यांचे हातून काम चांगले होवो अशी आमची मनापासून ईश्वराजवळ प्रार्थना आहे व आमचें मत खोटें ठरलें तर इतरांपेक्षां आह्मास विशेष आनंद होईल. परंतु आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं, ठाणेकर बंधूच्या शिव्यांनीं आमचें मत कांहीं बदललें नाहीं. "अधिकार हा मनुष्यावर किंवा रंगावर नसून हुद्यावर आहे हें एका सामान्य पोलिस शिपायावरूनही दिसून येतें" हें अरुणोदयाचें ह्मणणें खरें आहे व एवढ्याचकरितां आम्ही ह्मणतों कीं, ज्यांत अधिकार आहे अशा हुद्याची जागा नेटिवास मिळाली तर तो अंमल गाजवील व नेटिवास डिपुटी कमिशनर नेमिलें तर युरोपियना इतका किंबहुना त्यांहून अधिक त्याचा अधिकार लोकांवर चालेल. पण पोलिस शिपायाचे शद्बानें जें काम एखाद्या खेड्यांत होईल तें वीस रुपये दरमहाच्या मास्तराच्या मोठ्या प्रयत्नानें तरी होईल काय? ठाण्याचे आसपासची स्थिति कशी असेल ती आह्मास माहित नाहीं; परंतु वऱ्हाडांत बिलकूल होणार नाहीं हें आम्ही खात्रीनें सांगतों. शाळाखात्यांतील अधिकाऱ्याचे हातीं कांहीं अंमल नाहीं ह्मणजे साधारण रयत लोकांचें बरें वाईट करण्याचें त्यांचें स्वाधीन नाहीं. याकरितां लोकांवर त्यांचे अमलाचा जोर चालत नाहीं. व वऱ्हाडांत शाळाखातें अमलाचें जोरानें चालविणें कांहीं काल अवश्य आहे याकरितां युरोपियन अधिकारी पाहिजे असें आमचें मत आहे. ठाणें व मुंबई इकडील स्थिति कशी असेल ती असो, पण वऱ्हाडांत असें आहे कीं, नुसता युरोपियन पाहिला कीं लोकांचे मनांत भीति उत्पन्न होते. खेडे गावांत गोरें कातडें दृष्टीस पडले की सगळे गावांतील लोक कोणी राजा आला आहे असें समजतात व त्याप्रमाणें त्यास मान देतात अशी लोकांची स्थिति आहे याकरितां जी गोष्ट अमलाचे जोरानें व्हावयाची आहे ती करून घेण्यास नुसता युरोपियनाचा शद्ब पुरे ह्मणून शाळाखात्यावरील मुख्य अधिकारी युरोपियन असावा असें आमचें ह्मणणें आहे. पुढें मुलकी खात्याचे मार्फत हें खातें चालेल हें खरें परंतु युरोपियन अधिकारी असल्यानें जसें मिलाफानें काम आजपर्यंत होत होतें तसें नेटिव नेमल्यानें होण्याचा संभव किती आहे हें इकडील माहिती ज्यास आहे त्यास पक्कें समजतें. डायरेक्टर युरोपियन असल्यानें डिपुटी कमिशनराकडून जसें त्यास काम करून घेतां येत होतें तसें नेटिव असल्यानें येईल किंवा नाहीं याविषयीं ठाणेकर बंधूस कारणें सांगितलीं तर तीं त्यांचे कानास पाहिल्य प्रमाणेंच वाईट लागतील व ज्यांस वऱ्हाडची स्थिति खरोखरी मांहित आहे त्यांस तीं सांगण्यास नकोत. २

आह्मी पुन्हा असें सांगतों कीं रावसाहे

व नाराभाई यांस ही जागा मिळो व त्यांचे कामांत त्यांस यश येवो आणि आमचें मत अगदी खोटें ठरो अशी आमची मनापासून इच्छा आहे.

## वऱ्हाड.

प्रिन्स आफ वेल्स हैदराबादेस खास जातील असें गेल्या आठवड्यांत एक वर्तमान प्रसिद्ध झालें होतें व हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी यांचें हैदराबादचे रेसिडेंट साहेब यास तारीख १७ सेप्टेंबरचें नंबर २२१५३९चें पत्र गेलेलें होतें त्यांत प्रिन्स तेथें आल्योवेळीं आफिसर लोकांचे पोशाक अमुक प्रकारचे असावे व इतर व्यवस्था अमुक प्रकारची असावी ह्मणून वगैरे मजकूर होता त्यावरून खरें वाटलें होतें; परंतु अलीकडे पुन्हा एक वर्तमान प्रसिध्ध झालें आहे कीं. रेसिडेंट साहेबांनीं विच्यारिल्यावरून हिंदुस्थान सरकारानें त्यांस कळविलें आहे कीं, तुमच्या सूचनेस फार उशीर झाला, प्रिन्स यांच्या फिरण्याच्या दिवसांच्या सर्व नेमणुका होऊन चुकल्या, आतां त्यांतून हैदराबादेकडे दिवस देण्यास सवड नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या या उत्तराबद्दल आह्मास वाईट वाटतें. हरप्रयत्नानें त्यांनीं हैदराबादेस प्रिन्स जातील अशी सवड काढावयाची होती.

निजाम सरकार नोवेंबर माहिन्याच्या दुसरे तारखेस हैदराबादेहून निघणार; त्यांबरोबर त्यांच्या मातुश्री, रिजेंट शमसूल उमराव बहादर, व आणखी कांहीं वडे लोक जातील. तसेंच मे० सांडर्स साहेब रेसिडेंट, ट्रेव्हर साहेब असिस्टंट रेसिडेंट, व डा० उइंडोव ही मंडळी जाणार आहे. व दिवाण सर सालरजंग डिसेंबर महिन्यांत मद्रासेकडून आगबोटींतून कलकत्यास प्रिन्स यांच्या भेटीकरितां जाणार आहेत.

मेजर ए. एच ई. क्यांबेल यांस रेसिडेंट साहेबांचे आफिशियेटिंग मिलिटरी सेक्रेटरी नेमिलें.

निजाम सरकारचे प्रवासाकरितां राजकीय आगगाडी सवालक्ष रुपये किमतीची नवीन तयार झाली आहे तिजमधून सरकार स्वारी मुंबईस जाणार.

मि० जिवाजी पेस्तमजी या नावाचे एक पारशी थोर गृहस्थ हैदराबादेस होते ते या महिन्याचे ८वे तारखेस मरण पावले. यांचे तीर्थरूप पेस्तमजी साहेब वऱ्हाडांत सर्वांस ठाऊक असतील. सुमार ५० वर्षांमागें वऱ्हाडचें सारें राज्य त्यांच्या हातीं होतें. व त्यांनीं बांधलेल्या मोठमोठ्या धर्मशाळा या प्रांतांत बहुत गावांतून अजून आहेत त्यांवरून त्यांचें स्मरण पुढेंही लोक विसरणार नाहींत. असो. त्यांचे चिरंजीव जिवनजी यांसही हैदराबादेस मोठा मान होता व स्टेट बोर्ड ह्मणजे सरकार कौंसलांत ते मेंबर होते व सहा महिने झाले त्यांनीं पेनशन घेतलें होतें.

निजाम सरकार पुण्यास मुक्काम करणार तेव्हां त्याना राहावयास मुंबईचे मि० नसरवानजी माणकजी पेटिट यांनीं आपला पुण्यांतला उत्तम व भव्य बंगला ईगल्स नेस्ट नावाचा आहे तो भाड्याशिवाय ह्मणजे केवळ आदरार्थ देण्याचें कबूल केलें आहे. याबद्दल आह्मास संतोष वाटतो. मुंबईस कित्येक लोक या हंगामांत बंगल्यांचें भाडें हजारों रुपये रोज मिळविणार आहेत हें आमचे वाचकांस ठाऊक आहेच.

रा. रा. कृष्णाजी दिनकर सहस्त्रबुध्धे येथील इंजिनियर खात्याकडील फर्स्टग्रेड ओव्हरसियर हे सुपरवायझर झाले असें समजतें. आतां यांस पगार १५० रुपये मिळेल. हें ऐकून आह्मांस संतोष होतो.

रा. रा. माधवराव हरि सहस्त्रबुध्धे क्लार्क आफ धि कोर्ट हे आपले कामावर जाण्याकरितां शुक्रवारीं उमरावतीस गेले.

तारीख १५ शुक्रवार रोजीं येथें जुडिशियल कमिशनर आफिसांत हायर व लोअर स्न्यांडर्ड परीक्षा सुरू झाली व काल रोजीं समाप्त झाली. परिक्षेकरितां कामिटी होती ती—

प्रेसिडेंट.

मेजर बेल साहेब जुडिशियल कमिशनर.

मेंबर.

१ क्या. बुलक सा. डिपुटी कमिशनर.

१ मि० इलियट सा. आफि० डायरेक्टर.

१ क्या. लेन सा पोलि. इन्स्पे जनरल.

परीक्षा देण्याकरितां कामदार आले ते.

हायर स्न्यांडर्ड

१ खान बहादूर शाबूदीन साहेब अक्याची उमरावती.

१ मि० दोराबजी कावसजी तहाशिलदार खामगाव.

१ मि० आर्देसर दिनसाजी तहशिलदार अकोट.

लोअर स्न्यांडर्ड

१ मि० किट्स साहेब असिस्टंट कमिशनर उमरावती.

१ मि० अबदुल हक्क साहेब ए० असिस्टंट कमिशनर कारंजा.

१ मि० सादत मीरखा तहाशिलदार पुसद.

१ मि० अबदुल राहिमानखा तहशिलदार वाशिम.

१ रा. रा. वासुदेव त्रिंबक हुजूर कारकून रिविन्यु सर्व्हे.

१ रा. रा. नारायण बाजीराव कार० हेड कार्टर रि० सर्वे

या प्रमाणें दोन्ही परीक्षा मिळून ९ उमेदवार होते शुक्रवारीं दिवाणी व फौजदारी सवाल झाले व शनिवारी मुलकी, स्टांप, अकौंट, खजीना वगैरेचे सवाल झाले.

या परिक्षेचें स्वरूप समजण्याकरितां प्रश्नांचे कागद आह्मी पुढें प्रसिद्ध करूं, परिक्षेचा निकाल रेसिडेंट साहेबांकडून अवकाशानें कळेल.

अकोट तालुक्यांतील उकळीकर मारवाडी माधोराम सुकराम व जयराम पांडे यांजवर बनाऊ पुरावा केल्याचा मुकद्दमा अडगावचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांजकडून निष्पन्न होऊन आला त्याची चौकशी एथें बरेच दिवस डिपुटी कमिशनर सा० पुढें चालून शेवटीं त्यावर अपराध शाबीद झाला व माधोराम यास तीन महिने सक्त मजूरी कैद व २०० रुपये दंड आणि जयराम यास तीन महिने सक्त मजुरी कैद अशी शिक्षा झाली. या खटल्यांत आरोपीतर्फे दोन येथील वकील असून मि० नारायण स्वामी या नावाचे नागपुरचे नामांकित वकीलही आले होते.

रा. रा. पुरुषोत्तमराव नारायण अडगावचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर हे साहेब लोकांच्या भेटीकरितां दोन दिवसांचे रजेनें शुक्रवारीं येथें आले आहेत आज परत जातील. त्यांविरुद्ध दोन अर्ज झाले होते त्यांचा तपास मि० निकोलेट्स साहेब असि० कमिशनर यांनीं समक्ष जाऊन केला त्यांत तथ्य किंवा सदोष ह्मणण्यासारखें कांहीं निष्पन्न झालें नाहीं असें ऐकतों. याविषयीं आह्मांस विशेष कळल्यावर आह्मी सावंत लिहू. हे अर्ज कित्येक अडून गोळ्या मारणाऱ्या लोकांच्या खटपटीनें झाले असेंही ऐकण्यांत आहे.

मि० आर्देसर दिनसाजी अकोटचे तहशिलदार यांनीं या महिन्याच्या अखेरीचे सुमारास दीड महिन्याची रजा मागितली आहे. यांच्या रजेंत मि० सफदर अली पोलिस इन्स्पेक्टर हे आफिशियेटिंग तहशिलदार होतील अशी बोलवा आहे. आह्मांस वाटतें कीं यांहून मि० बाकर अली यांचा हक्क अधिक आहे.

या आठवड्यांत एथें युरोपियन लोकांचे क्रिकेट वगैरे खेळ झाले त्याकरितां बाहेरून मेजर बुशबी साहेब, क्या. हडलस्टन साहेब, मि. हार्डिने साहेब, क्या. फिटझरल्ड साहेब, व क्या. मेकंजी साहेब असे सर्व डिपुटी कमिशनर आले आहेत. तसेच क्या. ग्रांट साहेब, क्या. लेन साहेब, क्या. राईट साहेब, मि. किट्स साहेब, इत्यादि दुसरेही युरोपियन आले आहेत ते व आमचे एथील युरोपियन मिळून नित्य आनंदानें क्रीडा करीत आहेत. युरोपियन लोकांत हा प्रघात मोठा मोजेचा असून शारीर सुखास उपयोगी असा आहे.

९ वे तारखेचे हिंदुस्थान सरकारचे ग्याझेटांत रा. सा. नारायण भाई यांची नेमणूक आली नाहीं यावरून ५ वे तारखेचे टा० चे सिमल्याचे तारेप्रमाणें अजून खास हुकूम झाला नाहीं असें वाटतें. ६ व्या व ७ व्या तारखेच्याही दुसऱ्या कांहीं नेमणुका त्या ग्याझेटांत आहेत.

हायस्कुलाच्या परीक्षा बारावे तारखेपासून सुरू झाल्या आहेत. लेखी प्रश्नांचीं उत्तरें कित्येक डिपुटी इन्स्पेक्टराकडे जाऊन त्यांनीं तपासावीं अशी योजना झाली आहे. संस्कृताकारितां येथें रा. रा. श्रीराम भिकाजी व उमरावतीस रा. रा. बाळकृष्ण शास्त्री यांस परिक्षक नेमिलें आहे. व इंग्लिशकारितां खुद्द डायरेक्टर व मराठीकारितां त्यांचे हेड क्लार्क रा. रा. वामनराव बाळाजी हे आहेत. इलियट साहेब २ दिवस उमरावतीस जाऊन आले व वामनराव आतां गेले आहेत.

रे. नारायण शेषाद्री या आठवड्यांत येथें आले होते त्यांनीं गेले रविवारीं नारायण विष्णु सहस्त्रबुध्धे यास ख्रिस्तीधर्माची दीक्षा दिली. व सोमवारीं सायंकाळीं शहरांतील शाळेंत युरोपांत व अमेरिकेंत केला प्रवास त्याच्या माहितीचें व्याख्यान दिलें.

आमचे हल्लींचे रेसिडेंट मि० सी. बी सांडर्स साहेब नोकरी सोडून स्वदेशीं जातील तेव्हा त्यांचे जागेवर कर्नल डब्ल्यु आस्बर्न भूपाळचे रेसिडेंट हे होतील व. ते सर्वोपरी त्या जागेस योग्य आहेत असें टाइम्स कर्ते ह्मणतात.

मि० एटकिन साहेब येथील हाय स्कुलचे हेड मास्तर यांस इन्स्पेक्टर नेमण्याविषयीं शिफारस झाली आहे असें उर्दू अ. वरून समजतें. हें खरें काय? ही नि. वडणूक आमचे हुशार व चाणाक्ष आफि. डायरेक्टर मि० इलियट साहेब यांणीं केली काय? समजत नाहीं. विद्याखात्याचे मुख्य डायरेक्टर जर आतां नेटिव गृहस्थ नेमिले जात आहेत तर त्यांच्या खालच्या दर्जास इन्स्पेक्टर युरोपियन आह्माला कशाला पाहिजे? ती जागा नेटिवास अवश्य असावी व या गोष्टीकडे डायरेक्टर, रेसिडेंट व हिंदुस्थान सरकार लक्ष्य देईल असें आम्ही इच्छितों.

मंगरूळचे तहशिलदार मि० शाबासखा व केळापुरचे तहशिलदार मि० शेषाचलं मुदालियार यांस थर्ड क्लास माजिस्त्रेटचे अधिकार मिळाले. व पहिल्यास १०० आणि दुसऱ्यास ५० रुपये पर्यंत दिवाणी दावे पाहण्याचे अधिकार मिळाले.

आह्मांस लिहिण्यास दुःख वाटतें कीं मि० अबदुलहक्क साहेब यांची प्रियपत्नी कारंजे मुक्कामीं गेले विजयादशमीस मरण पावली. या बाईचें सासर व माहेर दोन्ही घरें नामांकित असून ती स्वतां गुणवती व सुशील होती. मराठी, मुसलमानी, पारशी व थोडी इंग्लिशभाषा तिला येत होती. तिच्या अकालिक मरणानें अबदुलहक्क साहेबांस अत्यंत दुःख होईलच पण ही गोष्ट ऐकून त्याना जाणणाऱ्या इतर बहुतांसही दुःख होईल यांत संशय नाहीं. ईश्वरेच्छेपुढें इलाज नाहीं अबदुल हक्क साहेबास आमची आतां शिफारस आहे कीं आपल्या सद्गुणमंडित कांतेच्या स्मारक त्यांनीं चिरकालिक कांहीं करुन करावें.

## वर्तमानसार

लाहोराकडे आगस्ट महिन्यांत २५ हजार सर्प मारले.

खानदेशचे पोलिस इन्स्पेक्टर मि० शिवराम पांडुरंग केरकर यांस मुंबई इलाख्यांत प्रिन्स आफ वेल्स असतील तोंपर्यंत त्यांचे दिमतीस देणार.

इंदूरच्या चीफ जस्टिसचे शिरस्तेदार रा. रा. रावजी बळवंत यांस तेथेच सिटी माजिस्ट्रेट नेमिलें.

प्रिन्स आफ वेल्स लंडनाहून इकडे येण्याकरितां तारीख ११ रोजीं रात्रौ ८ वाजतां निघाले. पारीसपर्यंत त्यांचे बरोबर त्यांची पत्नी व बंधू ड्यूक आफ एडिंबरो आले होते.

मुंबईच्या म्युनिसिप्यालिटीचें पुढील वर्षाचें बजेट तयार झालें आहे त्यांत जमेची रकम २८९६००० रुपये व खर्चाची २९८९००० रुपये आहे व दीड लाख रुपये मागील शिलक दाखविलेली आहे.

मुंबईस वकिलीची परीक्षा तारीख १४ माहे फेब्रुवारी सन १८७६ इसवी रोजीं व मुनसफीच्या परीक्षा तारीख १४ मार्च रोजीं होणार असें समजतें.

जपानांत एक शेतकरी विहीर खणीत असतां तिला केरोशाइन तेलाचे झरे लागले. तें पाहून त्यणें आणखी तशा पंध्रा विहिरी खणिल्या त्यांतून तिहींस तसेच तेलाचे झरे लागले आहेत. व त्यांतून नियमशः बरेंच तेल निघतें.

प्रिन्स आफ वेल्स कलकत्त्यास जातील तेव्हां बडोद्याचे दिवाण सर टी माधवराव तिकडे जाणार आहेत. व त्यावेळीं मि० काजी शाबुदीन भाई अक्टिंग दिवाण होतील असें वर्तमान आहे.

बडोद्याच्या इंजिनियर खात्याचे मुख्याधिकारी यांच्या कांहीं लबाड्या दिसून आल्यावरून त्यांनीं दीडलाख रुपये दंड द्यावा असा सरकारानें ठराव केला

विलायतेमध्यें कापसाचें सूत व वस्त्रें तयार करण्याच्या गिरण्या २६६९ आहेत त्यांतून ३७६१५७७२ चात्या व ४६३११८ माग चालतात. कामावर मनुष्यें ४७९५१५ आहेत त्यांत अठराहून अधिक वयाचे पुरुष ११९३९१ आहेत. तेरा वर्षांवरील वयाच्या स्त्रिया २५८६६७ आहेत व मुलें ६६९०० आहेत.

एडन बंदराजवळ आरब आणि तुर्क लोकांची लढाई झाली तींत आरबाचा पराभव झाला व ६०० आरब मेले व जखमी झाले.

लार्ड नेपियर साहेब सेनापतीची जागा येत्या उन्हाळ्यांत सोडणार असें वर्तमान आहे.

विलायतचा ब्रिटिश राज्याचा जुलाई, आगष्ट, व सप्तंबर या तिमाहीचा वसूल १६३७५०००० रुपये झाला.

लार्ड नार्थब्रुक हिंदुस्थानचे गवरनर जनरल नोवेंबरचे १२ वे तारखेस इंदुरास जाणार. व तेथें दरबार होणार.

कराचीस एक जहाज बुडालें व त्यांत बहुत लोक होते ते सर्व मरण पावले. व मालाचा नाश झाला.

मि० रिकेटस पंजाबातील सिविल इंजिनियर पांजवर लांच खाल्याचा आरोप आला आहे.

या वर्षाचे हंगामांत चाळीस हजार मण आफू झाली. गुदस्त सालीं त्रेचाळीस हजार मण झाली होती.

ब्रह्मदेशांत अतिशय पाऊस पडला व तांदळाचे पिकाची नासाडी झाली.

हिंदुस्थान सरकारच्या कायदे कौन्सलांत बळरामपुरच्या राजाला मेंबर नेमिलें यांना शिकार फार चांगली खेळता येते व प्रिन्स बरोबर शिकारीस नेण्यास त्यांस सवड व्हावी ह्मणून ही नेमणूक झाली असावी अशी कोणी थट्टा केली आहे.

अजमिरापासून नशिराबादेपर्यंत स्टेट रेलवे तयार झाली आहे ती चालू करण्याचा समारंभ लवकरच होईल. तसेंच अमदाबादेहून अजमिरापर्यंत बडोदा रेलवे वाढवावी अशाविषयीं हजारो लोकांनीं अर्ज केला आहे हें आमचे वाचकांस ठाऊक असेलच.

आग्रा येथील यमुनेचा पूल तयार झाला तो तारीख १ नोवेंबर रोजीं चालू होईल.

### शेतकी.

हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. ह्याचा उद्योग मनुष्याच्या सुखास जितका साक्षात उपयोगी पडतो तितका दुसरा कोणताही पडत नाहीं. याजकडे लक्ष्य फार प्राचीन काळापासून दिलेलें आहे. वराहमेहेर ह्याचा जो एक फार प्राचीन ग्रंथ अलीकडे प्रसिद्ध झाला आहे. त्यांत याविषयीं पुष्कळ माहिती दिली आहे आणि ती त्याच्या मागच्या बहुत काळच्या ग्रंथांच्या आधारानें लिहिलेली आहे, असें ह्मटलें आहे. ह्यावरून कृषिकर्माकडे लोकांचें लक्ष्य फार प्राचीन काळापासून लागलेलें असावें असें वाटतें. बागाईत शेतास खत घालण्याचे प्रकार पुष्कळ सांगितले आहेत. त्यांत असा एक सांगितला आहे कीं, ज्या जमिनींत फळझाडें वगैरे लावणें असेल तेथें आधीं तीळ पेरावे ते वाढून त्याच्या बोंडांतून तीळ पिकून तसेच खालीं गळूं द्यावे, आणि तें त्या जमिनींत मर्दावे ह्मणजे पीक उत्कृष्ट येईल. न्या. सि.

### नारूवर बिनपैशाचें औषध.

रा० रा० गणपत रामचंद्र रेवाकाठा प्रान्तांतील देवगड बारिया येथील डिस्पेन्सरीचे सुपरिंटेंडेंट यांणीं आमचेकडे सर्व लोकांस कळण्याकरितां लिहून पाठविलें आहे:— ह्या त्रासिक व चिकट रोगावर इंग्रजींत तर नाहींच; पण आपले मराठी वैद्यांजवळ देखील खात्रीनें लागू पडण्यासारखें औषध बहुतकरून मिळणार नाहीं. शोध व अनुभव घेऊन पहातां पुष्कळ लोकांस या खालीं लिहिलेल्या औषधाचा गुण आला आहे.

१. कोंबडीची शीट ( विष्ठा )

१. कळीचा चुना (ओला केलेला)

१. हिंग.

वरील औषधें तीन समभाग ( ह्मणजे प्रत्येक पैसाभार ) घेऊन एकाद्या झाडाच्या पानावर थापटीसारखें पसरून लावावें आणि नारू झालेल्या पायास अगर शरीराच्या ज्या भागास नारू झाला असेल तो भाग कापडाचे वेष्टणानें बांधावा व तो तीन दिवस सोडूं नये, चवथे दिवशीं सोडावा. पुढें नारू झालेली जागा पांच चार दिवस किंचित दुखते, पण ह्या औषधानें नारू आंतले आंत जळून रोग्यास कोणत्याही तऱ्हेची व्यथा रहात नाहीं. ज्ञा. प्र.

## अगदीं क्षुल्लक गोष्टींत खुद्द सरकार नेटिवांचीं मनें दुखवूं लागलें.

कोणत्याही गोष्टीचा अतिशय बहुधा स्थित्यंतरास कारणीभूत होतो. नेटिव लोकांस युरोपियन लोक कःपदार्थ मानतात, त्यांची मानहानी करतात व त्यास आपले केवळ गुलाम समजतात हा गवगवा फार दिवस होत असून त्याचा पुष्कळांस अनुभवही आहे. शेंकडो युरोपियन लोक नेटिवांस काळीं जनावरें समजून साधारण चुकी बद्दल पाठीवर कोरडे उडवितात व चैनीखातर त्याची जंगली जनावराप्रमाणें पारध करितात. जोंपर्यंत इंग्रज सरकारचा पूर्ण अमल या देशावर बसला नव्हता व नेटिवांचे पाणी जोंपर्यंत इंग्रज लोकांनीं तोललें नव्हतें तोंपर्यंत हीं मनुष्यें तरी आहेत असें ते समजत असत परंतु आतां त्यांचे ते सर्व विचार बदललें, ते मन मानेल तसें वागूं लागले व सरकारही त्यांच्या या विचारशून्यपणाचे वर्तणुकीबद्दल उघड डोळेझांक करूं लागलें. तेव्हां आतां ही स्थिति कोठपर्यंत पोंचणार याचें कांहीं अनुमान होत नाहीं. नेटिव लोकांनीं असें कोणतें पाप केलें आहे तें नकळे, कीं ज्याचे योगानें ते मनुष्य जातींत असतांही पशु जातीप्रमाणें वागविले जावे. अरेरे!! कितीही वाईट स्थिति!! यापेक्षां पशु जाती बरी, कारण ती ज्ञानशून्य असल्यामुळें सुख दुःखाची पर्वाच करीत नाहीं.

असो, आज हे विचार सुचण्यास कारण आमचे हतभागी मल्हारराव महाराज व मराठी राज्याचें आद्य पीठ जो सातारा तेथील सांप्रतचे आबासाहेब महाराज. यांतील मल्हाररावाबद्दल तर विशेष लिहिण्याचें कारण नाहीं. इंग्रज सरकारानें तर आपल्या पूर्ण दावेदाराप्रमाणें त्याचा सूड उगविण्याचा क्रम चालविला आहे. राज्याविषयींची आपली निराशा झाली असें समजून आपल्या राज्याचें स्त्रीधन वगैरे मिळावें ह्मणून खटपट करावी याकरितां आपले वकिलाशीं बोलण्याची परवानगी मिळावी ह्मणून मल्हाररावानें अर्ज केला होता व त्याचा जबाब मिळाला कीं, जें कांहीं सांगणें असेल तें इंग्रज सरकारचे कामदारांच्या समक्ष सांगावें. आतां हें सांगणें किती अविचाराचें आहे याचें अनुमान करणें फारसें कठीण नाहीं. असो, ही अट मल्हाररावास पतकरत नसल्यामुळें त्यांनीं या बाबतींत स्टेट सेक्रेटरी यांजकडे बोलणें लाविलें परंतु त्यांजकडून उत्तर मिळालें व तें आतां शेवटलेंच समजलें पाहिजे. स्टेट क्रेटरी ह्मणतात कीं, तुमचें ह्मणणें आमच्यानें कबूल करवत नाहीं. कां? मल्हाररावास आपलें ह्मणणें नाकबूल झाल्याबद्दल जें दुःख होईल त्यांतच आपल्या सूड उगविण्याचा थोडा भाग सिद्धीस गेला ह्मणून आनंद मानावा कीं काय? अरेरे!! साधारण आरोपीस जी गोष्ट हक्कानें दिलेली आहे तिजबद्दल मल्हारराव विनयणी करीत असतांही त्यास मिळू नये इतका तो गुन्हेगार आहे काय? किंवा मल्हाररावानेंच गवरनर जनरल कडून जबाब मिळाल्यावर स्टेट सेक्रेटरीचे तोंडचीं पुनः छापील अक्षरें ऐकण्याचीखटपट करावयाची नव्हती, कारण गुळाचा गणपती व गुळाचाच नैवेद्य, या ह्मणीप्रमाणें हल्लीं आपलें सरकार आहे. असो, एकंदरींत मल्हाररावास आतां आपली दाद लागण्याची आशाच नको. तेव्हां या जुलमाची व स्वैर [illegible]णुकीची कमाल झाली कीं नाहीं? व यापासून नेटिव लोकांससे काय परंतु न्यायी अशा त्रयस्थ मनुष्यास देखील वाईट वाटेल हें उघड आहे.

दुसरी गोष्ट ही कीं थोडे दिवसांपूर्वीं मुंबई येथें निघणाऱ्या सरकारी ग्याझेटांत सरदार लोकांचा पट छापला त्यांत साताराचे श्री० आबासाहेब महाराज यांचे पाहिले प्रतीचे सरदारांत नाव घातलें आहे हे ऐकून तर प्रत्येक नेटिवास खरोखर फार वाईट वाटेल. कारण इंग्रज सरकारानें साताराची गादी आपल्या सत्तेच्या जोरावर जरी अगदीं संपत्तीहीन व अधिकारहीन करून टाकली आहे व साताराचे महाराजांचे अंगीं जरी आपलें वर्चस्व मिरविण्याची शक्ती व योग्यता नाहीं तथापि इंग्रज सरकार ज्याअर्थीं आपणास पेशव्यांचे ठिकाणीं मानतें त्याअर्थीं निदान बहुमानास्तव तरी त्यांणीं साताराचे राजगादीचा अपमान करणें हें अप्रशस्त होय. अगदीं गरीब आईबापांच्या पोटीं उत्पन्न झालेला मुलगा प्रत्यक्ष राजा बनला ह्मणून त्याच्यानें आपल्या वडिलांचा अपमान करावा काय? त्याप्रमाणेंच पेशव्यांचे स्थानापन्न होऊन आज हिंदुस्थानचें सार्वभौमत्व पावणाऱ्या इंग्रज सरकारानें पेशव्यास शिरसावंद्य जी वरील राजगादी तिचा अपमान करावा काय? आतां कदाचित सरकारचें असें मत असेल कीं पोकळ प्रतिष्ठेंत कांहीं अर्थ नसल्यामुळें आह्मी तसें केलें तर हेंही ह्मणणें केवळ लाचारी दिसेल. कारण त्यांचें तसें मत आहे ह्मणावें तर नाईट, स्टार, वगैरे किताब सरकार देतेना. तेव्हां एकदां साताराचें घराणें सरदारांचे पटांत घसरलें ह्मणजे त्याजबद्दल लोकांची पूज्य बुद्धी असल्यामुळें जो त्यांचे हिताहिताचे संबंधानें बोभाटा होतो तो लोकांचे मनाव रहे सरदारच आहेत असा एकदां ठसा उठला ह्मणजे कमी होईल. असो, सारांश काय कीं अगदीं क्षुल्लक कामांतही सरकार नेटिवांचीं मनें दुखवूं लागलें हे फार वाईट आहे असें राजभक्तीस अनुसरून सूचना करण्याचें जें आमचें कर्तव्य तें आह्मी बजाविलें या उपर सरकारची मर्जी.

स. स.

हे पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ९ अकोला, रविवार ता० २४ माहे अक्टोबर सन १८७९ इ० अंक ४३

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या खेरीज पत्र सुरू केलें जाणार नाहीं.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिस.

सदापा वलद गंगापा गाढवे व गुजाई मर्द धोंडापा हल्लीं वस्ती कारंजा जिल्हे उमरावती यांस धोंडापा वलद कोंडापा विभूते वस्ती कसबे पिंजर जिल्हा अकोला याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मापैकीं आमची बायको नामें गुजी इजला तुह्मी सदाप्पा हे आपले घरीं घेऊन गेले असोन आजपावेतों आह्मी पुष्कळ वेळ तिला आमचे घरीं आणविण्याविषयीं उद्योग केला असतां तुह्मी पाठविलें नाहीं व तिला न पाठविण्या विषयीं हल्लीं तुह्मी नानाप्रकारचे फंद फितूर करीत अहा तर हल्लीं या नोटिशीनें कळवितों कीं आमची बायको तिचे अंगावर असलेले चांदीचे दागिने तोड्याचा जोड तोळे ६२, दंडवाळ्या तोळे ३०, कडीं भरीव १० तोळे, पाटल्या ६ तोळे, गरसळी सोन्याची किंमत रुपये ८, नथ रुपये ८, चांदीचे लिंग तोळे ४ व खंबाईत किंमत रुपये ४० मिळून १६८ रुपये किमतीचा ऐवज तुमचे जवळ आहे त्यासुद्धां आमचेकडे १५ दिवसांचे आंत पोंचवून द्यावी तुह्मी सदापा तिचे भाऊ अहा सबब न पाठविणें तुह्मास योग्य नव्हतें. व गुजीलाही रहाणें योग्य नाहीं तर वर लिहिल्याप्रमाणें तुह्मी उभयतांनीं न केल्यास तुह्मावर फिर्याद करू कळावे तारीख १६ माहे अक्टोबर सन १८७९ इसवी.

(सही) धोंडापा वलद कोंडापा विभूते निशाणी खुद्द हातची रेघ

नोटिस.

बापू वलद भैरव नाथ वडवकर मुक्काम हिरपूर तालुके मूर्तिजापूर जिल्हा उमरावती यास तुळशी मर्द बापू वडवकर मुक्काम शिरलें तालुके बाळापूर इजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्माशी माझें लग्न झाल्यास सुमार १२ वर्षें झालीं. लग्नाचे वेळीं मी लहान होते तेव्हांपासून मला पदर येईपर्यंत मी तुह्माकडे जाऊन येऊन होते. व पदर आल्यावर ही च्यार वर्षें तुह्मा जवळ काढिलीं. तुह्मी मला हमेशा मारहाण करीत असा त्या जबद्दल लोकांनीं तुह्माला पुष्कळ सांगितलें तरी तुह्मी ऐकिलें नाहीं व मला फार दुःख होऊं लागले सबब मी आपले बापाचे घरीं माराचे धाकानें निघून आलें. त्याला सहा वर्षें झालीं. माझ्या बापानें २।३ वेळां तुह्माकडे माणसें पाठवून व स्वतां येऊन रदबदली केली व जातींत पंचाईतही केली पण तुह्मी मला नांदविण्याचें कबूल केलें नाहीं. आतां ६ महिने झाले तुह्मी दुसरी बायकोही केली असें ऐकिलें. त्यावरून तुह्मास या नोटिशीनें मी असें कळवितें कीं माझा जनरीतीप्रमाणें संसार तुह्मी होऊं द्यावा. दुसरी बायको केली तरी फिकीर. नाहीं मारहाण न करितां च्यार लोकांच्या रीतीप्रमाणें तुह्मी मला वागवावें व घेऊन जावें मी येण्यास सिद्ध आहे. ईश्वरानें व आई बापानीं मला तुमच्या पदरीं घातलें तर तुह्मापासून मला सुखानें अन्न वस्त्र मिळावें अशी माझी इच्छा आहे. इतक्या उपर ही गोष्ट तुह्मास नापसंत असल्यास कृपा करून मला लग्नाच्या हक्काचा बेदावा ह्मणजे फारखत लिहून द्यावी. ही नोटिस पोचल्यापासून १५ दिवसांत तुह्मीं मला नांदावयास घेऊन गेला नाहीं अगर फारखत दिली नाहीं तर तुमचा लग्नाचा हक्क रद्द करण्याची व दुसरा नवरा पाहून गंधर्व करण्याची कायदेशीर रीतीनें तजवीज करणें मला भाग होईल. यासाठीं तुह्माला अगाऊ कळविलें आहे. तुमचा जबाब असेल तो नोटिस पोचतांच कळवावा. तारीख १८ माहे अक्टोबर सन १८७९ इसवी.

(सही) तुळशी मर्द बापू वडवकर इचे हातची निशाणी बांगडी.

नोटिस

लक्ष्मण शिवराव व त्रिंबकराव हणमंतराव देशमुख प्रगणे हिवरखेड तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते ती खालीं लिहिल्याप्रमाणें

प्रगणे हिवरखेड येथील देशमुखीचे वतनांत माझा सहावा हिस्सा असून माझ्या मुखत्यारपत्रावरून त्रिंबकराव हणमंतराव यांणीं सन १८६४ पासून सन १८७२ इसवीपर्यंत माझे तर्फे वहिवाट केली परंतु आजवर माझे वृत्तीचे उत्पन्नाचा वगैरे हिशोब दिला नाहीं व मागणें केलें असतां दसकती लक्षुमण शिवराव याजकडोन रुसूम मिळाला नाहीं ह्मणतात.

यास्तव तुह्मा उभयतांसही कळवितें कीं, तुह्मी दोघांनीं एकमत करून माझा विधवेचा अंशअभिलाष करणें हें तुह्मास चार मनुष्यांत दूषणरूपी आहे. यास्तव हा नोटिस पोचतांच आठ दिवसांचे आंत तुह्मी स्पष्ट उत्तर आप आपलें निरनिराळें द्यावें कीं, माझे रुसुमाचे पैशाची काय व्यवस्था झाली आहे व तो कोणाकडे राहिला आहे. असें जर न समजलें तर तुह्मा उभयतांवरही एकच फिर्याद आणणें मला भाग आहे. व त्या योगानें कदाचित् तुह्मा दोघांपैकीं कोणाएकास दाव्यांत विनाकारण खर्च पडेल तर त्याची जबाबदारी मजकडेस नाहीं.

याशिवाय प्रगणे हिवरखेड येथें व मौजे अकोली येथें इनाम जमीन जी माझे मयत भ्रताराचे हिश्शांत आहे ती—

प्रगणे हिवरखेड येथील.

सर्वे नंबर ४५८, सर्वे नंबर ४०४, सर्वे नंबर ३९७, सर्वे नंबर २११, व सर्वे नंबर २५८.

मौजे अकोली येथील.

सर्वे नंबर २२, सर्वे नंबर ४५, सर्वे नंबर १, सर्वे नंबर १० व सर्वे नंबर ६९.

हा सर्व जमीन माझे मयत नवऱ्याचे व माझे कबजांत असोन पुढें मी आपले कडून त्रिंबकराव याचे नावें मुख्त्यारपत्र दिल्यावर तुह्मी उभयता मिळोन त्या शेताचीं खातीं वगैरे आपले नावावर बदललीं आहेत व यापैकीं ज्या शेताचें खातें वडीलपणाचें संबंधानें मात्र तुमचे नावें होतें परंतु कबजा आणि मालकी त्यावर सर्वोपरी माझी होती तीं सर्व शेतें तुह्मी उभयतांनीं लबाडकीनें आपले कबजांत घेतलीं आहेत. परंतु या कामांतही तुह्मा दोघांपैकीं कोणाची लबाडी माझे नुकसानीस कारण आहे हें समजत नाहीं. यास्तव तुह्मीं आप आपलें उत्तर मला निरानिराळें द्याल तर ठीक आहे अथवा तुमचें उत्तर निरानिराळें नसलें तर हा नोटिस पोचल्यापासून आठ दिवसांचे आंत माझा रुसुमाचा हिशोब व माझी जमीन माझे ताब्यांत देण्यास तुह्मी राजी आहा कीं, नाहीं हें उत्तर द्यावें. दोहोंपैकीं कोणतेंहा उत्तर न आल्यास मी आपले दाव्यांत तुह्मा उभयतांसही प्रतिवादी करून दावा आणणार आहे व पुढें तुमचे खर्चाबद्दल मजवर कांहींच जबाबदारी रहाणार नाहीं. हें समजून या नोटिशीचें उत्तर ही नोटिस पोचल्यापासून आठ दिवसांचे आंत द्यावें. कळावें तारीख २० माहे आक्टोबर सन १८७९ इसवी.

(सही) गंगाबाई जवजे नारायणराव आनंदराव देशमुख प्रगणे हिवरखेड निशाणी खुद्द.

नोटिस

रा. खुशालराव गणेश देशपांडे प्रगणे आकोट यासी लक्ष्मण वल्लद प्रतापजी गावंडे मुक्काम मौजे भुरजखेड तालुके दर्यापूर तुह्मी तारीख २९ सप्तंबर सन १८७९ इसवीचे उडदू अखबारांतून आह्मास नोटिस दिली ती पावली त्याचें उत्तर खालीं लिहिल्या प्रमाणें—

तुह्मी लिहिता कीं तुमचे दोन हिस्से आमचे नंबरांत आहेत तें आह्मास बिलकूल माहित नाहीं. कारण सदर्हू शेत पुंजाजी वल्लद नखाजी काळगव्हानकर याजपासून आह्मी तीन वर्षांपूर्वीपासून आमचे नावें करून घेतलें सदरील मुदतींत तुह्मी कधीच येऊन सदर्हू हिश्शाबद्दल कधींच गिल्ला केला नाहीं व आतां विनाकारण खोटी नोटिस देता हें तुमचे लायकीस व योग्यतेस शोभत नाहीं कारण त्या शेतांत जर खरोखरी तुमचा हिस्सा असता तर पुंजाजी वल्लद नखाजी त्या शेताचा मालक आह्मास कळविता अगर तें शेत आह्मी आपले नावें करून घेतलें तेव्हां तुह्मी हरकत करते तसें नसून या तीन वर्षांत देखील तुह्मी कधींच अडथळा केला नाहीं व आतां एकदम तीन वर्षांचा हिस्सा मागता हें अगदी गैर आहे तुमचा हिसा आह्मी कधींच जाणत नाहीं आपणास कळावे तारीख १८ संप्तबर सन १८७९ इसवी.

(सही) लक्ष्मण वल्लद प्रतापजी पाटील मौजे भुरजखेड तालुके दर्यापूर निशाणी खुद्द दस्तुर गोविंद रामराव.

नोटिस.

मिस्तर जेकब्स इंजिनियर ग्याडम कंपनी अकोट यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं मजला तुह्मी बंगला तयार करून देण्याचा मक्ता कच्या विटांनीं बांधावा अशाबद्दल ठराव रुपये ३०० चा करून दिला. त्यांत जुनीं लाकडें जीं आहेत त्याजमध्यें कमी पडल्यास नवीन मी आपले पदरचा पैसा खर्च करून लाऊन द्यावा व त्याच प्रमाणें कवेलू कमी आले तर तेही घेऊन लावावे व बंगला तयार झाल्यावर गिलावा ह्मणजे छपाई करावी बाकीची मजुरी वाढ काम खिळे पट्टी दरवाजास भिंगें वगैरे असें एकंदर तुह्मी कबुल करून मी मक्ता घेतला त्याप्रमाणें मी सामान तयार करून बंगला तयार केला. व रांड्याचे एका बाजूस लाकडे लाऊन तयार केलीं तीं तुमचे एजन्ट साहेब यांणीं पाहून पसंत केलीं असोन बाकी दोन बाजूची राहिलीं आहेत त्याजबद्दल जास्त माल चुना, लाकडें, कवेलू कपौंडांत पडला आहे. या सर्व मक्त्यांत इतकेंच काम पुरें करून देण्याचें राहिलें आहे व लाकूड कंपौं-

डांत आहे त्यास सुतार लाऊन तयार करून घ्यावें. दोन बाजूचे कवेलूचीं तोंडें बांधण्याचीं आहेत तींही मी करून देण्यास सिद्ध आहे. व मक्त्यापैकीं रुपये २४० घेतले, बाकीचे रुपये ६० येणें आहेत ते मी मागत असतां देत नाहीं. तुमचा करार कच्चा विटांनीं बांधण्याचा असून मी पक्क्या विटा लावून बंगला बांधला आहे. सबब ही नोटिस पावल्या दिवसापासून आठ रोजांत रुपये द्यावे व बंगल्याचें काम करून घ्यावें. याप्रमाणें न केल्यास तुह्मावर दिवाणींत दावा करून या नोटिशीचे खर्चासुध्धां पैसा घेण्यांत येईल हें समजावें. कळावे. तारीख १९ आक्टोबर सन १८७५ इसवी. मुक्काम अकोट.

( सही ) जगन्नाथ किसन

दस्तुर खुद्द.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

## मनुष्याची स्वहितासक्ति आणि त्याचा हद्द.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि० वि० आपणाकडे चार ओळी पाठविल्या आहेत त्या येत्या अंकांत छापून प्रसिद्ध कराल अशी अशा आहे.

या विषयावर दोन ओळी लिहाव्या असें आमच्या मनांत फार दिवसापासून होतें. परंतु कांहीं कारणावरून त्या आजच लिहिणें आह्मास बरें दिसल्यावरून तसें केलें आहे, याकरितां तुमचे वाचक याकडे नजर देऊन याचा चांगला विचार करतील अशी आह्मी आशा बाळगतों. मनुष्यास कळूं लागल्यापासून तो आपल्या हिताच्या गोष्टी कोणत्या अहिताच्या कोणत्या याचा विचार करण्याविषयीं फारच दक्ष असतो. यावरून आमचें ह्मणणें असें नाहीं कीं लहान मुलांना हिताहित मुळींच कळत नाहीं. खचित त्यांना तें थोडें बहुत कळतेंच. हातांत दिलेला पेढा किंवा पैसा मूल खुशीनें कधीं सोडीत नाहीं हें आपण नित्यशः पहातों परंतु त्याच्यांत आणि मोठ्या मनुष्यांत भेद इतकाच कीं मोठा मनुष्य आपल्या क्षुल्लक स्वहिताकरितां दुसऱ्याचें कितीही नुकसान होत असलें किंवा केवढ्याही आशेचा हिरमोड होत असला तरी तो तसें करण्यास मागें पुढें पहात नाहीं. त्यास असें वाटतें कीं माझी वासना जय कधीं पावेल? तिचा जय होण्यास मीं काय उपाय करूं तसें होण्यास मला काय साधनें संपादिलीं पाहिजेत? अशा विचारांत निमग्न असतां जर त्यास एक दोन उपाय सुचले तर मग ते कितीही अमंगल असोत, दूषणीय असोत, विद्वानास अमान्य असोत, दुसऱ्याचें त्यांपासून अहित होत असो, स्वहेतु साधनासाठीं त्यांचा प्रयोग करण्यास तो कधीही मागें पुढें पहात नाहीं. अशा निर्धारानें दुसऱ्याचें कधीं कधीं पराकाष्ठेंचें नुकसान होतें. ही मनुष्याच्या स्वहितासक्तीची गोष्ट झाली. एकवेळ उच्चारिलेला शब्द तडीस नेण्याविषयींही त्याचा हट्ट अशाच प्रकारचा असतो. इतकें खरें आहे कीं जे लोक समजूतदार आहेत व ज्यांना विद्वान हें नांव खरोखरच साजतें अशांच्या ठायीं दुर्गुण सापडत नाहीं सांपडलाच तर फार थोड्यांत आणि तो तरी अत्यंत कृशावस्थेंत सांपडेल. एकदां तोंडांतून शब्द निघून जाऊन अहंपणाचें आणि अधिकाराचें वारें मस्तकांत शिरून तें माथें बिघडवूं लागलें ह्मणजे ते फारच निष्ठूर व अविचारी होतात. सद्विचार व सत्सूचना त्यास विषतुल्य वाटूं लागतात आणि मति फिरून जाते. अस्तु.

आपले युवराज ह्मणजे नेक नामदार प्रिन्स आफ वेल्स राणी साहेबांचे ज्येष्ट चिरंजीव येत्या नोव्हेंबर महिन्याच्या ८व्या तारखेस मुंबईस येणार आहेत- हिंदुस्थान सरकारानें व देशांतील इतर राजनिष्ठ लोकांनीं व राजे रजवाड्यांनीं मोठा फंड जमा करून त्यांचें उत्तम रीतीनें आगत स्वागत करून मुंबापुरींत महोत्सव करण्याचा बेत केला आहे हें पांच वर्षांच्या मुलापासून ८० वर्षांच्या वयोवृद्ध मनुष्यासही माहित झालें आहे. या संधीस मुंबईस जाऊन तेथील मजा पहाण्यास लाखो लोक जातील यांत संशय नाहीं. ज्या लोकांनीं कधीं १२ कोसांचा प्रवास केला नाहीं ते आज आपल्या जन्मभूमी सोडून शेकडों कोस जाण्यास सिद्ध होत आहेत यांत फारसें नवल नाहीं; कारण प्रसंगच तसा आहे. तेथें केवढा थाट होईल! केवढा समारंभ दृष्टीस पडेल! असा प्रसंग एखाद्या मनुष्यानें लाखो रुपये खर्चून आणण्याचा प्रयत्न केला तरी तो येणें नाहीं. भारतीय लोकांना तर असे प्रसंग फार थोडे वेळ दिसण्याचा संभव आहे. याकरितां आमचें मत असें आहे कीं, असा कपिलाषष्ठीचा योग कोणीही दवडूं नये; पण आह्मास लिहिण्यास दुःख वाटतें कीं येथील हाय स्कुलांतील चांगले हुशार व प्रौढ वयाचे विद्यार्थी हा अपूर्व मौज पहाण्याकरितां मुंबईस जाण्यास अतिशय उत्सुक असतां त्यांचे हेड मास्तर व आफिशियेटिंग डायरेक्टर त्यांस मुंबईस त्या संधीस जाऊं देत नाहींत. असें करण्यांत डायरेक्टर साहेबांचा काय हेतु असावा बरें? त्यांचा तर कांहीं मतलब दिसत नाहीं. आतां हेड मास्तराविषयीं विच्यार करू.

मुलाच्या कल्याणाविषयीं त्यांस इतकी काळजी ह्मणावें तर त्यांत कांहीं हशील नाहीं. कारण त्यांच्या मनाचा मोठेपणा जगजाहीर आहे. मुलें एका पायावर उभीं आहेत तीं ह्मणतात यंदा परिक्षेंत यश नाहीं आलें तरी ती गोष्ट आह्मास मान्य आहे. आणि खरेंच ते यंदा कदाचित् नापास झाल्यास पुढल्या वर्षीं म्याट्रिक्युलेशनची परीक्षा आहेच पण मुंबईंतील अद्भुत शोभा व राजे रजवाडे आणि प्रिन्स आफ वेल्स आमचे भावी राजे व आमच्या देशाचे धनी निजाम सरकार हे मात्र पुढल्या वर्षीं दिसण्याचा संभव नाहीं. आतां हेडमास्तरांनीं जर खरोखरच एक वर्ष मेहनत केली असेल तर तीन दिवसांच्या मजा पहाण्यानें मुलास दिलेल्या ज्ञानाचा समूळ तर नाहींच परंतु अंशतः तरी ऱ्हास होण्याचा मनांत विचार आणणें फार कोत्या समजुतीचें काम आहे. शिवाय मुलांना न धाडतां केवळ अधिकाराच्या जोरावर त्यांचीं मनें खट्टू करून त्यांस बळेंच येथें ठेवून घेणें यांत तरी मोठासा फायदा आहे असें नाहीं. त्यांचें तन मन तिकडे लागलें असल्या कारणानें पाठाध्ययन त्यांस मुळींच सुचणार नाहीं, पण जाऊं दिलें असतां त्यांस दुप्पट उमेद येऊन हेडमास्तराच्या श्रमाचें जास्त सार्थक होण्याचा संभव आहे. असें असतां त्यांना न धाडण्याविषयीं यांचा इतका दुराग्रह कां? त्यांच्या मनानें असें घेतलें आहे काय कीं, मुंबईतल्या धांदली बरोबर माझ्या विद्यार्थ्यांची होईल धांदल, व दारूकाम पहाण्यास तीं गेलीं असतां तिच्या अफाट ज्वालांमध्यें मी दिलेल्या ज्ञानाची आहुति पडून विद्यार्थ्यांस प्रसंगीं कांहींएक सुचणार नाहीं? तसें असेल तर किती कोती समजूत हा!!! व अशा समजुतीवरच त्यांना असें वाटत असेल काय कीं, मुलांना जाऊं देऊन तीं पास न झाल्यास बदल्यांच्या धांदलीमध्यें आपली ग्रेड वाढण्याची जी एक संधी आहे तिला पुष्कळअंशीं धोका बसेल. परंतु अशा विच्यारानीं त्यांना दिलगीर असण्याची गरज नाहीं; कारण सातव्या तारखेस परीक्षा पास होणारीं जीं मुलें आहेत तीं कांहीं झालें तरी बेविसावे तारखेला पास झालींच पाहिजेत. पण सातवीला ज्यांची पास होण्याची तयारी नाहीं ते ह्मणजे बावीसावीपर्यंत शिकत राहून मोठासा दिग्विजय लावणार आहेत असा बिलकूल अर्थ नाहीं. याकरितां डायरेक्टरांनीं व हेड मास्तरांनीं त्यांस जाऊं द्यावें असें आमचें मत आहे. आतां मुलांशी व वरील उभय गृहस्थांशीं जरी आमचा संबंध नाहीं तथापि चांगली गोष्ट योग्य काळीं अधिकाऱ्यांस सूचवून ठेविली आहे. तिच्या योग्यायोग्यतेचा विच्यार करणें त्यांजकडे आहे. मुलें चमत्कार पहाण्यास आतुर झालेलीं आहेत एवढें पक्कें ध्यानांत ठेवून जें करणें असेल तें त्यांनीं सुविचारानें करावें ह्मणजे झालें.

तारीख २० माहे अक्टोबर सन १८७५ इसवी

तिऱ्हाइत

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन वद्य १० शके १७९७

**विनंती** - येत्या आठवड्यांत दिपवाळीचा मोठा सण आला आहे तो गुरुवार, शुक्रवार, व शनिवार या दिवशीं ह्मणजे जे आमच्या पत्राचे तयारीचे दिवस त्यांतच आला आहे. व अशा आनंदोत्साहाच्या सणासाठीं आह्मांस व आमचे बरोबर खपणाऱ्या कारखान्यांतील लोकांस सुट्टी देणें आमच्या प्रिय आश्रयदात्यांस प्रशस्त व अवश्य वाटेल असा आह्माला भरवसा आहे व त्याकरितां ही विनंती करून पुढच्या अंकास आह्मी सुट्टी देतों.

## अद्वितीय परोपकारी स्त्री.

कधीं कधीं परमेश्वर अशा गोष्टी घडवितो कीं तेथें कल्पना करण्यास मनुष्याची अक्कल गुंग होते. मोठमोठे विद्वान, बलशाली व लक्ष्मीपुत्र अशांच्या हातून त्यांच्या देशाचें किंवा जातिबांधवांचेंही कांहींच कल्याण होत नाहीं; आणि यःकश्चित सामान्य प्रतींतील प्राणी नामांकित विद्वान नव्हे त्यांतही स्त्री जाति अबला अशांच्या उद्योगानें त्यांच्या देशाचेंच किंवा त्यांच्या जातीचेंच नुसतें कल्याण होतें असें नाहीं, सहा हजार मैलांवरील मोठ्या विस्तीर्ण राष्ट्राचें व त्यांतील शेकडों जातींचें कल्याण होतें असें प्रत्यक्ष पाहिलें ह्मणजे ते प्राणी धन्य आहेत व ईश्वराची करणी अगाध आहे असें वाटून मन तन्मय होतें!

आमची सदुद्योगी, परार्थ झटणारी, अकृत्रिम स्वभावाची व कोमलांतःकरणाची मिस मेरी कार्पेंटर बाई ही सदरील उत्तम कोटींतील एक आहे. कृपाळु परमेश्वर तिला दीर्घायु करो व तिच्या कृत्याला पूर्ण यश देवो. ही बाई विलायतेस रहात असून सुमार ५० वर्षांच्या वयाची आहे, ही अविवाहित आहे ह्मणजे हिनें मुळींच लग्न केलेलें नाहीं, हिच्या अंतःकरणांत हिंदुस्थान देशाचा अत्यंत कळवळा आहे, व तिचें परोपकारीक कृत्यांकरितां विलायतेंसही मोठें वजन आहे. महाराणी साहेबही सन्मानपूर्वक तिची भेट घेतात. पार्लमेंट सभेंतील मेंबर, स्टेट सेक्रेटरी इत्यादिकांकडेही ती लोकपीडेचीं व सुधारणेच्या अवश्यकतेचीं गाऱ्हाणीं नेते व तिच्या गाऱ्हाण्यांनीं कांहीं प्रसंगीं बंदोबस्तही होतात. ही परोपकारी बाई सन १८६६ त, सन १८६८ त, व सन १८६९ त अशी तीन वेळां आपल्या देशांत आली होती व आतां चवथ्यानें पुन्हा आली आहे. मागल्या तिन्ही खेपांस तिचा उद्योग इकडील स्त्रियांनीं चांगला विद्याभ्यास करावा आपली स्थिति सुधारावी हा होता व तो बऱ्याच चांगल्या प्रकारें सिद्धीस गेला. ह्मणजे जिल्ह्या जिल्ह्याच्या ठिकाणीं मुलींच्या शाळा सरकारी झाल्या. तसेंच त्या शाळांवर शिकविण्याकरितां मास्तरही स्त्रियाच असाव्या असें ठरून स्त्रियांचीं नामर्लस्कुलें कित्येक ठिकाणीं स्थापन झालीं. हल्लीं या बाई कित्येक प्रकारचे हेतु मनांत धरून आल्या आहेत व ते सारे तडीस गेले तर आपले देशास फार मोठा लाभ होईल यांत संशय नाहीं.

दक्षिण देशांत शेतकरी लोकांचा जो

नुकताच दंगा झाला होता त्याच्या बोभाल्यावरून इकडील शेतकरी लोकांची वास्तवीक स्थिति कशी आहे व त्याच्या संबंधानें सरकारची वागणूक कशी आहे हें बारीक दृष्टीनें समजून घेऊन विलायतच्या लोकांपुढें तें प्रकरण ठेवावें असा तिचा मानस आहे. न्याशनल इंडियन असोसिएशन या नावाची एक मंडळी या बाईनें विलायतेस स्वतांच्या प्रयत्नांनें स्थापन केली आहे तींत हिंदुस्थान संबंधी विच्यार चालून लोकांचें सुख वाढून दुःख कमी व्हावें असा उद्देश असून त्या सभेच्या शाखा पुण्यास, मुंबईस, व दुसरे मोठ मोठे ठिकाणीं स्थापन कराव्या असा तिचा विच्यार आहे. पुण्याच्या सार्वजनिक सभेचें स्वरूप समजून घेऊन त्यांच्या कार्यास हात द्यावा असा तिचा विच्यार आहे. तुरुंगामध्ये, उद्योग शाळांमध्यें, व यांत्रिक कारखान्यांमध्यें जाऊन त्यांतील प्राण्यांची स्थिति कशी आहे व त्यांस कोणत्या प्रकारचीं दुःखें आहेत तीं समजून घेऊन त्यांच्या दूरीकरणार्थ झटावें असा तिचा उद्देश आहे. व स्त्रीशिक्षणाकरितां हिंदुस्थानच्या न पाहिलेल्या भागांवरही हिंडून त्या त्या ठिकाणीं त्याची प्रेरणा करावी असा तिचा बेत आहे ह्मणून या आठवड्यांत ती सिंध प्रांताकडे गेली आहे. तिकडील चीफ कमिशनर यांनीं तिला चांगलें सहाय्य देण्याचें अभिवचन दिलें आहे. तिकडून राजपुत्राच्या समारंभाच्या प्रसंगीं ती मुंबईस येऊन पुढें गुजरायेंत पुण्यास जाईल. नंतर मद्रास इलाख्यांत जाईल, तिकडून कलकत्यास जाईल, तेथून वायव्य प्रांतांत व मध्य हिंदुस्थानांत फिरेल व पुढच्या मार्च महिन्यांत परत मुंबईस येईल. आमची इच्छा आहे कीं तिला प्रत्येक ठिकाणीं पूर्ण सहाय मिळावें.

वाचकहो, हें उदाहरण केवढें अप्रतिम आहे! शारीर सुख, प्रापंचीक सुख, किंवा इतर ऐषआराम याचा त्याग करून निवळ दुसऱ्यांचें कल्याणाकरितां हजारों कोस जी साध्वी हिंडत फिरते व त्यांत संतोष मानते तिला वाईट कोणी ह्मणेल काय? अशी स्त्री नाव घेण्याला दुसरी कोणी आढळत नाहीं अहाहा! बायको मनुष्य आणि केवळ तिऱ्हाईत असतां ती आपले देशाचे लोकांसाठीं इतकी झटते हें पाहून आपण सर्वांनीं आपल्या देशाच्या कल्याणार्थ झटण्याविषयीं उद्युक्त व्हावें.

## वऱ्हाड.

मे० टवुइडी साहेब फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट रजेवर गेले होते ते परत येऊन आपले कामावर रुजू झाले. व क्या० ट्रेव्हर साहेब पुन्हा सेकंड असिस्टंट झाले.

बंगाल्याकडील मि० आर डी. हरे साहेब यांस वऱ्हाडांत थर्ड क्लास आफिशियेटिंग कमिशनर नेमिलें असें १६वे तारखेच्या हिंदुस्थान सरकारच्या ग्याझेटांत प्रसिध्द झालें आहे. हे गृहस्थ आतां अकोल्यास येतील असें वाटतें.

मुंबई सरकारचे ग्याझेटांत रा. सा. नारायणभाई दांडिकर यांचे जागेवर रा. सा. सिताराम विश्वनाथ पटवर्धन पुण्याचे डि. इस्पेक्टर यांची नेमणूक छापिली आहे पण हिं. सरकारचे ग्याझेटांत नारायणभाई यांविषयीं अजून कांहीं आलें नाहीं, तरी नारायणभाई यांचे नावचीं पोस्टांतून पत्रें ही येथें येऊं लागलीं तेव्हां ते लवकरच येतील असें वाटतें.

रा. रा. माधवराव हरि सहस्त्रबुध्ये उमरावतीस आपले क्लार्कचे कामावर रुजू झाले व ते ६ महिन्यांची पुन्हा रजा घेणार असें समजतें.

रा. रा. गोपाळ महादेव भिडे एथील स्मा. का. कोर्टांचे क्लार्क उमरावतीस बदली गेले होते ते अजून परत आले नाहींत.

रा. रा. सदाशिव नारायण मुंबईकर वकील वऱ्हाडांत सेशन मुकदम्याकरितां प्रासिक्युटर नेमिलेले आहेत ते काम कसें करितात याविषयीं सहा महिन्यांचा अनुभव पाहून रिपोर्ट व्हावयाचा होता त्याप्रमाणें जुडिशियल कमिशनर साहेबांनीं रेसिडेंट साहेबांस असें लिहिल्याचें ऐकण्यांत आलें कीं वकील मजकूर हुशार असून काम चांगलें करितात व त्यापासून आह्मांस पुष्कळ मदत आहे. सदाशिवराव यांस हें सर्टिफिकिट पाहून आह्मांस संतोष वाटतो. स्वभावानें व चाली रीतीनेंही हे गृहस्थ भले आहेत वयांच्याकडे कामेंही आतां दुसऱ्या ठळक वकिलांप्रमाणें चांगल्या किफायतीचीं येऊं लागलीं आहेत असें समजतें.

रा. गंगाधर रामचंद्र जोशी मेहकरचे स्कूल मास्तर यांनीं परजिल्ह्यांत कमी पगारावरही बदली मागितली त्यावरून त्यांस ४० रुपयांवर उमरावतीस असिस्टंट मास्तर नेमिलें, व तेथील असिस्टंट मास्तर रा. सिताराम गोपाळ यांस ५० रुपयांवर शिगावास नेमून शिगावचे रा. कृष्णाजी सदाशिव तांबे यांस ७५ रुपयांवर मेहकरास नेमिलें.

रा. रा. पुरुषोत्तम नारायण एक्स्ट्रा असिस्टंटकमिशनर अडगाव यांजवरील अर्जांची चौकशी होऊन जुडिशियल कमिशनर साहेबांकडे गेलेलें प्रकरण त्यांनीं कमिशनर साहेबांकडे अखेर निकालाकरितां पाठविलें असें ऐकतों.

निजाम सरकार प्रिन्सकरितां ५ लक्ष रुपयांचा कंबरपट्टा तयार करीत आहेत अशी बातमी पसरली होती ती खोटी आहे असें हैदराबादचा ज्ञा. प्र. चा बातमीदार लिहितो.

मि० इलियट साहेब आफि० डायरेक्टर फिरावयास गेले. काल त्यांचा मुक्काम पातुरास होता.

हायर व लोअर स्यांडर्डच्या परीक्षा झाल्या त्यांत हायरमध्यें मि. आर्देसर दिनसाजी अकोटचे तहशिलदार पास झाले व लोअरमध्यें मि. अबदुल हक्क व मि. क्रिट्स हे उभयतां पास झाले असें समजतें.

नोवेंबरचे तिसरे तारखेस सेशनाकरितां जुडिशियल कमिशनर साहेब नांदुऱ्यास जाणार आहेत.

नांदुऱ्याचा रंगारी सखाराम वलद धुमणसा याजवर मारवाडी लोकांनीं गर्दी केली होती त्याबद्दल मलकापुरास चौकशी होऊन त्या लोकांस दंडाच्या शिक्षा झाल्या होत्या. पुढें त्या मुकदम्यांत कांहीं अधिक तजवीज व्हावी ह्मणून रंगारी मजकुरानें तपासणी अर्जीदाखल जुडिशियल कमिशनर साहेबांकडे एक अर्ज केला होता. त्याचा विच्यार करून कमिशनर साहेबांनीं तो नामंजूर केला.

तिऱ्हाईत यी सहीचें एक पत्र आज छापलें आहे त्यांत लिहिल्याप्रमाणें राजपुत्राचा समारंभ पहाण्यासाठीं हौसेनें मुंबईस जाऊं इच्छिणाऱ्या मुलांस शाळाखात्याचे अधिकारी खर्च जाऊं देत नसतील तर मोठा चमत्कार आहे!

दोन आठवड्यापूर्वीं मि० नारायण स्वामी नावाचे नागपुरचे नामांकित वकील येथें आले होते ती गोष्ट आह्मी वाचकांस कळविली आहे आह्मांस असें समजलें आहे कीं नारायण स्वामी यानीं मुकदम्यांत वकीलपत्र दिलें व न्यायाधीश यांनीं तें दाखल केलें तेव्हां अकोल्याच्या सर्व वकिलांनीं मिळून तक्रार केली कीं वऱ्हाडांत जे वकील मुकर केल्याविषयींची सरकारची यादी आहे. तिजमध्यें यांचे नाव दाखल नाहीं ह्मणून यांस वकीलपत्र घेऊन वऱ्हाडांतल्या न्याय कोर्टांत काम चालविण्याचा अधिकार नाहीं सबब त्यांस वकील नेमून घेऊं नये. तेव्हां आमचे विच्यारी डिपुटी कमिशनर क्या० बुलक साहेब यांनीं थोडें मनन करून सांगितलें कीं तक्रार वाजवी आहे व आह्मी वकीलपत्र मंजूर करित नाहीं. मग नारायण स्वामी यानीं मुखत्यारपत्र घेऊन काम चालविलें व तें न्यायाधीश आणि वकील मंडळी यांस मान्य झालें. अकोल्याच्या वकील मंडळीचें आपले हक्काचे संबंधांतील ही योग्य तक्रार व तिजबद्दलचा त्यांचा एकीचा विच्यार पाहून आह्मांस संतोष वाटतो. हक्काचें संरक्षण व ऐक्य यांकडे सर्व गोष्टींत ते असेंच लक्ष्य देतील तर तें त्यांस हितकारक व कीर्तिकारक होईल. नारायण स्वामी यांचे स्वतांचे संबंधानें किंवा त्यांच्या विद्वत्तेच्या संबंधानें आह्मांस कांहीं असंतोष नाहीं हें दाखविण्याकरितां सर्व वकील मंडळीनीं मिळून त्यांस एक दिवस पान सुपारीस बोलाविलें होतें व त्यांचा चांगला गौरव केला असें ऐकण्यांत आलें आहे हीही गोष्ट त्यांस भूषणदायक होय.

मुंबईचे आणखी एक दोन वकील इकडे येणार होते परंतु त्यांस रेसिडेंट साहेब परवानगी देत नाहींत असें ऐकतों.

अमदाबादेस जलप्रलयानें नुकताच जो कहर केला त्यायोगें पीडित झालेल्या लोकांस मदत करण्याकरितां जागोजाग सभा भरून वर्गण्या जमा झाल्या त्याप्रमाणें आमच्या अकोल्यासही थोडीशी वर्गणी रोख जमा झाली ती बितपशील—

१० रा. रा. श्रीराम भिकाजी जठार.
१० ,, ,, विष्णु मोरेश्वर महाजनी.
५ ,, ,, वामनराव बाळाजी ओशर.
५ ,, ,, निळकंठ नारायण भट.
५ ,, ,, खंडेराव बाळाजी फडके.
५ ,, ,, भास्कर महेश्वर लेले.
५ ,, ,, पांडुरंग दामोदर दवणकर.
३ ,, ,, सदाशिव विष्णु भागवत.
२ ,, ,, हरि मोरेश्वर शेवडे.
२ मि० महमद इस्मायल.
२ रा. रा. विष्णु आत्माराम.
१ ,, ,, वामन कृष्ण देशमुख.
१ ,, ,, गंगाधर वासुदेव.
१ ,, ,, नारो रघुनाथ मोहोळकर.
१ ,, ,, रामचंद्र आबाजी पन्हाळे.
१ ,, ,, श्रीकृष्ण मैराळ.
१ ,, ,, हरि धोंडदेव भाटवडेकर.
———
६०

अकोल्याच्या वस्तीच्या व उदार आणि सुशिक्षित लोकांच्या मानानें पाहिलें असतां ही यादी फार थोडी आहे असें कोणासही वाटेल, सभेच्या दिवशीं तर वरील लोकांच्याही सुमार निमेच लोक हजर होते. दुःखितांची पीडा दूर करण्यास इतका कंटाळा कां? बाहेर प्रदेशीं हलके कारकून व शिपाई लोक देखील दोन आणे, चार आणे, आठ आणे असे आपआपले शक्तीप्रमाणें देऊन अनाथ झालेल्यांस सहाय्य करिताहेत तर त्याप्रमाणें एथीलही लहान थोर सर्व गृहस्थांनीं करावें अशी आमची त्यांस शिफारस आहे.

हा पैसा जमा करून पोंचविण्याचें काम रा. रा. वामनराव बाळाजी ओशरकर डायरेक्टर साहेबाचे हेड क्लार्क यांनीं स्वीकारिलें आहे तर एथच्या व बाहेरगावच्या ज्या कोणास या धर्मकृत्यास कांहीं देणें असेल तर तें त्यांनीं त्यांकडे पाठविण्याची कृपा केली असतां अमदाबादेस पोंचविलें जाईल.

गेल्या आठवड्यांत येथें युरोपियन लोकांचा जो क्रिकेट खेळ झाला त्यांत पूर्व वऱ्हाडची सरसी झाली असें ह्मणतात. आतां १०।१२ दिवसांनीं उमरावतीसही अशी मौज पुन्हा होणार असें ऐकतों.

मेजर अलाडाईस साहेब विलायतेहून इकडे यावयास निघाले.

अगरवेशीबाहेर एका टेकडीवर माती खणित असतां दोन तीन मनुष्यांस एक खुर्दानें भरलेली घागर सापडली. तींत दुदांडी मोठे पैसे ९९ रुपयांचे होते. त्या लोकांनीं तहशिलदाराकडे तो खुर्दा भरणा केला.

वाशिम व देऊळगाव राजा येथील पत्रें पोंचलीं. पुढील अंकांत घेऊं.

## वर्तमानसार

मि. रिकेटस इंजिनियर यांजवर लाचाचा मुकद्दमा आहे तो असा कीं त्यानें एका कंट्राक्टरापासून एक हजार रुपये घेतले असें कंट्राक्टर ह्मणतो. व साहेबाचें ह्मणणें असें आहे कीं आपण ही रकम त्यापासून कर्जाऊ घेतली व तिजकरितां त्यास बांड लिहून दिला आहे तो त्यापाशीं आहे.

सुरतेचे एक वकील मि. कालाभाई ललूभाई व हायस्कूलचे हेड मास्तर मि० अंबालाल साकरलाल यांस बडोद्यास जडज नेमिलें. अंबालाल यांनीं दोन वर्षांची रजा घेतली आहे.

रावलपिंडी येथें एका सोजराच्या बायकोला एके वेळीं तीन मुली झाल्या व त्या तिन्हीही सुखरूप आहेत असें कळतें.

लाहोरास प्रिन्स यांस मेजवानी करण्याकरितां ४५००० रुपये खर्च होणार असें समजतें.

कर्नल बाटी मुंबईचे पोस्टमास्तर जनरल २० महिन्यांचे रजेवर जाणार त्यांचे जागेवर मि० जेम्स सिविल सर्व्हिस यांस नेमणार असें कळतें.

फ्रान्स देशच्या सरकारानें आपले राष्ट्रांत १२ लक्ष सैन्याची भरती करावी असा बेत केला आहे.

मद्रास रेलवेनेंही मुंबईचे समारंभास जाण्याकरितां पहिले, दुसरे, व तिसरे क्लासांचीं रिटर्न टिकिटें काढण्याचा बेत केला आहे.

सर फ्रेडरिक हेन्स लार्ड नेपियरचे कम्यांडर इन चीफ होणार असें वर्तमान आहे.

सिमल्याचे आसपास गेल्या आठवड्यांत बरेंच बर्फ पडलें.

लखनौकडे या वर्षी ४५ इंच पाऊस पडला.

दारजीलिंग पर्यंत नवीन रेलवे झाली ती जानेवारीचे पहिले तारखेस चालू होईल.

मुंबईस नोवेंबरच्या ९ व्या तारखेस आळो आळीला बाहेरून व घरांतून दीपोत्साह करविण्याच्या तजविजीकरितां महल्या महल्यांतून सभा भरून तसें करण्याचे ठराव झाले.

हिंदुस्थानांत तंबाकूची लागवड व व्यापार करण्याकरितां विलायतेस एक मोठी कंपनी तयार झाली आहे. ती या कामीं लाखो रुपये भांडवल घालणार व माहितगार लोक अमेरिकेंतून क्युबा बेटांतून वगैरे इकडे पाठविणार आहे.

अमदाबादेपासून रजपूत संस्थानांत एरीणपुरापर्यंत रेलवे करण्याचें सांगशन लवकर मंजूर होईल असें वर्तमान आहे.

आग्रा येथें प्रिन्ससाठीं जो हाल होणार त्यांत नेटिवासही घ्यावें असा विच्यार आहे.

केप आफ गुडहोप येथें कांहीं जमीन जिजमध्यें हिरे सापडण्याच्या जागा आहेत अशी १० लक्ष रुपयांस विकत घेतली.

मि. इस्टविक साहेब पार्लमेंट मेंबर सिमल्यास गेले आहेत.

गुदस्त सालांत बंगाल्याकडे स्टांपाचें उत्पन्न १६५९९६५० रुपये झालें असें रिविन्यु बोर्डाचे रिपोर्टावरून समजतें.

मि. गान साहेब मुंबई सरकारचे पोलिटिकल सेक्रेटरी विलायतेस रजेवर आहेत त्यांस परत येण्याची परवानगी मिळाली.

मि. जस्टिस पिन्हो साहेब मुंबई हायकोर्टांतील जडज यांनीं ३ महिन्यांची हक्काची रजा घेतली व त्यांचे बदलींत पुन्हा मि. जस्टिस नानाभाई यांस नेमिलें.

पंडित दयानंद सरस्वती सातान्यास नव्या मंडळींत-कांहीं व्याख्यानें देऊन मुंबईस परत गेले. तेथील शास्त्री व जुनी गृहस्थ मंडळी यांनीं दयानंदाशी वाद व्हावा असा निश्चय केला होता व सयुक्तिक निरोपही त्यांस पाठविला होता पण हे कडपणानें त्यांचें ह्मणणें कबूल न करितां ते तेथून निघाले असें कळतें.

मिठाच्या कराचें उत्पन्न एप्रिलतागाईत आगष्ट पावेतों ५ महिन्याचे २३५०४८०० रुपये झालें.

श्रीमंत मल्हारराव गायकवाड प्रिन्स यांस चांदीची चहाचीं भांडीं नजर देणार व तीं मद्रासेस एका कारागीर कंपनीकडे तयार होत आहेत.

ब्रह्मदेशांत जातिभेदाचें बंड फार आहे व त्यामुळें सरकारी वैद्यक खात्याचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं.

बोर्निओमध्यें माटनच्या राजाजवळ एक हिरा पिढीजाद १३५ वर्षांपासून आहे त्याचें वजन ३६७ रती आहे. तेथील गवर्नरानें तो विकत मागितला परंतु राजा देण्यास खुशी नाहीं. त्या हिऱ्याच्या योगानें घरांतील रोगराई नाहींशी होते अशी त्याची समजूत आहे. पृथ्वीवर सर्वांत मोठा व मोलवान हिरा कोहिनूर हा आपल्या महाराणी साहेबापाशीं आहे त्याचें वजन २७९ रती मूळचें होतें व अलीकडे त्याला पैलू पाडून दुरुस्त केल्यानें त्याचें वजन १८६ रती झालेलें आहे व किंमत ११ लक्ष रुपये आहे. तेव्हां बोर्निओतील हिरा कोहिनुरच्या दुप्पट आहे असें झालें.

चीन आणि ब्रह्मदेशांत परराज्यावर लढाई करणें झाल्यास अथवा शत्रुपासून बच्याव करण्यास आपसांत मदत करावी असा तह झाला आहे. ह्या दोन्ही राष्ट्रांस इंग्रजाखेरीज शत्रु तुर्त नाहीं, वृ. धा.

---

## लोअर स्टयांडर्ड परीक्षेचे प्रश्न.

गेले आठवड्यांत येथें जुडिशियल कमिशनर आफिसांत परीक्षा झाल्या त्यांतील लोअर स्ट्यांडर्डच्या उमेदवारांस जे प्रश्न दिले होते ते वाचकांच्या माहिती करितां आम्ही खालीं घेतों.

### सिविल प्रोसिजर कोड.

१ फिर्याद नामंजूर केव्हां करितां येईल आणि नामंजूर केल्यापासून परिणाम काय होतात.

२. कोणत्या प्रसंगीं दिवाणी मुकद्दम्यांतील प्रतिवादीस फैसल्यापूर्वीं कैद करितां येईल व अशा रीतीनें कैद करणें झाल्यास कोणते रीतीनें करावें.

३ फिर्याद झाल्यानंतर वादी किंवा प्रतिवादी मयत झाला, दोघांतून एकाचें लग्न झालें किंवा दिवाळें निघालें किंवा मादार झाला तर फिर्यादीचें काय होतें.

४ समन्स निघाल्यापासून फिर्यादीचा अखेर निकाल होईपर्यंत दाव्याची चौकशी करण्याचे एकामागून एक असे निरनिराळे प्रकार कोणते आहेत हें जितकें होईल तितकें पूर्णपणें लिहा.

५ एका कोडतानें केलेला हुकुमनामा दुसरे कोडताचे अधिकाराचे हद्दींत कसा अमलांत आणला जाईल आणि एका कोर्टाचा हुकुमनामा बजावण्याबद्दल दुसरे कोर्टास जर अर्ज केला तर दुसरे कोडतानें तो कोणते रीतीनें बजावावा.

६ कर्जाबद्दल ज्या मनुष्यास कैद केलें आहे, त्यानें आपली सुटका होण्याकरितां कोणत्या रीतीनें अर्ज करावा.

### रेजिस्ट्रेशन आक्ट.

१ रेजिस्ट्रेशन अक्टाप्रमाणें कोणते दस्तैवज रजिस्टर करणें भाग आहे. व कोणते दस्तैवज असे आहेत कीं, ते आपले इच्छेप्रमाणें रजिस्टर करावे किंवा करूं नये.

२ कोणत्या वेळेपासून रजिस्टर केलेले दस्तैवजाचा अंमल होतो.

३ जे दस्तैवज रजिस्टर करणें भाग आहे ते रजिस्टर केले नाहींत तर त्यापासून परिणाम काय होतो.

### पुराव्याचा आक्ट.

१ पोलिसाजवळ किंवा पोलिसाचे कैदेंत असतां आरोपीनें गुन्हा कबूल केला तर त्या कबुलायतीचा उपयोग कसा करितां येईल.

२ दिवाणी मुकद्दम्यांत आणि फौजदारी खटल्यांत नवऱ्यानें आणि बायकोनें एकमेकाच्यातर्फें किंवा एकमेकाच्या विरुद्ध साक्ष दिली तर त्या बाबदींत कायदा काय आहे

३ साक्षीदाराची तपासणी व उलट तपासणी करण्याची ती कोणत्या क्रमानें करावी. उलट तपासणींत कोणते प्रश्न कायदेशीर आहेत.

४ साधारणपणें पाहूं गेलें तर शाबितीचा बोजा कोणावर असतो.

---

### क्रिमिनल प्रोसिजर कोड.

१ समन्सचे मुकद्दमे व वारंटचे मुकद्दमे यांची चौकशी माजिस्त्रेटापुढें चालविण्याच्या पद्धतीमध्यें फरक कोणता आहे तो विस्ताररूपानें होईल तितका पूर्णपणें लिहा.

२ कोर्टाचे बेअदबीबद्दल चौकशी करण्याबद्दल फौजदारी कोर्टास कोणते अधिकार दिले आहेत.

३ फौजदारी कोर्टाच्या किती प्रति आहेत. आणि निरनिराळे प्रतीचे कोर्टास कोणकोणते अधिकार आहेत.

४ आकस्मिक किंवा सृष्टीनियमानें नव्हे असें जर कोणाला मरण आलें तर त्या प्रसंगीं क्रिमिनल प्रोसिजर कोडाप्रमाणें पोलिसाचें काम कोणतें आहे आणि या बाबतींत माजिस्त्रेट लोकांस नुकतेंच सर्क्युलर कोणते झाले आहेत.

५ समन्स कोणते प्रसंगीं काढावें आणि वारंट कोणते प्रसंगीं काढावें याविषयीं साधारण नियम कोणते आहेत.

६ गुन्हेगारास दंडाची शिक्षा झाली ह्मणजे दंड कसा वसूल करावा. आणि गुन्ह्यामुळें कोणाचें नुकसान झालें तर त्या दंडांतून तें नुकसान किती भरून देतां येईल.

---

### पिनलकोड.

१ चोरी, जुलमानें घेणें, जबरीची चोरी, अन्यायाचा विश्वासघात आणि ठकबाजी या गुन्ह्याच्या व्याख्या लिहा.

२ सरकारी नोकर या शद्बामध्यें कोणते लोक येतात.

३ गुन्ह्याचे कामांत एकत्र झालेले लोकांमध्यें प्रत्येक मनुष्याची निरनिराळी जबाबदारी कोणती आहे व सर्वांची मिळून जबाबदारी कोणती आहे.

४ कोर्टानें कैदीस कोणते गुन्ह्याबद्दल व किती काळपर्यंत एकांत कैद द्यावी.

५ लोकांस पीडा देणें ह्मणजे काय ?

६ अंगावर जाणें ह्मणजे काय

---

### मुलकी.

१ जमाबंदीचा हेतु काय आहे व ती केव्हां कशी करतात.

२ हिशेबाची कोणतीं बुकें पटवारी ठेवतात आणि ते हिशेब कशा प्रकारें ठेवित असतात.

१ तालुक्यांतील खज्यान्यासीं

२ इतर मनुष्या बरोबर

३ गावचे उपयोगासाठीं निराळे ठेविलेलें शेत, कोणी लागवड करील अगर कोणते शेत कोणाचे ताब्यांत नसून लागवड करण्यासारखें आहे तर अशा प्रकारचें शेत कोणी परवानगीवाचून लागवड करील तर त्यास काय शिक्षा होईल.

४ जर शेताचा मालक मरेल व त्यास तीन मुलगे आहेत तर मैताचे मागें खात्यांत नाव दाखल करण्याबद्दल काय नियम आहेत.

५ अपकारी कामगार कोण कोण आहेत.

६ बांड ह्मणजे काय, प्रामिसरी नोट ह्मणजे काय, व चेक ह्मणजे काय व प्रथमचे २ दस्तैवेजांत कोणता फरक आहे.

७ अन्युइटी ह्मणजे दरसाल करून दिलेल्या नेमणुकी याबद्दल दस्तैवजास स्टांप लावण्याबद्दल काय नियम आहेत.

८ अपराधाची माहिती देणारास स्टांप अक्टाप्रमाणें काय बक्षीस देतां येतें आणि हें बक्षीस देण्यासाठीं कोणते अधिकाऱ्याची मंजूरी पाहिजे.

९ पक्याचा करार पुरा करण्याविषयीं फिर्याद करणें तर त्या फिर्यादीस योग्य स्टांप कोणता.

१० पक्या खात्यात डिपाझिट रकमा जमा करण्याबद्दल काय नियम आहेत.

११ वहीत व पडीत जमीनींत बांध वरोळ्या दुरुस्त करण्याबद्दल कोणावर जबाबदारी आहे.

१२ जमा, वसूल, व बाकी ह्मणजे काय व त्यांत काय दाखल करीत असतात.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.